CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ७ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २१९ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



संपूर्ण समाजाचे संघटन करून, त्यातील प्रत्येक घटकाला आपला अभ्युदय व निःश्रेयस साध्य करता येईल अशी समाजरचना व समाजव्यवस्था विकसित करण्याचा प्रयत्न करणे ही सर्वोत्तम समाजसेवा आहे.

- स्व. एकनाथ रानडे
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# मुंबई-पुण्यात मुसळधार; विदर्भाला प्रतीक्षाच

## मानखुर्द दुर्घटनेसह राज्यात १३ बळी

**सर्व यंत्रणा 'अलर्ट मोड'वर**

- घाटांमध्ये दरडी कोसळल्याने महामार्ग ठप्प
- मुंबईत रस्ते वाहतूक, लोकल सेवा प्रभावित





इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे वारकरी खोळंबले आहेत. तर दुसऱ्या छायाचित्रात मुंबईतील मानखुर्द येथे चाळीचा कोसळलेला भाग

**मुंबई, ६ जुलै**

महानगरासह संपूर्ण राज्याला गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. वरुणराजाच्या या रौद्ररूपामुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व पूरस्थितीचे तीव्र पडसाद सोमवारी राज्याच्या विधिमंडळात उमटले. मुंबई, ठाणे, कोकण आणि पुण्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये ओला दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली. पुणे परिसरात पावसाने थैमान घातले आहे. मुंबईतील मानखुर्द दुर्घटनेसह राज्यात १३ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. मुंबई-पुणे जलदगती मार्गावर नव्यानेच बांधण्यात आलेल्या 'मिसिंग लिंक' पुलावर दरड कोसळल्याने मार्ग बंद करावा लागला. राज्यातील पुरपरिस्थिती पाहता दोन्ही सभागृहांचे कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ही घोषणा केली. सरीकडे विदर्भाला मात्र, अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

**पूरस्थिती गंभीर, मुंबईसह अनेक भागांत जनजीवन विस्कळीत**

राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली असून मुंबई, पुणे, ठाणे, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक नद्या धोक्याच्या पातळीवर वाहत असून सखल भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतूक, दैनंदिन व्यवहार आणि सार्वजनिक सेवा प्रभावित झाल्या आहेत.

मुंबईत दिवसभर सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले. काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने रस्ते वाहतुक ठप्प झाली आहे, तर रेल्वे, लोकल आणि बससेवेवरही परिणाम झाला आहे. मुंबईत एका इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली असून बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले.

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे इंद्रायणी नदीला मोठा पूर आला असून, शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे शहरातील वाहतूक बंद करण्यात आली असून, नदीकाठच्या भागांमध्ये प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले आहेत. देहू परिसरातही नदीची पाणीपातळी वाढल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

कोकणातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. सखल भागांमध्ये पाणी शिरल्याने अनेक कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले असून काही गावांचा संपर्क तात्पुरता तुटला आहे. ग्रामीण भागातील अनेक रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत.

राज्यभरात जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलिस, अग्निशमन दल आणि अन्य यंत्रणा सतर्क असून संवेदनशील भागांवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. हवामान विभागाने पुढील काही तास राज्यातील अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. (तभा वृत्तसेवा)

**२१ राज्यांत वादळी पावसाचा इशारा**
(पान नं २ वर...)

### इंद्रायणीला पूर आल्याने वारकऱ्यांना पुण्यातच थांबण्याचे आवाहन

आषाढी वारीच्या पृष्ठभूमीवर लाखो भाविक आळंदी आणि देहूच्या दिशेने मार्गक्रमण करत असतानाच, मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला मोठा पूर आला आहे. त्यामुळे आळंदी व देहूकडे निघालेल्या वारकरी आणि भाविकांनी पुढील प्रवास टाळून सुरक्षित ठिकाणी थांबावे. पुणे शहरापर्यंत पोहोचलेल्या वारकरी बांधवांनी पुढे जाण्याचा प्रयत्न न करता पुण्यातच थांबून वारीमध्ये सहभागी व्हावे. प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि नदीपात्र, घाट परिसर तसेच पाण्याखाली गेलेल्या पुलांच्या परिसरात जाणे टाळावे.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

गेल्या काही दिवसांत राज्यात १३ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती आहे. यामध्ये मानखुर्द येथील दुर्दैवी दुर्घटनेतील ६ मृतांचा समावेश आहे. सर्व घटनांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहे.

**- गिरीश महाजन,** आपत्ती व्यवस्थापन मंत्री

### हजारो कर्मचाऱ्यांना मायक्रोसॉफ्टने काढले




**नवी दिल्ली, ६ जुलै**

मायक्रोसॉफ्ट या बलाढ्य कंपनीने अचानक अनेक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकल्याने तंत्रज्ञान जगतात खळबळ उडाली आहे. या वृत्ताने केवळ तंत्रज्ञान जगतालाच नव्हे, तर तिथे नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांनाही धक्का बसला आहे. ताज्या वृत्तानुसार, मायक्रोसॉफ्टने सुमारे ४,८०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

वास्तवात, मायक्रोसॉफ्ट या तंत्रज्ञान क्षेत्रातील बलाढ्य कंपनीने अलीकडेच आपल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी अंदाजे २.१ टक्के म्हणजेच सुमारे ४,८०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. कंपनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)मध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असून खर्च कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. कंपनीच्या एचआर प्रमुख, एमी कोलमन यांनी स्वतः ही बातमी उघड केली. त्यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या एका मेमोद्वारे कर्मचारी कपातीची घोषणा केली. हा निर्णय केवळ खर्च कमी करण्याच्या उद्देशाने घेतलेला नाही, तर कंपनीच्या कार्यपद्धतीतील एका मोठ्या बदलाचा भाग आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या वर्षी मायक्रोसॉफ्टच्या शेअर्समध्येही मोठी घसरण झाली आहे. २०२६ च्या पहिल्या सहा महिन्यांत, कंपनीचा स्टॉक अंदाजे २३ टक्क्यांनी घसरला. ही २०२२ नंतरची सर्वात वाईट कामगिरी आहे. यापूर्वी, कंपनीने अमेरिकेतील सुमारे ९,००० कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्तावही दिला होता. केवळ मायक्रोसॉफ्टच नाही, तर अ‍ॅमेझॉन आणि मेटासारख्या मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांनीही या वर्षी हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तेजी चौथ्या दिवशीही कायम

**मुंबई :** शेअर बाजारातील तेजी सोमवारी कायम राहिली. मान्सूनची सुधारलेली स्थिती, विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांची पुन्हा सुरू झालेली खरेदी, जागतिक पातळीवरील तणाव कमी होणे आणि कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमती या सकारात्मक घटकांमुळे बाजाराला मोठे पाठबळ मिळाले. सोमवारी बाजाराची सुरुवात वाढीसह झाली आणि संपूर्ण सत्रात निर्देशांकांनी आपली घौडदौड सुरू ठेवली. दुपारच्या सत्रात काही प्रमाणात नफावसुली झाल्याचे पाहायला मिळाले, तरीही अंतिम तासातील जोरदार खरेदीमुळे बाजाराने पुन्हा उभारी घेतली आणि निर्देशांक दिवसाच्या उच्चांकी पातळीच्या जवळ बंद झाले.

### नियंत्रण रेषेजवळ संशयास्पद ड्रोन

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ एक संशयास्पद ड्रोन दिसल्यानंतर सुरक्षा दलांनी सोमवारी सकाळी शोधमोहीम सुरू केली. ही घटना रविवारी रात्री उशिरा सुंदरबनी सेक्टरमधील मींका आणि बेरीपट्टण या गावांजवळ घडली. सूत्रांनुसार, प्रकाशमान ड्रोनसारखी दिसणारी ही वस्तू थोड्या वेळासाठी भारतीय सीमेत घुसली आणि नंतर पाकिस्तानात परत गेली. त्यानंतर सुरक्षा दलांनी परिसर सील केला आणि ड्रोनमधून शस्त्रे किंवा अमली पदार्थ टाकले गेले आहेत का, हे तपासण्यासाठी शोधमोहीम सुरू केली. या शोधमोहिमेत कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नाही.

### पंढरपूरात धार्मिक स्थळावर दगडफेक, एक संशयित ताब्यात

**तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.६ जुलै-**

शहरातील कराड रोडवरील एका मशिदीवर रविवारी रात्री एका व्यक्तीने दगडफेक केली. या घटनेनंतर दोन समाजात मोठा तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरु आहे. दरम्यान या प्रकरणी तपास करुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी. वाय.मुजावर यांनी दिली. दरम्यान या घटनेमुळे शहरामध्ये दोन समाजात तणाव निर्माण झाला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



# पंतप्रधान मोदी इंडोनेशियात दाखल

**जकार्ता, ६ जुलै**

भारताचे 'अ‍ॅक्ट ईस्ट धोरण', 'महासागर' दृष्टिकोन आणि मुक्त, खुल्या सर्वसमावेशक भारत-प्रशांत क्षेत्राप्रती असलेली कटिबद्धता अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी इंडोनेशियात दाखल झाले. विमानतळावर इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांनी मोदींचे स्वागत केले.

इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यामुळे भारताचे अ‍ॅक्ट ईस्ट पॉलिसी अधिक मजबूत होईल, असे नरेंद्र मोदी यांनी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी सांगितले. 'महासागर व्हिजन' तसेच मुक्त आणि खुल्या भारत-प्रशांतबद्दलचा आमचा दृष्टिकोन 'महासागर' म्हणजेच सर्व प्रदेशांमधील सुरक्षेसाठी परस्पर आणि सर्वांगीण प्रगती हे सर्व प्रदेशांची सुरक्षा आणि विकासासाठी भारताचे व्हिजन आहे. २०१८ मधील इंडोनेशियातील पहिल्या भेटीदरम्यान भारत आणि इंडोनेशियाने आपल्या द्विपक्षीय संबंधांना धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेले, असे मोदी म्हणाले. द्विपक्षीय संबंधांचा दर्जा उंचावल्यानंतरची ही पहिलीच द्विपक्षीय भेट असेल आणि ही भेट जानेवारी २०२५ मधील प्रजासत्ताक दिन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी राष्ट्राध्यक्ष प्राबोवो यांनी केलेल्या भारत भेटीनंतर असेल, असे मोदी यांनी सांगितले.

भारत आणि इंडोनेशिया यांच्यात संस्कृती आणि जनसंपर्काचे दृढ संबंध आहेत आणि माझ्या या दौऱ्यामुळे आमच्या बहुआयामी भागीदारीचे सर्व पैलू अधिक दृढ होतील, असे मोदी म्हणाले. या दौऱ्यादरम्यान मोदी इंडोनेशियातील भारतीय समुदायाशी संवाद साधतील आणि राष्ट्राध्यक्ष प्राबोवो यांच्यासमवेत योग्यकार्ता येथील प्रंबनन मंदिर संकुलाला भेट देतील. (वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये दोन जवान हुतात्मा

**इम्फाळ, ६ जुलै**

मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात बंडखोरांच्या हल्ल्यात आसाम रायफल्सचे दोन जवान शहीद झाले ती अनेक जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून परिसर सील करण्यात आला आहे.

राज्यपाल भवनातून जारी झालेल्या निवेदनात म्हटले की, सोमवारी उखरुलमध्ये झालेल्या हल्ल्यात आसाम रायफल्सच्या दोन शूर जवानांच्या बलिदानामुळे राज्यपाल अत्यंत व्यथित झाले आहेत. राज्यपाल या भ्याड हिंसक कृत्याचा निषेध करतात. अशा हल्ल्यांना आपल्या समाजात स्थान नाही. शांतता आणि सुरक्षा राखण्याचा आपला सामूहिक निर्धार ते कमकुवत करू शकत नाहीत, असे ते म्हणाले. उखरुल जिल्ह्यात सुरक्षा दलासोबत काही दिवसांपूर्वी झालेल्या संघर्षात सुमारे चार नागरिक जखमी झाले होते. हा संघर्ष त्या भागात आसाम रायफल्सच्या चौकीच्या बांधकामावरून झाला होता. (वृत्तसंस्था)

# कृष्ण मोहन राम मंदिर ट्रस्टचे अंतरिम सरचिटणीस

**सरचिटणीस चंपत राय, विश्वस्त अनिल मिश्रा यांचा राजीनामा मंजूर**

**अयोध्या, ६ जुलै**

श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या सोमवारी झालेल्या बैठकीत ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला. आता माजी आयएफएस अधिकारी कृष्णा मोहन यांच्याकडे ट्रस्टचे अंतरिम सरचिटणीसपद सोपवण्यात आले आहे.

बैठकीला अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास महाराज, शंकराचार्य, युग पुरुष परमानंद, पेजावर मठाचे विश्व प्रसन्न तीर्थ, नवीन विश्वस्त कृष्ण मोहन आणि अयोध्येचे जिल्हाधिकारी शशांक त्रिपाठी उपस्थित होते. बैठकीसाठी आवश्यक ती गणपूर्ती झाल्यामुळे ती बराच वेळ चालली आणि यात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. देणग्यांमध्ये झालेल्या अपहाराच्या मुद्यावर आम्हा सर्वांनाच खूप दुःख आणि वेदना झाल्या. चोरी लहान होती की मोठी, हा मुद्दा दुय्यम आहे. इथे असे वातावरण कसे निर्माण होऊ दिले गेले ही खरी चिंतेची बाब आहे. तरीही वास्तविकता आपल्या समोर आहे. त्यावर चिंतन करणे हे आपले कर्तव्य आहे. हीच तीव्र चिंता आणि दुःखामुळे नियोजित तारखेआधीच आम्ही आज येथे एकत्र आलो, असे स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी बैठकीनंतर सांगितले.

आमचे सरचिटणीस चंपत राय हे सरचिटणीस म्हणून कार्यरत होते आणि या संपूर्ण घटनेमुळे ते अत्यंत व्यथित झाले होते.
(पान नं २ वर...)



पत्रकार परिषदेत देणगी स्वरूपात आलेल्या वस्तूंची माहिती देताना स्वामी गोविंद देव गिरी महाराज

### देणगीतील २८०० वस्तू सुरक्षित

मौल्यवान भेटवस्तू आणि अर्पण केलेल्या वस्तू गायब झाल्याचा आरोप स्वामी गोविंद देव गिरी महाराजांनी फेटाळला. या सर्व वस्तूंची नोंद असलेले रजिस्टर आम्ही सोबत आणले आहे. आज आम्ही या वस्तूंचा तपशील तुमच्याकडे सादर करू शकतो. आमच्याकडे अशा २८,०० वस्तूंची नोंद असलेले रजिस्टर आहे आणि त्या वस्तू सुरक्षित आहेत. आज ज्या पाच विशिष्ट वस्तू चर्चेचा विषय होता, त्या केवळ नमुना दाखवण्यासाठी आणल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

# जीवनदायिनी उजनीत दौंडमधून २७ हजार ८५६ क्युसेस विसर्ग

## धरणसाखळीत आज २३१० मि.मी पावसाची नोंद

**लवकरच विसर्ग एक लाख क्युसेसवर जाण्याची शक्यता**

**तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. ६ जुलै -**

सोलापूर जिल्ह्याची जीवनदायिनी उजनी धरणात दौंड येथून २७ हजार ८५६ क्युसेस विसर्गाने पाणी येऊ लागले आहे. बंडगार्डन मधूनही ४५ हजार ८३ क्युसेसने पाणी येत आहे. त्यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. खडकवासला, पवना, कासारसाई या धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु झाला आहे. परिणामी लवकरच उजनीत वरील धरणांमधून जवळपास १ लाख क्युसेसने पाणी येण्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

उजनी धरण पाणलोट क्षेत्रात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली आहे. उजनीच्या पाणलोट क्षेत्रातील वरील १९ धरणाच्या परिसरात एकाच दिवसांत २,३१० मि.मी तर उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. गुंजवणी, वीर, निरा-देवधर, नाझरे, भाटघर या धरण साखळीत ४१२ मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. खडकवासला, पानशेत, चासकमान, भामा-आसखेडा, आंद्रे, मुळशी या धरणातही पाणीसाठा वाढत आहे. आगामी ३ ते ४ दिवसात दौंड येथून उजनीत येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात काही हजार क्युसेसवरुन लाखापर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. बंडगार्डनचाही विसर्ग वाढत चालला आहे. त्यात रात्रीत मोठी वाढ होण्याचे संकेत धरण प्रशासनाने दिले आहेत. परिणामी उजनी धरणात येणाऱ्या पाण्यात कित्येक हजार क्युसेसने वाढ होईल असे धरण नियंत्रण विभागाचे अभियंता प्रशांत माने यांनी सांगितले आहे.

(सविस्तर वृत्त पान ७ वर...)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दोन बहिणी नदीत बुडाल्या

**रायसेन :** मावशीच्या लग्नासाठी आजोळी आलेल्या दोन लहान मुलींचा नदीत बुडून मृत्यू झाला. ही घटना रायसेन जिल्ह्यातील रंगपुरा गावात रविवारी दुपारी घडली. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मनीषा व गीता राकेश यादव, अशी मृत मुलींची नावे आहेत.

मनीषा व गीताच्या मावशीचे सोमवारी लग्न होते. घरात आनंदाचे वातावरण होते आणि अंगणात सनईचा आवाज घुमत होता. घरात लग्नाची तयारी जोरात सुरू होती. रविवारी दुपारी कुटुंब कामानिमित्त शेतात गेले होते. शेताजवळूनच बेटवा नदी वाहते. मुलेही त्यांच्यासोबत होती. खेळत असताना एक मुलगा पाण्यात घसरला. तो बुडताना पाहून मनीषा आणि गीताने त्याला वाचवण्यासाठी नदीत उडी मारली. पण पाण्याच्या जोरदार प्रवाहाने त्या तिघींनाही वाहून नेले. ■

# २१ राज्यांत वादळी पावसाचा इशारा

## ताशी ७० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता



**नवी दिल्ली, ६ जुलै**

देशाच्या उत्तर भागापासून पूर्व भागापर्यंत मान्सूनचा जोरदार तडाखा बसला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मंगळवारी उत्तर प्रदेश आणि दिल्लीसह २१ राज्यांत मुसळधार पाऊस आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात ताशी ७० किमी वेगाने वारे वाहतील. या वादळामुळे अनेक राज्यांमध्ये नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच पूर्व भागातील राज्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता असून पुढील २४ तास डोंगराळ राज्यांसाठी कठीण असू शकतात

सध्या गुजरात ते केरळपर्यंत किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा निर्माणा झाल्यामुळे चक्रीवादळी स्थिती बनत आहे. काही राज्यांमध्ये गारपिटीची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी, मच्छीमार आणि सर्वसामान्य जनतेला सतर्कतेचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, वायव्य बंगालच्या उपसागरावरील आणि लगतच्या उत्तर ओडिशा-पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवरील कमी दाबाच्या क्षेत्राचे त्याच भागात तीव्र होऊन दबावात रूपांतर झाले आहे.

पुढील २४ तासांत ते पश्चिम-वायव्य दिशेने सरकून उत्तर ओडिशा आणि उत्तर छत्तीसगड ओलांडण्याची दाट शक्यता आहे.

हवामान खात्यानुसार उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, झारखंड, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, ओडिशा, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर आणि मिझोराम या २१ राज्यांसाठी मुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. तसेच काही राज्यांसाठी पावसाचा रेड अलर्टही जारी करण्यात आला आहे.

**यमुनोत्री महामार्गावरील वाहतूक विस्कळीत**

चारधाम यात्रेचे दोन मुख्य मार्ग असलेल्या गंगोत्री आणि यमुनोत्री महामार्गांवर भूस्खलनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. सोमवारी दोन्ही महामार्गांवर विविध ठिकाणी ढिगारे आणि दगड कोसळल्याने अनेक तास वाहतूक विस्कळीत झाली. गंगोत्री महामार्गावरील नेटाला येथे झालेल्या भूस्खलनामुळे सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली होती आणि वाहने चिखलात अडकली होती. सायनाचट्टी येथेही सोमवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास झालेल्या भूस्खलनामुळे वाहतूक थांबण्यात आली होती. ◂ (वृत्तसंस्था)

# माफीच्या साक्षीदाराला परदेश प्रवासाची परवानगी

**नवी दिल्ली, ६ जुलै**

दिल्ली उत्पादन शुल्क घोटाळ्याशी संबंधित सीबीआय प्रकरणात माफीचा साक्षीदार बनलेल्या दिनेश अरोरांना राऊस अॅव्हेन्यू न्यायालयाने परदेश प्रवासाची परवानगी दिली आहे. विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) त्यांच्याविरुद्ध जारी केलेली लुकआऊट सर्क्युलर नोटीस ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत स्थगित करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने दिनेश अरोरांना २५ लाख रुपयांच्या अमानतठेवीच्या आधारावर परदेश प्रवासाची परवानगी दिली. तसेच, दिनेश अरोराच्या बार्सिलोना, स्पेन आणि लंडन येथील प्रवासावरील लुकआऊट सर्क्युलर नोटीस ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत स्थगित करण्याचे आदेश दिले. प्रवास हा जीवनाचा एक महत्त्वाचा मूलभूत हक्क असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. दिनेश अरोराला मनी लाँडरिंग आणि सीबीआय या दोन्ही प्रकरणांमध्ये जामीन मंजूर झाला असून तो माफीचा साक्षीदारही बनला आहे.

**मनीष सिसोदिया यांचे जवळचे सहकारी**

यापूर्वीही न्यायालयाने अरोरांना परदेश प्रवासाची परवानगी दिली होती. न्यायालयाने २१ ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधीत इटलीतील मिलान येथे आणि १६ ते ३० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत हाँगकाँग व चीन येथे प्रवास करण्याची परवानगी दिली. विशेष म्हणजे, १६ नोव्हेंबर २०२२ रोजी न्यायालयाने दिनेश अरोरा यांना सरकारी साक्षीदार बनण्याची परवानगी दिली होती. सीबीआयने या प्रकरणात एफआयआर दाखल केला असून त्यात अमित अरोरा, दिनेश अरोरा आणि अर्जुन पांडे यांना दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचे जवळचे सहकारी म्हणून संबोधले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे जनतेला आवाहन




**मुंबई, ६ जुलै**

आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असून दुपारनंतर राज्यातील काही भागांत जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, शक्यतो प्रवास टाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक बाहेर पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांनी विधानसभेत निवेदनाच्यामाध्यमातून केले. विशेषतः तरुणांना आवाहन करताना त्यांनी सांगितले की, पावसाळी पर्यटन, धबधबे, घाट परिसर किंवा धोकादायक ठिकाणी फिरण्यासाठी जाणे सध्या पूर्णपणे टाळावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता सुरक्षिततेला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असल्याचे ते यावेळी म्हणाले.

मुंबईत अनेक ठिकाणी झाडे कोसळली असून मुंबई-पुणे महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात दरड कोसळल्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. मात्र, अशा प्रत्येक परिस्थितीत महानगरपालिका, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग रस्त्यावर उतरून तातडीने मदतकार्य करत आहेत, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला दिला.

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक ठिकाणी त्वरित वाहतूक वळविणे, रस्ते बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित परत आणणे तसेच पाण्यात अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन गेल्या दोन दिवसांत धोकादायक भागांतील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून, त्यांच्या निवासाचीही योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नियमित आढावा घेतला जात आहे. सर्व जिल्हा प्रशासनांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून, कोणत्याही ठिकाणी यंत्रणेत कमतरता राहणार नाही आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने करण्यात येतील. गेल्या दोन-तीन दिवसांतील घटनांबाबत, करण्यात आलेल्या मदतकार्याबाबत आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी करण्यात येणार्‍या उपाययोजनांबाबत सरकार विधानसभेत सविस्तर निवेदन सादर करणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### राज्य सरकारने तातडीने निवेदन करावे

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक परिसरात दरड कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून, याच प्रकल्पाच्या दर्जाबाबत काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केले. यापूर्वी याच मार्गावर खड्ड्यांचा प्रश्न गाजला होता, आता दरड कोसळल्याने प्रकल्पाच्या नियोजनावर आणि बांधकामाच्या गुणवत्तेवर पुन्हा एकदा शंका उपस्थित झाली असल्याचे यावेळी वडेट्टीवार म्हणाले.

सोमवारी विधानसभेचे कामकाज सुरू होताच आमदार विजय वडेट्टीवार यांनी अतिवृष्टीबाबत निर्माण राज्यातील एकूण परिस्थितीचा मुद्दा सभागृहात मांडला. दरड कोसळल्यामुळे द्रुतगती मार्गासोबतच जुना मुंबई–पुणे महामार्ग आणि घाट विभागातील रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. हजारो प्रवासी मार्गात अडकून पडले असून नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याचे ते म्हणाले.

मुंबईतही पावसामुळे गेल्या दोन दिवसांत १२ जणांचा मृत्यू झाल्याचा उल्लेख करत, मॅनहोलमध्ये पडून, झाड कोसळून तसेच मानखुर्द येथे इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनांचा वडेट्टीवार यांनी संदर्भ दिला. पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण, झाडांची छाटणी, मॅनहोलची सुरक्षा व जलनिस्सारण व्यवस्था प्रभावीपणे राबवली असती, तर ही जीवितहानी टाळता आली असती, असे मत त्यांनी व्यक्त केले. या सर्व घटनांमागील निष्काळजीपणाची जबाबदारी निश्चित करून संबंधित यंत्रणा व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच राज्य सरकारने तातडीने अधिकृत निवेदन करून वस्तुस्थिती व पुढील नियोजनाची माहिती द्यावी, अशी ठाम मागणी विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात केली. ■

### 'मिसिंग लिंक': सेफ्टी चेकशिवायच उद्घाटन केले का?

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बहुचर्चित 'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या उद्घाटनानंतर अवघ्या दोन महिन्यांतच या मार्गावर दरड कोसळल्याची घटना घडली असून, यावरून शिवसेना (उबाठा गट) नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. समाजमाध्यमावरील एका पोस्टद्वारे त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे.

उबाठा नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'मिसिंग लिंक'चे उद्घाटन १ मे २०२६ रोजी करण्यात आले होते. या प्रकल्पाची किंमत हजारो कोटी रुपयांनी वाढवण्यात आली. हा पैसा गेला कुठे? पैसा जनतेचा... कंत्राटदारांची मजा आणि त्रास मात्र जनतेलाच, अशी टीका त्यांनी केली. ■




जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपस्थित केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता व मान्यवर

# बंडखोर गटाचे दावे खोटे; संघटनात्मक समिती २०२७ पर्यंत वैध

### निवडणूक आयोगाला तृणमूल काँग्रेसचे उत्तर

**नवी दिल्ली, ६ जुलै**

तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाने सोमवारी निवडणूक आयोगाला आपले सविस्तर उत्तर सादर केले. पक्षाने बंडखोर नेते ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटाचे सर्व दावे फेटाळून लावले. पक्षाच्या घटनेनुसार अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसच्या सर्व संघटनात्मक समित्या २०२७ पर्यंत वैध असल्याचा दावा केला आहे.

निवडणूक आयोगाला उत्तर सादर केल्यानंतर तृणमूल खासदार कल्याण बॅनर्जी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, पक्षाने सर्व तथ्ये आणि घटनात्मक तरतुदींच्या आधारे आयोगाला सविस्तर उत्तर सादर केले आहे. २०२२ मध्ये संघटनात्मक निवडणुका झाल्या होत्या. त्याचा कार्यकाळ २०२७ पर्यंत आहे. एआयटीसी समिती आणि राष्ट्रीय कार्यकारी समितीचा कार्यकाळ २०२५ मध्ये संपला असल्याचा बंडखोर गटाचा दावा खोटा आहे, असे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, पक्षाच्या घटनेनुसार मूळतः समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा होता. तो २००० मध्ये चार वर्षांपर्यंत आणि २००६ मध्ये पाच वर्षांपर्यंत वाढवण्यात आला. या सर्व दुरुस्त्यांचा अहवाल निवडणूक आयोगाला वेळोवेळी सादर करण्यात आला आहे. पक्षाच्या शेवटच्या संघटनात्मक निवडणुका २०२२ मध्ये झाल्या होत्या. त्यामुळे घटनेनुसार समितीचा कार्यकाळ २०२७ पर्यंत म्हणजेच पाच वर्षांचा आहे, असेही ते म्हणाले. कल्याण बॅनर्जी पुढे म्हणाले, जर बंडखोर गटाच्या दाव्यानुसार २०२५ नंतर पक्ष समितीचे अस्तित्व संपुष्टात आले असेल तर त्यांनी २०२६ ची विधानसभा निवडणूक तृणमूलच्या चिन्हावर कोणत्या आधारावर लढवली?ः. सर्व बंडखोर नेत्यांनी ममता बॅनर्जी यांनी स्वाक्षरी केलेल्या उमेदवारी अर्जांच्या आधारावर निवडणूक लढवली. जर त्यांचा दावा मान्य झाला, तर त्यांची निवडणूक लढवणे अवैध ठरेल. त्यामुळे, त्यांनी तात्काळ आपल्या पदांचा राजीनामा द्यावा, असेही ते म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

# सीमावर्ती रस्त्यांच्या नावावर सरकारी निधीची लूटमार

**नवी दिल्ली, ६ जूलै**

सीमावर्ती रस्ते संघटनेमध्ये (बीआरओ) सरकारी निधीचा कथित गैरवापर आणि बनावट मजुरांना पैसे दिल्याप्रकरणी चार प्रकरणांच्या तपासाचा भाग म्हणून केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील २६ ठिकाणी छापे टाकले. या तपासात १० अधिकाऱ्यांसह अनेक व्यक्तींवरील फसवणूक, बनावटगिरी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी केली जात आहे. या शोधमोहिमांदरम्यान महत्त्वपूर्ण कागदपत्रे आणि डिजिटल पुरावेही जप्त करण्यात आले.

हे छापे जम्मू-काश्मीर, लडाख, दिल्ली, हरियाणा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, आसाम, अरुणाचल प्रदेश आणि नागालँड येथे टाकण्यात आले. ही कारवाई लडाखमधील बीआरओच्या 'प्रोजेक्ट विजयक' आणि 'प्रोजेक्ट योजक' प्रकल्पांशी संबंधित आर्थिक अनियमिततेच्या तपासाचा एक भाग आहे. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, कंत्राटी कामगारांच्या नियुक्तीमधील आणि



बनावट कामगारांना पगार देण्यामधील कथित अनियमिततांवर तपास केंद्रित आहे. या प्रकारामुळे सरकारी निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचा एजन्सीला संशय आहे.

बीआरओच्या टेक्निकल बोर्ड ऑफ ऑफिसर्सने केलेल्या अंतर्गत तपासानंतर संरक्षण मंत्रालयाने दाखल केलेल्या फौजदारी तक्रारींच्या आधारे सीबीआयने चार एफआयआर नोंदवले आहेत. प्राथमिक तपासात नियुक्ती आणि पगार देण्याशी संबंधित आर्थिक अनियमितता दिसून आली आहे.

**१० अधिकाऱ्यांसह अनेक एजन्सीच्या रडारवर**

एफआयआरमध्ये एकूण १० अधिकाऱ्यांची नावे आहेत. यामध्ये लेफ्टनंट कर्नल, मेजर आणि एका इंजिनिअर पदाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

याव्यतिरिक्त, काही खाजगी व्यक्तींचाही तपासात समावेश करण्यात आला आहे. छाप्यादरम्यान अनेक महत्त्वपूर्ण कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. या कागदपत्रांची न्यायवैद्यक आणि तांत्रिक तपासणी सुरू आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पुणे कॅम्पससह जागतिक विस्ताराचे आयआयएमचे लक्ष्य

### डॉ. भीमराया मेत्री यांनी जाहीर केला रोडमॅप

**नागपूर, ६ जुलै**

भारतीय प्रबंध संस्थेचा (इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट) पुणे कॅम्पस विकसित करायचा असून एकंदरितच आयआयएम नागपूरने आता जागतिक झेप घेण्याची तयारी सुरू केली असल्याचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी सांगितले.



'फ्रॉम इंडिया टू द वर्ल्ड' या धोरणासह पुणे येथे आयआयएम नागपूरचा भव्य परिसर पुढील पाच वर्षांत उभा होईल. यानंतर इतका मोठा दुसरा परिसर (सेकंड कॅम्पस) असलेले आयआयएम नागपूर हे देशातील एकमेव संस्थान असेल, असा विश्वास डॉ. मेत्री यांनी व्यक्त केला. आयआयएम नागपूरला जागतिक क्रमवारीत पहिल्या १०० बिझनेस स्कूल मध्ये आणायचे आहे, असे त्यांनी सांगितले.

पुण्यातील मोशी येथे ७० एकरांवर पूर्ण विकसित कॅम्पस उभारण्याच्या माध्यमातून आयआयएम नागपूर मोठ्या विस्तारासाठी सज्ज झाले आहे. आयआयएमचे छोटे सॅटेलाइट किंवा एक्स्टेंशन सेंटर्स आहेत; मात्र पुण्यासाठी आमची संकल्पना मूलभूतरीत्या वेगळी आहे. पुणे कॅम्पसमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्री ४.०, डिजिटल तंत्रज्ञान, एआय व आयटी मॅनेजमेंट या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार आहे. प्रस्तावित अभ्यासक्रमांमध्ये एकात्मिक बीबीएड कार्यक्रम तसेच देशातील आघाडीच्या आयआयटींच्या सहकार्याने पाच वर्षांचा बीटेक-एमबीए कार्यक्रम यांचा समावेश आहे.

ते म्हणाले की, पुण्याबरोबरच गोव्यात विस्ताराची योजना असून, परदेशी विद्यापीठासोबत आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यावरही भर दिला जाणार आहे. एकूण वीस परदेशी विद्यापीठांशी करार करून आयआयएमच्या विद्यार्थ्यांना थेट या विद्यापीठांची पदवी मिळवता येईल, अशी योजना या पाच वर्षांत अमलात येईल. बहुकॅम्पस विस्तार, एक्झिक्युटिव्ह एज्युकेशनमध्ये देशातील अव्वल तीन संस्थांत स्थान, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यवस्थापन शिक्षण, भारतकेंद्री संशोधन, ऊर्जा व हवामान नेतृत्व, उद्योजकता व महाराष्ट्र-विदर्भाच्या विकासात व्यापक योगदान अशा महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांसह संस्थेने मस्ट्रॅटेजिक रोडमॅप २०२६-३१ सुद्धा डॉ. मेत्री यांनी जाहीर केला. ऊर्जा आणि हवामान नेतृत्वालाही प्राधान्य देण्यात आले आहे. एनपीटीआयसोबतचा एक्झिक्युटिव्ह एमबीए इन एनर्जी मॅनेजमेंट, ओएमजीसी ग्रीन लिमिटेडसोबतचे सहकार्य व एनआरडीसीसोबत प्रस्तावित सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर हीट रिझिलियंस अॅण्ड सस्टेनेबल कूलिंग यांच्या माध्यमातून या क्षेत्रातील काम अधिक व्यापक केले जाणार आहे. यासोबतच कॅम्पस विकासाचा दुसरा टप्पा, नेट-झिरो उद्दिष्ट व आधीच कार्यान्वित झालेला सौरऊर्जा उपक्रम पुढे नेण्यात येईल. ◂ (तभा वृत्तसेवा)

# अभ्यासक्रमात श्यामाप्रसाद मुखर्जींचे जीवनचरित्र

### मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांची घोषणा

**कोलकाता, ६ जुलै**

भारतीय जनसंघाचे संस्थापक प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रवादी नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी सोमवारी मोठी घोषणा केली. पुढील शैक्षणिक सत्रापासून राज्यभरातील शाळा आणि विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांचे जीवन, विचार आणि राष्ट्र उभारणीतील योगदानाचा समावेश केला जाईल. नवीन पिढीला डॉ. मुखर्जींच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या राष्ट्रवादी विचारांची ओळख करून देणे ही काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.




श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा १२५ फूट उंच पुतळा उभारण्यात येणार आहे. या कामाच्या कोनशिलेचे उद्‌गघाटन करताना गृहमंत्री अमित शाह. यावेळी उपस्थित मुख्यमंत्री अधिकारी व अन्य

मुख्यमंत्र्यांनी डॉ. मुखर्जींना आदरांजली वाहण्यासाठी कोलकाता येथील मित्रा इन्स्टिट्यूशनला भेट दिली. याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये 'राष्ट्र प्रथम' ही भावना रुजवणे हिच त्यांना खरी आदरांजली ठरेल. राष्ट्राला प्रथम स्थान देण्याचा संदेश त्यांच्या काळात जितका समर्पक होता, तितकाच तो आजही आहे. डॉ. मुखर्जी यांचे जीवन, शिक्षणातील त्यांचे योगदान आणि राष्ट्रीय एकतेची त्यांची दूरदृष्टी यांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी राज्य सरकार आवश्यक बदल करेल, असेही त्यांनी सांगितले.

**राष्ट्रीय एकतेसाठी जीवन समर्पित**

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे केवळ एक राजकारणी नसून एक दूरदर्शी शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी शिक्षण आणि राष्ट्रउभारणी यांना एकमेकांना पूरक मानले आणि तरुणांना त्यांच्या राष्ट्रीय जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्यासाठी काम केले. डॉ. मुखर्जी यांनी आपले जीवन राष्ट्रीय एकता, सांस्कृतिक ओळख आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी समर्पित केले होते. आज त्यांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

### कृष्ण मोहन राम मंदिर ट्रस्टचे अंतरिम सरचिटणीस

(पान १ वरून)

पूर्ण न्याय मिळेपर्यंत म्हणजेच दोषींना शिक्षा होईपर्यंत त्या पदावर काम करणे योग्य राहणार नाही, असे मत त्यांचे होते. म्हणूनच त्यांनी राजीनामा दिला, असे स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी सांगितले. ट्रस्टच्या नियमावलीनुसार राजीनामा सादर केल्याच्या क्षणीच तो वैध मानला जातो. नियमांनुसार त्यांचा राजीनामा आपोआप वैध ठरला आहे. आता ट्रस्टची पुढील बैठक २२ जुलै रोजी होणार आहे, असे स्वामी गोविंद देव गिरी महाराजांनी सांगितले.

**'सीईओ' पदासाठी समिती स्थापन**

मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) बनवण्यासाठी ट्रस्टच्या बैठकीत एक समितीची स्थापना करण्यात आली. या तीन सदस्यीय समितीत दोन सैन्य अधिकारी आणि एक सेवानिवृत्त न्यायाधीशाचा समावेश करण्यात आला. यात सेवानिवृत्त न्यायाधीश प्रमोद कोहली, सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल, विष्णुकांत आणि सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल सुरेश हावडे यांचा समावेश आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ‘सी अँड डी’ वेस्ट प्रकल्प प्रकरणात महापालिकेला मोठा दिलासा

## अय्यर कंपनीचा ८३.४७ कोटींचा दावा फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या १५० टीपीडी क्षमतेच्या सी अँड डी (कन्स्ट्रक्शन अँड डिमॉलिशन) वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्पासंदर्भातील लवाद प्रकरणात महापालिकेला मोठा दिलासा मिळाला आहे. सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश तथा लवाद न्यायाधीश डॉ. एस. ए. आर. ऑटी यांनी अय्यर एन्व्हायर्नमेंट रिसोर्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (शंभवी कन्स्ट्रक्शनसोबत संयुक्त उपक्रम) या कंपनीचा तब्बल ८३ कोटी ४७ लाख ५९ हजार १० रुपयांचा दावा फेटाळून लावत महापालिकेच्या बाजूने महत्त्वाचा निवाडा दिला आहे.

महापालिकेने हा प्रकल्प डीबीओटी तत्त्वावर राबविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. त्यानुसार ९ फेब्रुवारी २०२३ रोजी कंपनीसोबत कन्सेशन अॅग्रीमेंट व लँड लीज अॅग्रीमेंट करण्यात आला आणि १४ फेब्रुवारी २०२३ रोजी कार्यादेश देण्यात आला. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नऊ महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने कंपनीला वारंवार नोटिसा बजावण्यात आल्या. त्यानंतरही काम पूर्ण न झाल्याने आयुक्तांच्या मंजुरीने ३१ जानेवारी २०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली. तरीही प्रकल्प पूर्ण न झाल्यामुळे ७ जून २०२४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. समाधानकारक उत्तर न मिळाल्याने १ जुलै २०२४ रोजी कंपनीचे कन्सेशन अॅग्रीमेंट व लँड लीज अॅग्रीमेंट रद्द करण्यात आले. या निर्णयाविरोधात कंपनीने लवादात दावा दाखल केला. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवाद न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश डॉ. एस. ए. आर. ऑटी यांची नियुक्ती करण्यात आली होती. कंपनीने महापालिकेविरुद्ध ८३.४७ कोटी रुपयांचा दावा, त्यावर १८ टक्के वार्षिक व्याज तसेच व्हीजीएपी फंडिंगमधील २९.८३ लाख रुपयांची कपात परत मिळावी अशी मागणी केली होती. त्यास उत्तर म्हणून महापालिकेने सविस्तर म्हणणे सादर करत २० कोटी २० लाख ३७ हजार ७१५ रुपयांचा काउंटर क्लेम दाखल केला.



### लिलाव करून थकबाकीची वसुली करण्यास महापालिका पात्र

महापालिकेने कंपनीला दिलेल्या जागेचा ताबा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कंपनीने विहित मुदतीत रक्कम न भरल्यास त्या जागेवरील मशिनरी व इतर साहित्याचा सार्वजनिक लिलाव करून थकबाकीची वसुली करण्यास महापालिका पात्र राहील, असेही लवाद न्यायाधीशांनी स्पष्ट केले आहे.

संपूर्ण सुनावणीनंतर ६ जुलै २०२६ रोजी लवाद न्यायाधीशांनी दिलेल्या निवाड्यात कंपनीचा संपूर्ण दावा फेटाळून लावला. तसेच महापालिकेने कंपनीला दिलेले ३ कोटी ८ लाख रुपये एका महिन्याच्या आत परत करण्याचे आदेश दिले. या मूळ रकमेवर दावा प्रलंबित असलेल्या कालावधीतील ९ टक्के वार्षिक दराने २३ लाख १० हजार रुपयांचे व्याजही कंपनीने अदा करावे, तसेच संपूर्ण रक्कम भरली जाईपर्यंत निवाड्याच्या तारखेपासून ७ टक्के दराने व्याज लागू राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने अॅड. विजय मराठे यांनी बाजू मांडली. त्यांना विधी विभागाच्या विधी सल्लागार संध्या भाकरे, नगर अभियंता सारिका अकुलवार आणि कनिष्ठ अभियंता मनोज जाधव यांनी सहकार्य केले. तर कंपनीच्या वतीने अॅड. सुरेश गायकवाड यांनी काम काज पाहिले.

# थांबलेल्या कारला दुचाकीची जोरदार धडक

- दुचाकीस्वार जागीच ठार, अन्य एक जखमी
- विजापूर रोडवरील एस.आर.पी.एफ. कॅम्पजवळील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**



बाजूने जाणाऱ्या टेम्पोने कट मारल्याने चालकाचे नियंत्रण सुटून दुचाकी रस्त्या बाजूला थांबलेल्या कारवर जोरात धडकून झालेल्या भीषण अपघातात तरुण दुचाकीस्वार जागीच ठार झाला. त्याचा साथीदार गंभीर जखमी झाला. ही घटना सोलापूर विजापूर महामार्गावरील एसआरपीएफ कॅम्पजवळ आज सोमवारी दुपारी अडीच वाजता घडली.

निसार जावेद मुल्ला (वय २२, रा. २ नं. झोपडपट्टी, विजापूर नाका, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. जखमीचे नाव तबरेज जमीर यादगिरी (वय २३, रा. २ नंबर झोपडपट्टी विजापूर नाका सोलापूर) असे आहे. आज सोमवारी दुपारी यातील मयत निसार व जखमी तबरेज हे दोघे दुचाकीवरून तबरेजच्या नातेवाईकाच्या घरी निघाले होते. निसार हा दुचाकी चालवत होता. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास एसआरपीएफ कॅम्पजवळ बाजूने जाणाऱ्या एका आयशर टेम्पोने त्यांच्या दुचाकीस कट मारला. त्यामुळे



दुचाकीवरील नियंत्रण सुटून ती रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या कारवर जाऊन धडकली. यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी निसार यास मृत घोषित केले तर तबरेज याच्यावर उपचार सुरु आहेत.

दरम्यान या अपघाताची माहिती समजताच यातील मयत व जखमींच्या नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. मयत निसारच्या नातेवाईकांनी आक्रोश करीत मोठा टाहो फोडला होता. मयत निसार हा अविवाहित असून तो बांधकामाचे काम करायचा. त्याच्या पश्चात आई, भाऊ, बहिण असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

## बंगालमधील तीन राज्यसभा जागांसाठी पोटनिवडणुका जाहीर

**नवी दिल्ली, ६ जुलै**

भारतीय निवडणूक आयोगाने सोमवारी पश्चिम बंगालमधील तीन राज्यसभा जागांच्या पोटनिवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. सुष्मिता देव, सुखेन्दु शेखर रॉय आणि प्रकाश चिक बाराईक यांनी राज्यसभा खासदारपदाचा राजीनामा दिला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर या नेत्यांनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पक्ष सोडला.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, सुष्मिता देव यांचा कार्यकाळ २ एप्रिल २०३०, तर सुखेन्दु शेखर रॉय आणि प्रकाश चिक बाराईक यांचा कार्यकाळ १८ ऑगस्ट २०२९ रोजी संपणार होता.

(वृत्तसंस्था)

# हाफिज ‘पहलगाम’चा सूत्रधार

**नवी दिल्ली, ६ जुलै**

पहलगाम दहशतवादी हल्ला प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) सोमवारी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लश्कर-ए-तैबाचा प्रमुख हाफिज सईदला या कटाचा सूत्रधार ठरवत पुरवणी आरोपपत्र दाखल केले. एनआयएने सईदवर भारताविरुद्ध युद्ध पुकारणे आणि सीमापार दहशतवादाचा कट रचणे यासह गंभीर आरोप ठेवले आहेत. या हल्ल्याच्या कटात आणि दहशतवादी नेटवर्कमध्ये सामील असलेल्या इतर आरोपींविरुद्ध एनआयएने न्यायालयात अतिरिक्त पुरावे सादर केले आहेत.

जम्मू येथील एनआयए विशेष न्यायालयात दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्रात दहशतवादविरोधी संस्थेने

## एनआयएने दाखल केले पुरवणी आरोपपत्र



हाफिज सईदवर वैयक्तिकरित्या आणि बंदी घातलेली दहशतवादी संघटना लश्कर-ए-तोयबा आणि तिची सक्रिय सहयोगी संघटना ‘द रेझिस्टन्स फ्रंट’ (टीआरएफ) यांचा सूत्रधार म्हणून आरोप ठेवले आहेत. तपास यंत्रणेनुसार हाफिज सईदवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**या हल्ल्यामुळे दोन्ही देशांत तणाव**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या १५ दिवसांनंतर भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. तसेच अनेक कुख्यात दहशतवाद्यांना ठार केले. यानंतर, दोन्ही देशांमधील परिस्थिती बिघडली आणि दोन दशकांतील सर्वोच्च पातळीवर पोहोचली. दरम्यान, पाकिस्तानने भारतीय शहरांना लक्ष्य केल्यानंतर भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने प्रत्युत्तर देत सर्व हल्ले हाणून पाडले. भारताने १४ पाकिस्तानी लष्करी तळ उद्ध्वस्त करून प्रत्युत्तर दिले. यामुळे सावध झालेल्या पाकिस्तानने भारताला शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला, जो दोन्ही देशांमधील परस्पर चर्चेनंतर लागू करण्यात आला.

(वृत्तसंस्था)

### पाकिस्तानच्या कटाचे अनेक पुरावे

एनआयएने म्हटले आहे की, हे पुरवणी आरोपपत्र पूर्वी दाखल केलेल्या मूळ १,५९७ पानांच्या आरोपपत्राचाच विस्तार आहे. यामध्ये पाकिस्तानचा कट, हाफिज सईदची भूमिका आणि तपासादरम्यान गोळा केलेल्या वैज्ञानिक व इतर पुराव्यांचा सविस्तर तपशील समाविष्ट आहे. १५ डिसेंबर २०२५ रोजी दाखल केलेल्या आपल्या पहिल्या आरोपपत्रात, एनआयएने पाकिस्तानी दहशतवादी सूत्रधार साजिद जट्ट जुलै २०२५ मध्ये ऑपरेशन महादेव दरम्यान ठार झालेले तीन दहशतवादी आणि अटक केलेल्या दोन आरोपींची नावे दिली होती. इतकेच नाही, तर तपास यंत्रणेने बंदी घातलेली संघटना लश्कर-ए-तोयबा आणि ‘टीआरएफ’ संघटनांनी पहलगाम हल्ल्याचे नियोजन, सुलभता आणि संचालन केले, असा एनआयएचा आरोप आहे.

## पंजाबमध्ये १३ किलो हेरॉईन जप्त

**चंदीगड, ६ जुलै**

पंजाब पोलिसांच्या अमृतसरमधील काउंटर इंटेलिजन्स युनिटने दोन कथित अमली पदार्थ तस्करी नेटवर्कचा भंडाफोड करत वेगवेगळ्या कारवायांमध्ये १३ किलो हेरॉईन जप्त करुन तिघांना अटक केली. तसेच अमली पदार्थांच्या वाहतुकीसाठी वापरली जाणारी एक कारही जप्त केली.आरोपींमध्ये आकाशदीप सिंग, मंगल सिंग आणि बलजीत सिंगचा समावेश आहे. प्राथमिक तपासात असे उघड झाले की, आरोपी वेगवेगळ्या ठिकाणांहून हेरॉईनचे साठे गोळा करून पंजाबमधील विविध गटांना पुरवण्याचे काम करत होते.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘आर्यभट्ट का झिरो’त हिमांश मुख्य भूमिकेत




**मुंबई :** ‘यारियां’, ‘स्टूडेंट ऑफ द ईयर २’ यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारलेल्या हिमांश कोहलीचा नवीन चित्रपट ‘आर्यभट्ट का झिरो’ आहे. ‘आर्यभट्ट का झिरो’ ही डेहराडूनमधील एका वस्तीची कथा आहे. यात हिमांशची भूमिका ब्रह्मगुप्त श्रीवास्तव उर्फ बग्गूची आहे, ज्याला त्याचे वडील नेहमी ‘झिरो’ मानतात. वडिलांना वाटते की, मुलाने त्यांच्या हयातीत काहीतरी बनावे, तर बग्गू स्वतःच्या स्वप्नांचे जग निर्माण करू इच्छितो. ही वडील-मुलाच्या संघर्षाची कथा असण्यासोबतच, आपल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या प्रत्येक तरुणाची कथा आहे. चित्रपटात सोनाली सहगल, रवी किशन, नीरज सूद, अल्का अमीन, राजेश शर्मा, दर्शना बानिक, गोपाल दत्त आणि शिल्पा शिंदे यांसारखे कलाकार आहेत.

### वीकेंडला मसुरीमध्ये पोहोचला शाहिद कपूर



**मसुरी :** बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूर वीकेंडला मसुरीमध्ये दिसला. यावेळी त्याने स्थानिक लोक आणि चाहत्यांसोबत फोटोही काढले. शाहिद कपूर मुलीच्या प्रवेशासाठी वुडस्टॉक शाळेत पोहोचला होता. वुडस्टॉक शाळेत या वर्षाचा दुसरा समर प्रोग्राम सुरू आहे. यात देश-विदेशातील १५१ मुले सहभागी होत आहेत. शाळेच्या आवारात पोहोचल्यावर शाहिद कपूरने मुख्य शाळेच्या इमारतीला भेट दिली. त्याने कॅफेटेरिया, वसतिगृह यासह इतर व्यवस्थाही पाहिल्या. यावेळी त्याने मसुरी आणि शाळेच्या परिसरातील नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेतला.

### ओटीटीवरून काढला दिलजितचा चित्रपट




**मुंबई :** ‘पंजाब ९५’ चित्रपटाचे नाव बदलून ओटीटी प्लॅटफॉर्म झी-५ वर प्रदर्शित झालेला दिलजित दोसांझचा ‘सतलज’ चित्रपट दोन दिवसांनंतर अचानक प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्यात आला. खालडा साहेबांसोबत जे घडले, तेच चित्रपटात दाखवले होते, असे यावर दिलजितचे म्हणणे आहे. तर, सध्याची परिस्थिती पाहता पुढील आदेशापर्यंत ‘सतलज’ उपलब्ध राहणार नाही, असे ओटीटी प्लॅटफॉर्म झी-५ चे म्हणणे आहे. आम्ही कायदेशीर प्रक्रियेंतर्गत प्रत्येक योग्य पर्याय शोधण्यासाठी कटिबद्ध आहोत; जेणेकरून हा चित्रपट लवकरच पुन्हा प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून देता येईल. खरं तर तीन वर्षांच्या दीर्घ संघर्षानंतर ‘पंजाब ९५’ हा चित्रपट ‘सतलज’ या नावाने प्रदर्शित करण्यात आला होता. चित्रपट चालला, पण अचानक तो काढून टाकण्यात आला.

# सहा दहशतवाद्यांना दिल्लीत अटक

## शहजाद भट्टी नेटवर्कचे दोन गट उद्ध्वस्त

**नवी दिल्ली, ६ जुलै**

दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने कुख्यात शहजाद भट्टी नेटवर्कचे दोन वेगवेगळे गट उद्ध्वस्त केले आहेत. पोलिसांनी दिल्ली आणि पंजाबच्या विविध भागांत छापे टाकून सहा संशयितांना अटक केली. अटक केलेल्या संशयितांकडून मोठ्या प्रमाणात अवैध शस्त्रे, पिस्तूल आणि धोकादायक पेट्रोल बॉम्ब जप्त करण्यात आले.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, अटक केलेले आरोपी दोन अत्यंत धोकादायक आणि वेगवेगळ्या नेटवर्कद्वारे आपल्या कारवाया करत होते.

पहिला गट थेट दहशतवादी कारवाया आणि राष्ट्रविरोधी कटांशी संबंधित होता आणि एक मोठी अनुचित घटना घडवून आणण्याची योजना आखत होता. तर दुसरा गट केवळ अवैध शस्त्रांची तस्करी, गुन्हेगार आणि गुंडांना शस्त्रे पुरवण्यात गुंतलेला होता.

(वृत्तसंस्था)

### आंतरराज्यीय संबंधांचा संशय

प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे की, हे संपूर्ण नेटवर्क अत्यंत संघटितपणे कार्यरत होते. या नेटवर्कचे देशभरातील इतर अनेक राज्यांशी संबंध असल्याचा पोलिसांना संशय आहे. अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीतून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.

# रशियाचा कीव्हवर क्षेपणास्त्र-ड्रोन हल्ला

## ११ ठार, ६० पेक्षा जास्त जखमी

**कीव्ह, ६ जुलै**

रशियाने सोमवारी पहाटे कीव्हवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा केला. या हल्ल्यात किमान ११ जण ठार झाले असून, यामुळे युक्रेनच्या हवाई संरक्षण प्रणालीतील त्रुटी अधिक स्पष्ट झाल्या आहेत. रशियाने डागलेली सर्व क्षेपणास्त्रे लक्ष्यावर धडकली. यावरून पेट्रियाट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांची कीव्हमधील वाढती कमतरता अधोरेखित झाली.

युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांनी मोठ्या प्रमाणावरील हल्ला होण्याची शक्यता वर्तवल्यानंतर काही तासांतच हा हल्ला झाला. थेट मारा झालेल्या दोन ठिकाणच्या निवासी उंच इमारतींच्या ढिगाऱ्याखालून अडकलेल्यांचा शोध घेण्यासाठी आपत्कालीन पथके शोधकार्य करीत असताना आणखी ६० जण जखमी झाले. गुरुवारी राजधानीत झालेल्या रशियन हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू झाला होता. जो या वर्षातील राजधानीवरील सर्वांत भीषण हल्ला ठरला. त्यानंतर काही दिवसांतच हा नवीन हल्ला झाला. हा मारा युक्रेनने अलिकडे केलेल्या लांब पल्ल्याच्या हल्ल्यांना दिलेले प्रत्युत्तर होते. युक्रेनत्या या हल्ल्यांमुळे रशियात इंधनाचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यावर दबाव वाढला आहे.



रशियाच्या हल्ल्यामुळे इमारतींची अशी अवस्था झाली

रशियाने युक्रेनवर पूर्ण क्षमतेने आक्रमण करून चार वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला असतानाच, अलिकडच्या काही महिन्यांत युक्रेनने ड्रोन तंत्रज्ञानात केलेल्या प्रगतीमुळे त्यांना एक वरचढ स्थिती प्राप्त झाली आहे, असे विश्लेषक आणि पाश्चात्त्य देशांचे अधिकाऱ्यांचे मत आहे. आघाडीच्या रेषेच्या मागील बाजूस असलेल्या पुरवठा मार्गांवर केलेल्या हल्ल्यांमुळे रशियन सैन्याची रणांगणावरील गती मंदावली आहे. त्यामुळे ही मोहीम त्यांच्यासाठी खूप खर्चिक ठरली आहे, असे पाश्चात्त्य देशांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

### रशिया-क्रिमियात युक्रेनचे हल्ले

रशियाच्या ताब्यात असलेल्या क्रिमियातील एका ऊर्जा पुरवठादार कंपनीने बाह्य अपघातामुळे संपूर्ण द्विपकल्पात वीजपुरवठा खंडित झाल्याचे सांगितले. रशियाने नियुक्त केलेल्या सेव्हास्तोपोलचे प्रमुख मिखाईल राजव्होझायेव्ह यांनी सांगितले की, युक्रेनच्या हल्ल्यांमुळे सोमवारी पहाटे शहराचा पुरवठा खंडित झाला होता. परंतु, नंतर बॅकअप उपकरणांचा वापर करूनव तो पूर्ववत करण्यात आला.

## कोनी आयलंडमध्ये गोळीबार, आठ जखमी

**वॉशिंग्टन, ६ जुलै**

न्यूयॉर्क शहरात गोळीबाराची एक मोठी घटना घडली आहे. ब्रुकलिनच्या कोनी आयलंड परिसरात फोर्थ ऑफ जुलैच्या पार्टीदरम्यान एका बंदूकधाऱ्याने गोळीबार केला. न्यूयॉर्क पोलिस विभागाच्या (एनवायपीडी) माहितीनुसार, या घटनेत चार मुलांसह किमान आठ जण जखमी झाले आहेत. वृत्तानुसार, ही घटना शनिवारी रात्री सुमारे १०:३५ वाजता घडली. काळे कपडे आणि काळा स्की मास्क घातलेला एक अज्ञात व्यक्ती घटनास्थळी आला. तो सर्फ अव्हेन्यूजवळील एका कुंपणाजवळ गेला आणि त्यानंतर ज्या घरात एक कुटुंब उत्सव साजरा करत होते.

# ‘युजरनेम’ समस्येवर उत्तर देण्यासाठी केंद्राकडून मुदतवाढ

**नवी दिल्ली, ६ जुलै**

व्हॉट्सॲपच्या ‘युजरनेम’ समस्येवर उत्तर देण्यासाठी मेटा कंपनीला दिलेली मुदत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने आणखी वाढवली आहे. आता नवीन मुदत ९ जुलै असेल. या आठवड्याच्या सुरुवातीला मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी या मेसेजिंग प्लॅटफॉर्मवरील युजरनेम फिचरबाबत उत्तर देण्यासाठी व्हॉट्सॲपला ६ जुलैपर्यंतची मुदत दिली होती. केंद्र सरकारने व्हॉट्सॲपच्या युजरनेम’ या ‘फिचर’बाबत सविस्तर स्पष्टीकरण मागितल्यानंतर मेटा कंपनीला ही नोटीस बजावण्यात आली आहे.

**मेटा कंपनीला बजावली नोटीस**

व्हॉट्सॲपने एक युजरनेम फिचर आणले आहे, ज्याद्वारे वापरकर्त्यांना त्यांचा फोन नंबर शेअर न करताही प्लॅटफॉर्मवर मेसेज करता येऊ शकेल. मेटाने पुढे स्पष्ट केले आहे की, हे युजरनेम वापरकर्त्याच्या प्रोफाईलवर दिसणाऱ्या डिस्प्ले नेमपेक्षा वेगळे आहे. ‘डिस्प्ले नेम’ हे युनिक असणे बंधनकारक नाही, परंतु ‘युजरनेम‘ मात्र प्रत्येक अकाऊंटसाठी युनिक म्हणजेच एकमेव असेल. दरम्यान, या प्रकरणावरील चर्चा पूर्ण होईपर्यंत हे फिचर भारतात लागू करू नये, असा निर्देश सरकारने मेटा कंपनीला दिला



आहे. नवीन ‘फिचर’ आणण्यामागे प्रायव्हसी (गोपनीयता) आणि सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः, दुसऱ्याच्या नावाने बनावट अकाउंट तयार करणे आणि त्याचा गैरवापर होण्याचा धोका वर्तवला जात आहे.

(वृत्तसंस्था)

### गुन्हेगारांना शोधणे होणार कठीण

तज्ज्ञांच्या मते, व्हॉट्सअपच्या या नवीन फिचरमुळे गुन्हेगार एखाद्याची फसवणूक करण्यासाठी किंवा स्वतःची खोटी ओळख दाखवून बनावट कॉल्स करण्यासाठी बनावट प्रोफाइल तयार करू शकतात. सर्वांत मोठी समस्या ही आहे की, यामुळे कायदा अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना गुन्हेगार भारतात आहे की परदेशात, हे शोधणे कठीण होईल. उद्या कोणीही +१ (अमेरिका) कोड असलेला नंबर वापरून व्हॉट्सअप अकाऊंट तयार करू शकतो, कोणाचाही फोटो वापरू शकतो, तशाच प्रकारचे युजरनेम ठेवून फसवणुकीचे कॉल्स करू शकतो. पूर्वी जर नंबर +९१ (भारत) ने सुरू होत असेल, तर आम्ही किमान कारवाई सुरू करू शकत होतो. परंतु, जर फोन नंबरच उपलब्ध नसेल, तर अशा प्रकरणांचा तपास करणे जवळजवळ अशक्य असल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# लोककलेतील तेजस्वी ताऱ्याचे निखळणे...

काही व्यक्तिमत्त्वे आपल्या उत्तुंग कामगिरीच्या बळावर अमिट ठसा उमटवून जातात. त्यातील एक नाव म्हणजे पंडवानी या लोककला प्रकाराद्वारे महाभारताचे सादरीकरण करून ही लोककला सातासमुद्रापार नेणाऱ्या कलावंत तीजनबाई. तीजनबाई यांच्या निधनासोबत पंडवानी लोककलेचा एक अध्याय समाप्त झाला आहे. एखाद्या कठीण खडकातून झिरपणारा लहानसा झरा गंगा नदीप्रमाणे विशाल रूप धारण करतो आणि इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो. त्यांच्या आयुष्याकडे पाहून असे म्हणावे लागते. संघर्ष, जिद्द, प्रतिभा आणि आत्मविश्वास यांच्या संगमातून तीजनबाई यांनी पंडवानी लोककलेचे विश्व प्रकाशमान केले होते. छत्तीसगडच्या साध्या मातीत जन्मलेली ही कन्या सुरुवातीला कुणाच्याही नजरेत भरली नव्हती. पण, जसा खाणीतून निघालेला हिरा पैलू पाडल्यावर तेजस्वी होतो, त्याचप्रमाणे त्यांच्यातील कलाविष्कार काळासोबत अधिकाधिक झळाळून उठला. तीजनबाई यांनी पंडवानीला विलक्षण उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या पश्चात आता पंडवानी लोककलेचे काय होणार, असा प्रश्न स्वाभाविकच उपस्थित झाला आहे. काळच त्याचे उत्तर देईल, पण तीजनबाई कधीही विस्मरणात जाणार नाहीत.

लोककला ही कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीची जिवंत अभिव्यक्ती असते. ती केवळ मनोरंजनाचे साधन नसते. समाजाचा इतिहास, तत्त्वज्ञान, लोकजीवन, श्रद्धा आणि सामूहिक अनुभव जतन करणारी ती परंपरा असते. छत्तीसगडच्या मातीत रुजलेली पंडवानी ही अशीच एक अद्वितीय लोककला आहे. पंडवानी म्हणजे पांडवांची अर्थात महाभारताची कथा. गायन, अभिनय, संवाद, नाट्यमय निवेदन आणि संगीताच्या साहाय्याने महाभारत जिवंत करणारी ही कला अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आहे. लोकभाषा, लोकसंगीत, अभिनय आणि कथनकलेचा अद्भुत संगम म्हणजे पंडवानी. ही कला महाभारतातील प्रसंगांना शब्द, स्वर आणि भाव यांच्या माध्यमातून नवजीवन देते. या कलेत गायक कथा तर सांगतोच, शिवाय तो प्रत्येक पात्रात स्वतःला झोकून देतो आणि त्या व्यक्तिरेखा श्रोत्यांसमोर जिवंत करतो. पंडवानीचे वैशिष्ट्य म्हणजे सहजता आणि जिवंतपणा. हातातील तंबुरी कधी अर्जुनाचे गांडीव बनते, कधी भीमाची गदा, तर कधी श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र. गायकाच्या हावभावांतून, आवाजातील चढ-उतारांतून आणि देहबोलीतून संपूर्ण महाभारत रसिकांच्या डोळ्यांसमोर साकार होते. त्यामुळे पंडवानी ऐकण्याचा अनुभव हा केवळ श्रवणाचा अनुभव नव्हे, तो कल्पनाशक्ती जागी करणारा दृश्य अनुभव ठरतो. या कलेत वीर रसाची गर्जना, करुण रसाची आर्तता, भक्तीची पावनता आणि जीवनतत्त्वज्ञानाची गहनता यांचा सुरेख मिलाफ दिसून येतो. प्रत्येक सादरीकरण म्हणजे लोकजीवनातील मूल्ये, नातेसंबंध, धर्म, कर्तव्य आणि मानवतेचा शोध घेणारा एक सांस्कृतिक सोहळा असतो. म्हणूनच पंडवानी ही मनोरंजनाच्या पल्याड संस्कार, परंपरा आणि इतिहास यांचे जतन करणारी सजीव लोकविद्या ठरते. पंडवानी म्हणजे लोकमनाच्या स्मृतीत अखंड वाहणारी संस्कृतीची नदी. तिच्या स्वरांत इतिहास बोलतो, तिच्या कथनात लोकजीवन धडधडते आणि तिच्या भावविश्वात भारतीय संस्कृतीचे शाश्वत मूल्य प्रतिबिंबित होते. पंडवानी हा भारतीय लोककलेच्या आत्म्याचा श्वास आणि पिढ्यानपिढ्या वाहत आलेल्या सांस्कृतिक परंपरेचे चिरंतन प्रतीक आहे.

या कलेला जागतिक पातळीवर नेण्याचे श्रेय निर्विवादपणे तीजनबाई यांना जाते. त्यांनी आपल्या विलक्षण आवाजाने, प्रभावी देहबोलीने आणि अभिनयाच्या अफाट सामर्थ्याने पंडवानीला एका प्रादेशिक लोकपरंपरेतून जागतिक सांस्कृतिक मंचावर नेऊन उभे केले. इतिहास सांगतो की लोककला कधीच एका कलाकाराच्या भरवशावर विकसित होत नाही. ती पिढ्यानपिढ्या वाहणाऱ्या परंपरेतून पुढे सरकत राहते. तरीही काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांच्या अस्तित्वामुळे एखाद्या कलेला नवे आयाम आणि नवी शिखरे मिळतात. तीजनबाई यांचे पंडवानी लोककलेच्या संदर्भातील स्थान असेच आहे. त्यांनी पंडवानीच्या अभिव्यक्तीची व्याप्ती विस्तारली. स्त्रियांना या क्षेत्रात स्वतंत्र स्थान मिळवून देण्यात त्यांचे योगदान ऐतिहासिक आहे. तीजनबाई यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द आणि कलेवरील निष्ठेचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांचा जन्म छत्तीसगडमधील एका अत्यंत गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण घेण्याची संधी त्यांना फारशी मिळाली नाही. परंतु, लोककलेबद्दलची ओढ मात्र दिवसेंदिवस वाढत गेली. त्या काळात पंडवानी ही कला मुख्यतः पुरुषांकडून सादर केली जात असे. आता त्यांच्या शिष्यांना ही परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू ठेवावा लागणार आहे. कोणत्याही गुरूची शैली, आवाजातील नैसर्गिक ताकद, रंगमंचावरील करिष्मा आणि प्रेक्षकांशी निर्माण होणारे भावनिक नाते यांची पुनरावृत्ती करणे शक्य नसते. त्यामुळे पंडवानीच्या भविष्यातील कलाकारांनी तीजनबाई यांची नक्कल करण्याऐवजी त्यांच्या वारशातून प्रेरणा घेऊन स्वतःची स्वतंत्र अभिव्यक्ती निर्माण करणे अधिक आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात लोककलांसमोर एक वेगळेच आव्हान उभे आहे. मनोरंजनाची साधने बदलली आहेत. सामाजिक माध्यमांच्या वेगवान जगात दीर्घ कथनपर लोककलेला प्रेक्षक मिळवणे कठीण झाले आहे. परंतु, याच तंत्रज्ञानामध्ये पंडवानीच्या पुनरुज्जीवनाची संधीही दडलेली आहे. डिजिटल संग्रहालये, माहितीपट, ऑनलाईन कार्यशाळा, विद्यापीठांतील अभ्यासक्रम, युट्युबवरील सादरीकरणे आणि बहुभाषिक दस्तावेजीकरण यांच्या माध्यमातून पंडवानी नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकते. संशोधनाच्या दृष्टीने पंडवानी हा भारतीय मौखिक लोकपरंपरेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा स्रोत आहे. तिच्यात लोकभाषा, संगीत, अभिनय, सामाजिक मानसशास्त्र, सांस्कृतिक इतिहास आणि स्त्री-अभिव्यक्ती यांचे अनेक स्तर दडलेले आहेत. त्यामुळे विद्यापीठे, संशोधन संस्था आणि सांस्कृतिक अकादमी यांनी या कलेवर अधिक सखोल संशोधन करणे आवश्यक आहे. तीजनबाई यांच्या सादरीकरणांचे ध्वनी व दृश्य संग्रह, त्यांच्या मुलाखती, शैली वैशिष्ट्ये आणि जीवनप्रवास यांचे शास्त्रीय दस्तावेजीकरण ही काळाची गरज आहे. शासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. लोककलावंतांना आर्थिक स्थैर्य, प्रशिक्षण केंद्रे, नियमित महोत्सव, शिष्यवृत्ती, शालेय अभ्यासक्रमात लोककलांचा समावेश आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण यासारख्या उपाययोजना राबवल्यास पंडवानीचे भवितव्य अधिक सुरक्षित होईल. आपल्या लोकपरंपरांवर प्रेम करणारा समाजच त्या परंपरांना दीर्घायुष्य देतो. त्यामुळे पंडवानीला केवळ उत्सवापुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन सांस्कृतिक जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. तीजनबाई यांनी आपल्या कलेतून महाभारताला लोकभाषेत नवा अर्थ दिला. त्यांच्या आवाजात भीमाचा पराक्रम, अर्जुनाचे शौर्य, द्रौपदीचा स्वाभिमान आणि श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान जिवंत होत असे. त्यांच्या जाण्यानंतर तो आवाज कदाचित ऐकू येणार नाही. परंतु त्यांनी चेतविलेली सांस्कृतिक ज्योत विझू नये. पंडवानीचे भविष्य एखाद्या कलाकारावर अवलंबून नाही हे खरेच; तरीही तीजनबाईंचे जाणे एखादा लख्ख तारा निखळल्यागत टोचते आहे. तीजनबाई यांच्या वारशाचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीकडे हस्तांतरण करणे ही कलाकार, संशोधक, शासन, सांस्कृतिक संस्था आणि रसिक समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. व्यक्ती नश्वर असते. परंतु, तिच्या कार्यातून निर्माण झालेली सांस्कृतिक परंपरा अमर होऊ शकते. तीजनबाई यांचे कार्य हे याच अमरत्वाचे तेजस्वी उदाहरण आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# हसीना यांच्या भूमिकेने राजकीय हादरा

**प्रा. जयसिंग यादव**

इतिहासाची एक विलक्षण सवय असते. तो कधीच कोणत्याही नेत्याला कायमचा निरोप देत नाही. एका हाताने तो सत्तेचा मुकुट हिसकावून घेतो तर दुसऱ्या हाताने पुनरागमनाची आशा जिवंत ठेवतो. कालपर्यंत ज्यांच्या एका शब्दावर संपूर्ण राष्ट्राचे राजकारण फिरत होते, त्याच नेत्याला आज निर्वासिताचे जीवन जगावे लागते आणि निर्वासनात असतानाच तो पुन्हा मायभूमीत परतण्याची घोषणा करतो. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी 'याच वर्षी मी बांगलादेशमध्ये परतणार' असे जाहीर करताच ढाक्यापासून दिल्लीपर्यंतच्या राजकीय वर्तुळात पुन्हा खळबळ उडाली. एका वाक्याने संपूर्ण राजकीय पट पुन्हा हलू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. बांगलादेशच्या विकासाचा चेहरा म्हणून गौरवल्या जाणाऱ्या हसीना आज शेकडो गुन्ह्यांना सामोऱ्या जात आहेत.

हसीना यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने वस्त्रोद्योगात जागतिक स्थान मिळवले, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण वाढले, पायाभूत सुविधा विस्तारल्या, गरिबीमध्ये घट झाली आणि आर्थिक वाढीचे अनेक विक्रम नोंदवले. दुसरीकडे विरोधकांवरील कारवाई, प्रसारमाध्यमांवरील निर्बंध, निवडणुकांच्या निष्पक्षतेबाबतचे प्रश्न आणि वाढती केंद्रीकृत सत्ता यांमुळे त्यांच्यावर सातत्याने टीकाझाली. म्हणूनच आज त्यांच्याबद्दलचा जनमताचा कौल सरळ नाही, तर तो आशा आणि अविश्वास यांच्या मधोमध उभा आहे. २०२४ मधील विद्यार्थी आंदोलनाने बांगलादेशचा राजकीय इतिहास बदलला. हजारो तरुण रस्त्यावर उतरले. बेरोजगारी, आरक्षण, प्रशासनातील कथित दडपशाही आणि लोकशाही संस्थांवरील प्रश्न या सगळ्यांनी आंदोलनाला वेग दिला. अखेरीस सत्तेचा अभेद्य किल्ला कोसळला आणि हसीना यांना देश सोडावा लागला. अवामी लीग हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याशी जोडलेला भावनिक वारसा आहे. राष्ट्रपिता शेख मुजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली जन्मलेला हा पक्ष आजही त्यांच्या कुटुंबाभोवती फिरतो. त्यामुळे हसीना यांनी पक्षाचे नेतृत्व दुसऱ्याच्या हाती दिले असते, तर तो केवळ संघटनात्मक बदल ठरला नसता, तर मुजीब कुटुंबाच्या राजकीय वारशाच्या अस्तित्वालाच आव्हान ठरला असता. त्यामुळे त्यांनी स्वतःच पुनरागमनाची घोषणा करून हा वारसा अजूनही आपल्या हातात असल्याचा संदेश दिला आहे; पण प्रश्न केवळ अवामी लीगचा नाही. प्रश्न आहे बांगलादेशमधील लोकशाहीचा. एखादा नेता कितीही लोकप्रिय असला, तरी लोकशाहीची ताकद व्यक्तीपेक्षा संस्थांमध्ये असते. न्यायालये स्वतंत्र असली पाहिजेत, निवडणुका विश्वासार्ह असल्या पाहिजेत आणि विरोधी पक्षाला राजकीय अवकाश मिळाला पाहिजे. दुर्दैवाने दक्षिण आशियामध्ये ही तीनही तत्त्वे अनेकदा राजकीय संघर्षात हरवून जातात. भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध गेल्या दशकात एका नव्या उंचीवर पोहोचले. सीमावादाचा तोडगा, ईशान्य भारतासाठी संपर्कमार्ग, दहशतवादविरोधी सहकार्य, ऊर्जा देवाणघेवाण आणि व्यापारवाढ यामुळे दोन्ही देशांमध्ये विश्वासाचे नवे पर्व सुरू झाले. या प्रक्रियेत हसीना यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे त्यांचे राजकीय भवितव्य भारतासाठीही धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे; मात्र भारताने आजवर संयमाची भूमिका घेतली आहे. कारण शेजारी देशांच्या अंतर्गत राजकारणात प्रत्यक्ष हस्तक्षेप केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. या संपूर्ण घटनाक्रमात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्याय आणि सूड यातील सीमारेषा. एखाद्या नेत्यावर गंभीर आरोप असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे; पण न्यायव्यवस्था राजकीय सूडाचे साधन बनली, तर लोकशाहीवरील विश्वास डळमळतो. आज हसीना यांच्या समर्थकांचा दावा आहे, की त्यांच्यावरील अनेक खटले हे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. विरोधक मात्र त्यांना कायद्यापुढे उत्तरदायी ठरवण्याची मागणी करतात. सत्य नेमके कुठे आहे, हे न्यायसंस्थेलाच ठरवावे लागेल. राजकारणातील पुनरागमनाच्या कथा लोकांना अनेकदा आकर्षित करतात. कारण त्या आशेच्या कथा असतात. पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याच्या कथा असतात; पण प्रत्येक पुनरागमन यशस्वीच होईल, याची शाश्वती नसते.

पाकिस्तानमध्ये नवाज शरीफ परतले; पण राजकीय समीकरणे बदलली होती. इम्रान खान आज तुरुंगात असूनही जनमताचा केंद्रबिंदू आहेत. श्रीलंकेत राजपक्षे घराण्याची ताकद कमी झाली. नेपाळमध्ये नेतृत्व वारंवार बदलते. दक्षिण आशियातील लोकशाही अजूनही व्यक्तींच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त झालेली नाही. हसीना यांच्या बाबतीतही हेच सत्य आहे. त्या परततील. त्यांना कदाचित अटकही होईल, न्यायालयीन लढाईही सुरू राहील; पण त्यांच्या एका घोषणेमुळे एवढे स्पष्ट झाले आहे, की त्या अजूनही बांगलादेशच्या राजकारणातील सर्वांत प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांच्या अनुपस्थितीतही राजकारण त्यांच्याभोवती फिरते, हेच त्यांच्या राजकीय वजनाचे प्रतीक आहे; परंतु अखेरीस प्रश्न एका व्यक्तीचा नाही, तर एका राष्ट्राच्या राजकीय परिपक्वतेचा आहे. लोकशाहीची खरी ताकद सत्तांतरात नसते, तर सत्तांतरानंतरही संवाद टिकवून ठेवण्यात असते. विरोधकांना संपवणे सोपे असते. त्यांच्याशी स्पर्धा करत लोकशाही मजबूत करणे कठीण असते. बांगलादेश आज या दोन मार्गांच्या फाट्यावर उभा आहे. हसीना यांच्या पुनरागमनाची घोषणा म्हणूनच एका व्यक्तीच्या इच्छेपेक्षा अधिक मोठी आहे. ती इतिहासाशी संवाद साधणारी घोषणा आहे. ती सत्तेच्या क्षणभंगुरतेची आठवण करून देणारी आहे. ती दक्षिण आशियातील लोकशाहीला स्वतःकडे पुन्हा पाहण्यास भाग पाडणारी आहे. उद्या त्या बांगलादेशमध्ये परततील किंवा नाहीत, हा प्रश्न काळ उत्तर देईल; पण त्यांच्या या घोषणेने एक गोष्ट निश्चित केली आहे, ती म्हणजे इतिहासाने अजून त्यांच्यावर पूर्णविराम दिलेला नाही. त्याने फक्त आणखी एक स्वल्पविराम टाकला आहे.

राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांची उपस्थितीच संपूर्ण राजकीय समीकरणे बदलून टाकते. हसीना या अशाच नेत्यांपैकी एक आहेत. सत्तेवरून हकालपट्टी, शेकडो गुन्हे, मृत्युदंडाची शिक्षा, भारतातील वास्तव्यासारख्या अभूतपूर्व घटनांनंतर आता 'याच वर्षी मी बांगलादेशात परतणार' या त्यांच्या घोषणेने ढाका आणि नवी दिल्ली या दोन्ही राजधान्यांमध्ये राजकीय चर्चांना वेग आला आहे. ही केवळ एका माजी पंतप्रधानाच्या पुनरागमनाची घोषणा नाही, तर बांगलादेशच्या भविष्यातील राजकारण, लोकशाही, भारत-बांगलादेश संबंध आणि दक्षिण आशियातील सामरिक समीकरणांवर परिणाम करू शकणारी घटना आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# एनजीओच्या दुकानदारीवर लगाम

मोदी सरकारचा प्रत्येक निर्णय हा भारतीयत्वाने भारलेला असतो. त्यामध्ये देश आणि सामान्य नागरिकांच्या हिताला बाधा येणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली जाते. अशाच एका निर्णयाने पुन्हा एकदा काँग्रेस आणि मोदी विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे या सर्वांची तळपायातली आग मस्तकात गेली असून, संपूर्ण इकोसिस्टिम बैचेन आहे. देशामधील गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांना मिळणाऱ्या विदेशी देणग्यांबाबत केंद्र सरकारने केलेले कडक नियम हीच त्याची मूळ समस्या आहे. विदेशी पैशावर राजरोसपणे चालणारी आपली दुकानदारी यापुढे बंद होईल; या धास्तीने या सर्वांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे या कायद्यामधील नवीन सुधारणा रद्द करण्यासाठी या सर्वांनी आकाश पाताळ एक करणे सुरू केले असून, पुन्हा एकदा या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर आगपाखड सुरू केली आहे. या संस्थांना विदेशातून मिळणारा पैसा मूळ उद्देशासाठी कधीच वापरला जात नाही आणि देणाऱ्याचाही उद्देश वेगळाच असतो. भारताला आतून पूर्णपणे पोखरून काढणे या एकमेव उद्देशाने विदेशातून पैशाचा ओघ सतत सुरू असतो. भारतीयांचे धर्मांतरण करून येथील डेमोग्राफी बदलून आपले वर्चस्व स्थापित करण्यासाठी हा पैसा मागील अनेक दशकांपासून वापरला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाजसेवेच्या नावाखाली विदेशातून येणारा पैसा जर भारतीयत्व नष्ट करण्यासाठी वापरला जात असेल तर ही बाब कोणताही देशभक्त कधीच सहन करणार नाही. त्यामुळे मिळणाऱ्या परकीय निधीबाबत कठोर नियम केले आहेत.



विदेशातून येणारा पैसा नेमका कोठे आाणि कसा वापरला याबाबत यापुढे सरकारला पूर्ण हिशेब द्यावा लागणार आहे. पूर्वी असा कोणताही नियम नसल्याने या कथित स्वयंसेवी संस्था देशातील हिंदू व आदिवासी यांची मूळ सभ्यता आणि आणि संस्कृती नष्ट करण्यासाठी हा पैसा वापरत असल्याचा सतत आरोप होत होता. हा आरोप तथ्यहीन आहे, असेही नाही. २०१४ मध्ये जेव्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले त्यावेळी देशामध्ये जवळपास चाळीस हजार गैरसरकारी स्वयंसेवी संस्थांना देणग्या मिळत होत्या. अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर २० हजार ७०० स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द केले गेले. २०२०-२०२२ दरम्यान १३ हजार ५२० स्वयंसेवी संस्थांना ५५ हजार कोटी रुपयांच्या विदेशी देणग्या या संस्थांना मिळाल्या. या पैशाचा विनियोग देशामध्ये कशाप्रकारे केला गेला, याचा हिशेबच या संस्थोजवळ नाही. त्यामुळे यापुढेही अशीच ही दुकानदारी सुरू राहिली तर भविष्यामध्ये भारतावर केवढे मोठे गंभीर संकट येऊ शकते याची कल्पनाही न केलेली बरी. नवीन नियमानुसार या स्वयंसेवी संस्थांना यापुढे मिळालेल्या एकेका पैशाचा हिशेब सरकारला द्यावा लागणार आहे. त्यामुळे काँग्रेसने तर हा नवीन कायदाच रद्द करण्याची मागणी केली आहे. यापुढे धर्मांतरण होणार नाही. बाहेरून पैसा येणार नाही. पक्ष कसा चालवायचा हा प्रश्न काँग्रेससमोर उभा राहिला आहे. मानवतेच्या कल्याणासाठी जगामधील बलाढ्य देश दरवर्षी अब्जावधी रुपये कधीच खर्च करणार नाही. पाश्चिमात्य देशांचा इतिहास पाहिला तर अनेक धक्कादायक बाबी समोर येतील. काँग्रेसच्या राजवटीमध्ये हा गोरखधंदा सर्वाधिक फोफावला. सर्व काही बिनदिक्कत सुरू होते. काँग्रेसला या राष्ट्राच्या संस्कृतीशी काहीएक देणेघेणे नाही. राष्ट्रहिताचा कोणताही निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला की, काँग्रेसच्या व अन्य विरोधकांच्या पोटामध्ये दुखते. सर्व जंतरमंतरकडे धाव घेतात. त्यामुळे राष्ट्रदोहच यांचा धर्म बनला की काय अशी शंका निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक विदेशी कटकारस्थानामध्ये यांचा सहभाग आहे किंवा नाही याची सखोल चौकशी करून सरकारने सोक्षमोक्ष लावायला हवा. त्यामुळे जनतेलाही खरे काय ते कळायला सोपे होईल. धर्मांतरण ही राष्ट्राला हळूहळू पोखरणारी कीड आहे. त्यामुळे विदेशी पैशावर चालणारे हे कारस्थान उधळून लावण्याचे प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकांचे कर्तव्य आहे. त्यासाठी एक सजग प्रहरी म्हणून प्रत्येकाने डोळ्यात तेल घालून आपल्या सभोवताल लक्ष ठेवायला हवे. ■

९८८१७१७८५६

## कानोसा

# तरुणांच्या तेजाला आवाहन

**अमोल पुसदकर**

हे वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रम संपूर्ण देशभर आयोजित करण्यात आलेले आहेत. आता सर्वत्र युवा संमेलन असे कार्यक्रम सुरू आहेत. भारत हा तरुणांचा देश आहे. याचा अर्थ असा की, भारतामध्ये राहणारी जवळपास ६५ टक्के जनता ही ३५ पर्यंतच्या वयोगटातील आहे. या देशामध्ये जी काही क्रांती झालेली आहे, नवीन गोष्ट झालेली आहे, ती तरुणांनीच केलेली आहे. आर्य चाणक्यांनी तरुण चंद्रगुप्ताच्या मदतीने क्रांती घडवून आणली आणि नंद वंशाचा अत्याचारी राजा धननंद याचा विनाश केला. भारत छोट्या छोट्या गणराज्यांमध्ये विभागलेला होता. त्यातल्या छोट्या गणराज्यांना एकत्रित करून सिकंदरचा सेनापती सेलूकस याचा पराभव केला व संपूर्ण देशामध्ये अखंडतेची आणि एकतेची भावना निर्माण केली.

महाराणा प्रताप यांनी अकबराच्या विरोधात अगदी वयाच्या सोळाव्या वर्षीच आजन्म लढण्याची प्रतिज्ञा केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा वयाच्या सोळाव्या वर्षीच केली. स्वामी विवेकानंद सुद्धा तरुण वयातच प्रसिद्ध झाले होते. संघ संस्थापक पूजनीय डॉ. हेडगेवार यांनी सुद्धा विद्यार्थी तसेच स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतलेली होती व त्यावेळच्या अनुभव आणि चिंतनातूनच पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना त्यांनी केली. संघ स्थापनेच्या वेळी जे किशोर आणि तरुण होते, तेच पुढे भारतातील विविध प्रांतांमध्ये संघ विचाराच्या प्रचारार्थ गेले व तेथे त्यांनी संघ रुजविला व वाढविला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, सर्व महत्त्वाच्या घटनांमध्ये तरुणांचा सहभाग राहिलेला आहे.

देशाची युवाशक्ती ही देशाचा खूप मोठा आधार आहे. त्यामुळेच ही युवाशक्ती देशभक्त व ध्येयवादी असणे आवश्यक आहे. या युवाशक्तीला देशाचा गौरवशाली इतिहास, आपल्या पूर्वजांनी व क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सन्मानासाठी दिलेला लढा व केलेले बलिदान याची सुद्धा माहिती सांगणे आवश्यक आहे. आज भारत जगातील सर्वांत वेगाने प्रगती करणाऱ्या राष्ट्रांपैकी एक आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, संरक्षण, अवकाश संशोधन, कृषी, शिक्षण, क्रीडा आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांमध्ये भारत नवीन उंची गाठत आहे. परंतु या प्रगतीचा खरा पाया देशातील परिश्रमी, कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रभक्त युवक आहेत. केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसते; त्याबरोबर नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय चारित्र्य यांचीही जोपासना आवश्यक असते. आमच्या धर्मग्रंथांमधून सुद्धा श्रेष्ठ जीवन जगण्यास आवश्यक अशी जीवनमूल्ये तरुणांना मिळू शकतात.

आजच्या काळात युवकांसमोर अनेक संधी आहेत, परंतु त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. मोबाईल, सोशल मीडिया, व्यसनाधीनता, चुकीची माहिती, स्वार्थी जीवनशैली आणि पाश्चात्त्य अंधानुकरण यामुळे अनेक तरुण आपले ध्येय विसरत आहेत. अशा परिस्थितीत योग्य संस्कार, योग्य मार्गदर्शन आणि राष्ट्रहिताची जाणीव निर्माण करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

राष्ट्र प्रथम ही भावना म्हणजे स्वतःचे अस्तित्व विसरणे नव्हे, तर प्रत्येक निर्णय घेताना देशाच्या हिताला सर्वोच्च स्थान देणे होय. आपण कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलो तरी आपल्या कामातून देशाची प्रगती कशी होईल, समाजाचे भले कसे होईल आणि पुढील पिढीसाठी आपण काय योगदान देऊ शकतो याचा सातत्याने विचार करणे हीच राष्ट्र प्रथमची खरी भावना आहे. देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी अगदीच कोवळ्या तरुण वयात आपल्या जीवनाचे बलिदान करणारा सैनिक हा राष्ट्र प्रथम याचे सर्वोच्च उदाहरण आहे. युवकांमध्ये अमर्याद ऊर्जा असते. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली तर राष्ट्रनिर्मिती होते; चुकीच्या दिशेने वापरली तर समाजात अराजकता निर्माण होते. समाजातील काही लोक हे तरुणांना कॉक्रोच म्हणून त्यांचे संघटन करण्याचा प्रयत्न करीत असतात. तरुणांना कॉक्रोच संबोधणे किंवा कॉक्रोचच्या नावावर त्यांचे संघटन करणे म्हणजे त्यांना देशाच्या गौरवशाली इतिहासापासून दूर नेणेच आहे. म्हणूनच युवकांना शिस्त, संघटन, सेवा, समर्पण आणि स्वावलंबन या मूल्यांचे शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. संघटनशक्तीमुळे सामान्य माणूसही असामान्य कार्य करू शकतो. इतिहासात याची अनेक उदाहरणे आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत व्यक्तिनिर्माण, समाजसंघटन आणि राष्ट्रनिर्माण या त्रिसूत्रीवर सातत्याने कार्य केले आहे. शाखेच्या माध्यमातून शारीरिक, बौद्धिक आणि राष्ट्रीय चारित्र्यनिर्मितीचे कार्य घडवून लाखो स्वयंसेवक समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत झाले आहेत. शिक्षण, ग्रामविकास, सेवा, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी आणि संस्कृती संवर्धन अशा अनेक क्षेत्रांत स्वयंसेवक निःस्वार्थ भावनेने कार्य करीत आहेत. तरुणांकरिता देशासाठी आपला वेळ देणारे निःस्वार्थ बुद्धीने काम करणारे असे तरुण स्वयंसेवक हे आदर्श ठरू शकतात. तरुणांनी सुद्धा अशाच कुठल्यातरी कार्यामध्ये स्वतःला जोडून घेणे, वाहून घेणे आवश्यक आहे.

आज भारताला केवळ नोकरी शोधणारे युवक नकोत, तर रोजगार निर्माण करणारे युवक हवे आहेत. संशोधन करणारे, नवीन उद्योग उभारणारे, शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे, पर्यावरणाचे रक्षण करणारे, समाजातील दुर्बल घटकांना हात देणारे आणि देशाला आत्मनिर्भर बनविणारे युवक आजच्या काळाची गरज आहेत.

प्रत्येक युवकाने स्वतःला काही प्रश्न विचारले पाहिजेत. ज्यामध्ये मी माझ्या समाजासाठी काय करीत आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माझ्या राष्ट्रासाठी माझे योगदान काय आहे? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे देण्याचा प्रयत्नच युवकाला महान बनवू शकतात.

देशभक्ती ही केवळ घोषणांमध्ये नसते; ती आपल्या दैनंदिन आचरणात असते. प्रामाणिकपणे काम करणे, कायद्याचे पालन करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, स्वच्छता राखणे, कर प्रामाणिकपणे भरणे, सामाजिक ऐक्य टिकविणे, जाती पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांना आपले मानणे आणि संकटाच्या काळात समाजाच्या मदतीला धावून जाणे, हीच खरी राष्ट्रसेवा आहे. आजच्या युवा पिढीने आपल्या शरीराचे आरोग्य, मनाची शुद्धता, आत्मविश्वास, बुद्धीची प्रगल्भता यांचा सातत्याने विकास केला पाहिजे. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि राष्ट्रभक्त विचार यांच्या आधारावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष हे केवळ एका संस्थेचा वर्धापनदिन नाही, तर राष्ट्रकार्याचा संकल्प अधिक दृढ करण्याची संधी आहे. या निमित्ताने प्रत्येक युवकाने समाजाशी जोडले गेले पाहिजे, सेवाकार्यात सहभागी झाले पाहिजे, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगला पाहिजे आणि भारताला जगातील सर्वश्रेष्ठ राष्ट्र बनविण्याच्या ध्येयासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे. त्यासाठी राष्ट्र प्रथम हा संकल्प आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### राखावी बहुतांची अंतरे, भाग्य तद नंतरे

आपल्या भारतीय समाजाची जडणघडण ही वैविध्यपूर्ण आहे. महाराष्ट्राला तर संतांची महान परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज ते संत तुकडोजी महाराजपर्यंत प्रचंड मोठी मांदियाळी आहे. या सर्व संतानी त्यांच्या आचरणातून आणि साहित्य वाङ्मयातून समस्त समाजाला सदाचार, एकोपा, सलोखा, भक्ती व समरसतेचा संदेश दिला आहे. अभंग, ओव्या, पोवाडे, गीत, श्लोक, प्रवचने उपलब्ध माध्यमातून सामान्य मनुष्याचे जीवन समृद्ध केले आहे.

'राखावी बहुतांची अंतरे, भाग्य तद नंतरे' हा दोन ओळींचा उपदेश अर्थपूर्ण आहे. आपण नेहमी इतरांच्या मनाचा सांभाळ करावा, त्यांना दुखवू नये. जर आपण दुसऱ्याच्या मनातलं जपलं तर आपलं भाग्य आपोआप आपल्या मागे येतं. संत एकनाथ हे समाजाला माणुसकी, नम्रता, आणि समभाव शिकविण्यासाठी ओळखले जातात. ही ओवी त्याच शिकवणीचा भाग आहे. कुटुंब किंवा समाजात अनेक वेळा आपल्याला ही नम्रतेची भूमिका निभवावी लागते. कुटुंबात व्यक्तिपरत्वे वैचारिक भिन्नता असते. एखाद्या क्लिष्ट आणि संवेदनशील विषयांवर सहमती झाली तर कौटुंबिक सौहार्द कायम राहून कुटुंबात सलोखा निर्माण होऊन त्याचे दूरगामी सुखदायक परिणाम येणाऱ्या पिढीवर होतात, त्यांना शिकवण मिळते. थोरामोठ्यांचा मानसन्मान राखला जातो आणि कुटुंबात एकतेची भावना निर्माण होऊन सुख- दुःखात त्याची प्रचीती येते. वैचारिक मतभेद हे समाजात अपेक्षित आहेत. 'मुंडे-मुंडे मर्ती भिन्नः' प्रमाणे विचार मंथन, चिंतन व मतपरिवर्तन करून सहमती प्राप्ती करून घेणे, ही तारेवरची कसरत असते. हे कार्य करण्यासाठी त्या व्यक्तीमध्ये अनुभव, मुत्सद्देगिरी, मृदुभाषी व इतरांप्रति सर्वार्थाने आदर असला तर मतभेद वेळीच जिरवायला मदतच होते आणि संस्थेचे कार्य प्रगतिपथावर येते. याच्या विरुद्ध आचरणातून मतभेदाचे रूपांतर मनभेदात होऊन विघटन होते, बाह्य स्वार्थी शक्ती कार्यरत होतात समाजात अशा अनेक उत्तम संस्था अधोगतीला लागल्या आहेत. तेव्हा सामाजिक कार्य करीत असताना संतांच्या शिकवणीचे स्मरण झाल्यास अनर्थ होणार नाही, हे निश्चित.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७


### डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनावरील लेख उत्कृष्ट

दि. ६ जुलैच्या तरुण भारतच्या संपादकीय पानावर माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या जीवनावरील लेख अभ्यासपूर्ण आहे. त्यावरून साहित्य क्षेतातही पंतप्रधानांची छाप प्रकर्षाने जाणवते. जे सत्य आहे ते परखडपणे मांडण्याची त्यांची वृत्ती येथेही जाणवते. त्यांच्या कार्यबाहुल्यातूनही वेळ काढून हा दीर्घ लेख त्यांनी लिहिला व आपणही तत्परतेने तो आपल्या वाचकांसाठी प्रस्तुत केला यासाठी आपले अभिनंदन.

**किशोर आपटे**/खराडी ज्येष्ठ नागरिक सदस्य.
७८८८१६४४७१

■■■

### कलासक्त पद्मविभूषण तीजनबाई



छत्तीसगडमधील आदिवासी समाजातील कलासक्त तीजनबाई यांनी भारताचे सांस्कृतिक संचित असलेल्या पंडवानी या लोककलेला जागतिक स्तरावर नेऊन महत्त्वपूर्ण कामगिरी केली. त्यामुळेच त्या पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या. अतिशय खडा, भारदस्त आणि तितक्याच गोड आवाजाची उपजत देणगी लाभलेल्या तीजनबाई सर्वांगसुंदर मुद्राभिनयाने रामायण-महाभारतातील प्रसंग जिवंत करत. त्यांच्या सादरीकरणातून त्यांना पाहणे आणि ऐकणे हा विलक्षण आनंद मिळायचा. त्यांच्या जाण्याने भारतीय सांस्कृतिक क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे.

**डॉ. सुनील भंडगे**/आनंदनगर, पुणे

### 'त्या' लाचखोरांचे पुढे काय होते?

'लाचखोर अधिकाऱ्याच्या घरात आढळले तीन कोटींचे घबाड' ही बातमी वाचली. अमक्या तमक्याला सापळा रचून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून अटक झाली अशा बातम्या नियमित येत असतात. सामान्य नागरिकांनाही बातमी वाचून बरे वाटते की सरकार कारवाई करते आहे. परंतु कालांतराने संबंधित प्रकरणात गुन्हा सिद्ध होऊन न्यायालयाने शिक्षा ठोठावली का? लाचखोर सरकारी कर्मचारी /अधिकारी असल्यास नोकरीतून हकालपट्टी करण्यात आली आहे का? याबद्दल काहीच कळत नाही. दीर्घकालीन न्यायालयीन खटल्यामुळे अनेक प्रकरणांत दोषसिद्धी न होण्याचीही शक्यता जास्तच. म्हणून किती लाचखोरांवर गुन्हे दाखल झाले, विभागीय शिस्तभंग कारवाई, आरोप सिद्ध होऊन न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी याबाबतची आकडेवारी शासनातर्फे जनतेच्या माहितीसाठी नियमित जाहीर करण्याचा पायंडा पाडल्यास सामान्यांचा विश्वास दृढ होईल आणि लाचखोरांनाही जरब बसेल. ■

**राम राजे**/९४२१७७९९४५

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूरची संध्याराणी बंडगर विजेती

## मिश्र दुहेरीत राजीव देसाई यांच्यासमवेत अंतिम फेरीत

### वरिष्ठांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा : प्रसनजीत पॉल, नरेंद्र सिंग चौधरी, रमझान शेख यांना दुहेरी मुकुट



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै -**

वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत पुण्याच्या प्रसनजीत पॉल, नरेंद्र सिंग चौधरी, रमझान शेख यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. ४५ वर्षांवरील महिलांच्या एकेरीत येथील संध्याराणी बंडगरने विजेतेपद पटकाविले

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ४५ वर्षांवरील महिलांच्या एकेरीत अंतिम सामन्यात सोलापूरच्या संध्याराणी बंडगरने पुण्याच्या गिरिजा येरवडेकर हिचा ६-१, ६-३ असा पराभव केला.

३५ वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत पुण्याच्या प्रसनजीत पॉलने मिशाल जावियाचा ६-३, ६-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. दुहेरीत अंतिम लढतीत प्रसनजीत पॉल व अरुण भोसले यांनी अव्वल मानांकित मिशाल जाविया व कार्तिकेय सिंग वर्मा यांचा ६-३, ३-६, १०-७ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

४५ वर्षांवरील पुरुष गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित नरेंद्र सिंग चौधरी याने तिसऱ्या मानांकित संदीप बेडेकरचा ६-१, ६-० असा सहज पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. याच गटात दुहेरीत नरेंद्र सिंग चौधरी व नितीश रुंगता या जोडीने रजनीकांत कुलकर्णी व रवी तेज यांचा ६-०, ६-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

५० वर्षांवरील पुरुष गटात अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित वेंकटेशन विश्वेश्वरन याने गुलीवर लोव्हचा ६-१, ६-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

४० वर्षांवरील पुरुष गटात अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित रमझान शेख याने संदीप पवारचा ५-७, ६-४, ११-७; असा पराभव करून विजेतेपद पटकावले. याच दुहेरीत रमझान शेखने संदीप पवारच्या साथीत दुसऱ्या मानांकित जयनारायण केआर व चंद्रशेखर व्ही यांचा ६-४, ६-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

४० वर्षांवरील मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सोलापूरच्या राजीव देसाई व संध्याराणी बंडगर या जोडीने शंकर कांबळे व पारुल सिक्रोरिया या जोडीचा ६-१, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

### आजचे अन्य निकाल

**एकेरी : ७५ वर्षांवरील पुरुष: उपांत्यपूर्व फेरी-** अजित पेंढारकर१(भारत)वि.वि. ताहीर अली(भारत)६-७(६), ६-१, १०-६; धवल पटेल२(भारत) वि.वि.हरीश कुमार(भारत)६-२, ६-१; गोविंदकुमार(भारत)वि.वि.रामकृष्णसुदगणी(भारत)६-१, ६-१.

**६० वर्षांवरील पुरुष: उपांत्यपूर्व फेरी-** रवीदीप सिंग साही४(भारत) वि.वि.राजीव देसाई(भारत) ६-४, ६-२; राज दत्त३(भारत)वि.वि.विकास सोनी(भारत)६-१, ६-१; संजय कुमार२(भारत)वि.वि.प्रियदर्शन शहा(भारत)६-२, ६-३;

**दुहेरी: ५० वर्षांवरील पुरुष: अंतिम फेरी-** सूर्यप्रकाश कारंडे/लगानी श्रीनिवास(भारत)वि.वि.आशिष पंत/वेंकटेशन विश्वेश्वरन(भारत)६-३, ६-३;

**३० वर्षांवरील पुरुष: अंतिम फेरी-** गोविंद मौर्या/मनवीर रंधावा१(भारत) वि.वि.शिवम के/बालाजी पारी(भारत) ६-७(२), ७-६(२), १०-४.

**४० वर्षांवरील : अंतिम फेरी-** रमझान शेख/संदीप पवार(भारत) वि.वि. जयनारायण केआर२/चंद्रशेखर व्ही(भारत) ६-४, ६-२.

# तक्रारींचा वेळेत निपटारा करा

### महसूल उपजिल्हाधिकारी कसेकर यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी झालेल्या जिल्हा लोकशाही दिनात विविध विभागांशी संबंधित एकूण ४२ तक्रार अर्ज व निवेदने प्राप्त झाली. उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर यांनी स्वतः नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व सर्व संबंधित विभागप्रमुखांना प्राप्त तक्रारींचा विहित मुदतीत निपटारा करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

जिल्हा लोकशाही दिनात ४२ तक्रारी अर्ज प्राप्त झाल्या आहेत. त्यात विभागनिहाय प्राप्त अर्जांची संख्येमध्ये लोकशाही दिनात जिल्हा परिषद सोलापूर - ९, भूमी अभिलेख - ३, पोलीस आयुक्त सोलापूर शहर - ५, अपर चिटणीस - १, तहसील पंढरपूर -१, महावितरण - २, पोलीस ग्रामीण - २, जिल्हा उद्योग केंद्र - १, जिल्हा अग्रणी बँक - २, कार्यकारी अभियंता उजनी प्रकल्प - १, तहसील दक्षिण सोलापूर - १, जिल्हा पुरवठा कार्यालय - १, तहसील माळशिरस - १, जिल्हा उपनिबंधक - १, जिल्हा पुनर्वसन कार्यालय - १, भूसंपादन समन्वय - २, आस्थापना शाखा - ३, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग - १ व इतर - ४ यांचा समावेश आहे.


### सावधानतेची जाहीर नोटीस

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील व आसपासचे तमाम लोकांस कळविण्यात येते की,

आमचे अशिल उमेश राजेंद्र कंदारे, रा. बार्शी, ता. बार्शी यांनी बार्शी शहर हद्दीमध्ये बिनशेती असलेली खुला प्लॉट याचा गट नं. ११८८ मधील बिनशेती प्लॉट नं. ५८ याचे क्षेत्रफळ ९०.९० चौ.मी. याचा बिनशेती आकार ५९ रू. ०० पैसे, याचे मोजमाप पुर्व-पश्चिम : ६.६ मीटर, दक्षिण-उत्तर : १५.०० मीटर यांनी चतुः सिमा पुर्वेस- ९ मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ५९, पश्चिमेस- प्लॉट नं. ३३ व ३४ व उत्तरेस- प्लॉट नं. ५७, याची पाणी व वागणुक पुर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे वर्णन केलेला बिनशेती खुला प्लॉट आतील सर्व तदंगभुत वस्तु, व हक्कांसह. असा बिनशेती खुला प्लॉट हा आमचे अशिलांनी त्यांची पत्नी सौ. पुनम उमेश कंदारे हिच्या नावे सन २०२५ साली खरेदी घेतला होता व ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे पत्नीचे नाव होते व आहे.

सदरील बिनशेती प्लॉट हा आमचे अशिलांनी स्वकष्टाने खरेदी केलेला असून तो फक्त पत्नी यांच्या नावे खरेदी घेतला होता, याचाच गैरफायदा घेऊन आमचे अशिलांची पत्नी सौ. पुनम उमेश कंदारे या घरातील गैरसमजुतीतुन विक्री करण्याचे प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायक कळाले आहे. तरी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद वर्णन केलेला प्लॉट आजही आमचे अशिलांच्या वहिवाटीस असुन सौ. पुनम उमेश कंदारे यांच्यासोबत कोणीही खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, चोळी बांगडी, मृत्यूपत्र, दानपत्र, बक्षीसपत्र, बँक बोजा इ. कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबतचे व्यवहार करू नयेत याउपरही कोणी त्यांच्यासोबत व्यवहार केलेस, त्याची सर्वस्वी जबाबदारी जमीन खरेदी घेणाऱ्यावर राहील व तसेच सदरचे व्यवहार हे आमचे अशिलांचे हक्कांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस कोणाचीही फसगत होवू नये म्हणून दिली असे. ता. ०७/०७/२०२६.

**सही/-**
**ॲड. श्री. विजय बा. गलांडे**
**जिल्हा व अति. सत्र न्यायालय आवार,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ७४१०७३७४७९**




## 'कॉमरेड्स मॅरेथॉन'चे कांस्य पदक विजेते नवनाथ माने यांचा सन्मान

**माळशिरस, दि. ६ जुलै-**

दक्षिण आफ्रिकेत आयोजित अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक 'कॉमरेड्स मॅरेथॉन'मध्ये माळशिरस फिटनेस क्लबचे सदस्य व जिल्हा परिषद शिक्षक नवनाथ माने यांनी ९० किलोमीटरची खडतर शर्यतीत कांस्यपदक पटकाविले.

त्यांनी ही स्पर्धा १० तास १० मिनिटांत पूर्ण केली. त्यानिमित्त माळशिरसच्या फिटनेस क्लबच्या वतीने त्यांचा सत्कार तसेच पुणे पंढरपूर सायकलवारी करणाऱ्या माळशिरसचे आप्पा थोरात यांच्यासह पुणे ते सायकल राइडर्सचा ही सत्कार करण्यात आला.

यावेळी आप्पा थोरात, राजू लाळसिंगे, डॉ. नितीन वाघमोडे, डॉ. अनिल पाटील, गणेश शिंदे, गणेश देशमुख, डॉ गोरड, हनुमंत जानकर आदी उपस्थित होते.

## फैज कादरी संघाचा कादर विजापूर संघावर दणदणीत विजय

### लिटिल चॅम्प बारा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : श्रियान तिकटे सामनावीर

**सोलापूर, दि. ६ जुलै-**

लिटिल चॅम्प बारा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत सोमवारी झालेल्या सामन्यात फैज कादरी संघाने कादर विजापूर संघाचा ४३ धावांनी पराभव करत शानदार विजय नोंदवला.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना फैज कादरी संघाने निर्धारित ३० षटकांत ९ बाद १३९ धावा केल्या आणि कादर विजापूर संघासमोर १४० धावांचे लक्ष्य ठेवले.

या आव्हानाचा पाठलाग करताना कादर विजापूर संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. २४ षटकांत ७ बाद ९२ धावा अशा कठीण परिस्थितीतून मार्ग काढताना त्यांना शेवटच्या ३६ चेंडूत ४८ धावांची गरज होती. क्रिजवर राजेश शिंदे (५ धावा) आणि आरव पाटील (११ धावा) संघर्ष करत होते.



श्रियान तिकटे

मात्र, फैज कादरी संघाच्या धारदार गोलंदाजीसमोर कादर विजापूरचा डाव २५.२ षटकांत अवघ्या ९६ धावांवर गडगडला.

फैज कादरी संघाच्या या विजयात श्रियान तिकटे याने अष्टपैलू कामगिरी करत मोलाचा वाटा उचलला. तो सामन्याचा मानकरी ठरला त्याने फलंदाजीत नाबाद ३ धावा तर गोलंदाजीत ५ षटकांत १ निर्धाव षटक टाकत २६ धावांच्या मोबदल्यात ३ महत्त्वपूर्ण बळी घेतले.

### हुतात्मा चषक लिटिल चॅम्प सोलापूर प्रीमियर लीग

या स्पर्धेत बारा वर्षाखालील गटाचे १४ संघ सहभागी झाले होते. यातील कामगिरीवरून खेळाडू निवडून ६ संघ किंवा ८ संघ तयार करण्यात येणार आहेत. या संघादरम्यान हुतात्मा चषक लिटिल चॅम्प सोलापूर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा घेण्यात येणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सो यांनी सांगितले.

# लोकनेते प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**



महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना, सोलापूर शहर यांच्या वतीने पार्क चौक येथील जनसेवा संघटनेच्या कार्यालयात माजी सहकारमंत्री, लोकनेते प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पप्पासाहेबांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आयुष्यभर जनसेवा, सहकार, शिक्षण आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले. कार्यकर्त्यांवरील त्यांचे अपार प्रेम, सर्वसामान्य जनतेप्रती असलेली आत्मीयता, विकासाची दूरदृष्टी आणि समाजहिताची तळमळ आजही असंख्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी नेते अनेक झाले, पण कार्यकर्त्यांच्या मनात घर करणारा असा नेता पुन्हा होणे नाही...! या शब्दांत उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त करून पप्पासाहेबांना आदरांजली वाहिली. या अभिवादन कार्यक्रमास शिरीष जगदाळे, सतीश वावरे, ज्योतिबा गुंड, शिवराज विभुते, अजय सोमदळे, दिलीप भोसले, श्रेयस माने, सचिन मस्के, दिलीप निंबाळकर, नाना कामाने, साळुंखे, सचिन थोरात तसेच पप्पासाहेबांचे अनेक कार्यकर्ते व जनसेवा संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घरात तोल जाऊन पडलेल्या वृद्धाचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि.६ जुलै-**

घरामध्ये तोल जाऊन पडल्याने जखमी झालेल्या वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी मध्यरात्री मृत्यू झाला. नवनाथ कृष्णा जगताप (९६ वर्ष, रा. हनगोंदा, ता. परांडा, जिल्हा धाराशिव ) असे त्यांचे नाव आहे. १२ जून रोजी दुपारी घरात बाथरूमला जात असताना ते तोल जाऊन खाली पडून जखमी झाले. त्यांना नातेवाईकांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान रविवारी मध्यरात्री पावणे बारा वाजता मृत्यू झाला.


### टी. सी. हरवला आहे

दिनांक १५.०५.२०२६ रोजी राजुरी ते करमाळा प्रवासा दरम्यान, विनोद गोरख साखरे या नावाचा दादा पाटील कॉलेज कर्जत या संस्थेची १२ वी पास टी. सी. हरवला आहे, ज्यांना सापडली आहे त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**विनोद गोरख साखरे**
मो. नं. ९५८८४५९२०९
मु. पो. राजुरी ता. करमाळा जि. सोलापूर.

Classifieds

### पाहिजेत

**पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन ऑफलाइन काम करून अधिक इन्कम मिळवा संधी सर्वांसाठी**
**संपर्क:**
**समाधान सर ९७६३२६४११५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

### CHANGE IN NAME

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Patil Omprakash Adalingappa** HAS BEEN CHANGED TO **Omprakash Adalingappa Patil**
Resi. - Plot No.32, Jawahar Nagar, Shelgi, Solapur - 413006

**KINDLY NOTE**

**THE SAME.(1804 Dtd.06.07.2026)**

### जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम जनतेस विशेषतः अक्कलकोट ग्रामीण, ता. अक्कलकोट येथील जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे अक्कलकोट ग्रामीण येथील गट नं. ९९२/१/अ, यासी क्षेत्र १ हे ०७ आर यासी आकारणी रू. २-९० पैसे जिरायत शेतजमिन

वर नमूद मिळकत ही लक्ष्मण सिताराम लोखंडे यांचेकडून आमचे अशिल युनूस करीम सुतार यांनी दि. ६/२/२०१८ रोजी दस्त क्र. ४२९/२०१८ अन्वये खरेदी घेतलेली आहे. सदरची शेतजमिन ही त्याचे मालकी कब्जे वहिवाटीचे असून सदरची मिळकत भोगवटदार २ मधील असुन त्यास भोगवटदार १ मध्ये हस्तांतरण (तबदील) करणेसाठी जा.कु.का/कार्या-२/ई.ऑ.क्र. ७४५७२६१/आरआर-६८८/२६ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचेकडून पत्र मा. तहसिलदार साहेब अक्कलकोट यांचेकडे अटी व शर्तीच अधिन राहुन सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करत आहोत.

तरी वर नमुद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, टाच, पोटगी, कोर्ट प्रकरण व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

जाहीर नोटीस दिली ता. ७/०७/२०२६.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. सौ. अरुणा संजय घोडके (साळुंके)**
**ब्लॉक नं. ९, विद्युत नगर, लक्ष्मी पेठ,**
**सोलापूर मो. नं. ९५५२४७६२३८**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### जाहीर प्रसिद्धीकरण

**जागा/जमीनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे**

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब. डि व ता. व पंचायत समिती माढा पैकी मौजे कुर्डुवाडी नगरपालिक हद्दीमधील व माढा तालुक्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि. सोलापूर सब. डि व ता. व पंचायत समिती माढा पैकी मौजे कुर्डुवाडी नगरपालिक हद्दीतील क.ग. नं. २२३/१ पैकी बिनशेती खुला प्लॉट याचे क्षेत्रफळ ५६५ चौ.फूट आहे. याबाबत खरेदीखताचा दस्त श्री. विश्वंभर संपत्ती माने यांनी आमचे अशिल श्री. सलीम शेखलाल मुलांनी यांना दि. १२/०७/२०१२ रोजी खरेदीखत दस्त क्र. ३७६२/२०१२ हा रजिस्टर खरेदीखताचा दस्त लिहून, नोंदवून दिलेला होता. तसेच सदर रजिस्टर खरेदीखताचा दस्त आमचे अशिल यांच्याकडे होता. परंतु, सदरचा खरेदीखताचा दस्त, सूची क्र. २ व आर. आर. पावती आमचे अशिलाकडून अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहे, ते अद्यापर्यंत आढळून आलेले नाही.

तद्नंतर सदर मिळकती संदर्भाने मिळकतीच्या हस्तांतरणाचे कोणतेही व्यवहार केलेले नव्हते व नाहीत अथवा व्यवहाराबाबत कोणाकडूनही इसार म्हणून रक्कम देखील स्वीकारलेली नाही. तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतलेले नाही.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा दस्त, सूची क्र. २ व आर. आर. पावती मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये, सदरचे खरेदीखत दस्त मिळाल्यास खालील पत्त्यावर आणुन द्यावेत. सदर दस्ताचे अनुषंगाने कोणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये, कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास या जाहीर प्रसिद्धीकारानापासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी हरकत कळवावे, कोणतीही फसगत होऊ नये म्हणुन सदरचे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. दि. ०६/०७/२०२६.

**सही/-**
**अशिल श्री. सलीम शेखलाल मुलांनी यांचे तर्फे**
**सुप्रिया बोराडे गुंडपाटील**
**साई अम्बृशी नगर, परंडा रोड, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**मो. नं. ९८५०७८०१०५**

अुत्तम सेवा

**मंगळवार**
**दि. ७ जुलै २०२६**

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ बँकींग पर्सोनेल सिलेक्शन, IBPS** | | | |
| १ | प्रोबेशनरी ऑफिसर/ मॅनेजमेंट ट्रेनी (६७१५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | २१/०७/२६ |
| २ | आय.टी. ऑफिसर (३०१) | BE (कॉम्प्यु/आय.टी/इलेक्ट्रॉ/टेली) | ३० पर्यंत | |
| ३ | ॲग्री ऑफिसर (१९० पदे) | पदवी (कृषी/पशु/अन्न/डेअरी/मत्स्य) | ३० पर्यंत | |
| ४ | लॉ ऑफिसर (१०५ पदे) | पदवी (लॉ) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| ५ | HR ऑफिसर (६० पदे) | पदवी व MSW/HR उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| २) | **भारतीय रेल्वे, RRB** | | | |
| १ | टेक्निशियन III (६२३४ पदे) | दहावी व ITI (इले/इलेक्ट्रॉ/फिटर/ कार्पेंटर/पेंटर/प्लंबर/मोटार/वायरमन/ डिझेल/ट्रॅक्टर/मशिनिस्ट) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २९/०७/२६ |
| २ | टेक्निशियन I (३२३ पदे) | BSc (इलेक्ट्रॉ/कॉम्प्यु/आय.टी) किंवा इंजिनियरींग डिप्लोमा उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | |
| ३) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | लिपीक (१८६४ पदे) | पदवी व मराठी / इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | १७/०७/२६ |
| २ | सहा. मोटार वाहन निरीक्षक गट - क (४६१ पदे) | पदवी / पदविका अभियांत्रिकी (ऑटो/मेकॅ) उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | |
| ३ | कर सहाय्यक (२८२ पदे) | पदवी व मराठी व इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ४ | तांत्रिक सहाय्यक (०३ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| ५ | उद्योग निरीक्षक (०९ पदे) | पदवी / पदविका (स्थापत्य) किंवा B.Sc. उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ४) | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| १ | प्रोबेशनरी ऑफिसर (१५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०८/०७/२६ |
| ५) | **भारतीय वायु सेना, IAF** | | | |
| १ | अग्निवीरवायु | बारावी (५०%) गणित विषयासह किंवा डिप्लोमा (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ/ ऑटो/कॉम्प्यु/आय.टी) उत्तीर्ण असावे. | २१ पर्यंत | २६/०७/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.


वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org







# हॉलंडचे दोन गोल, नॉर्वे उपांत्यपूर्व फेरीत

## पाच वेळा विजेता ब्राझील स्पर्धेतून बाहेर

**न्यू यॉर्क, ६ जुलै**

स्टार खेळाडू नेमारने 'स्टॉपेज टाइम'मध्ये पेनॉल्टीद्वारे गोल करूनही, अर्लिंग हॉलंडच्या दोन गोलमुळे पाच वेळा विजेतेपद पटकावलेला ब्राझीलचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला. नॉर्वेच्या अर्लिंग हॉलंडने सामन्याच्या उत्तरार्धात केलेल्या दोन गोलमुळे ब्राझीलचे विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आले; ब्रुनो गुइमारेसने यापूर्वी पेनॉल्टीची संधी वाया घालविल्यानंतर नेमारने 'स्टॉपेज टाइम'मध्ये पेनॉल्टीवर गोल केला; परंतु तो ब्राझीलचा बचाव करण्यास पुरेसा नव्हता.

अर्लिंग हॉलंडने सामन्याच्या अखेरच्या क्षणी केलेल्या दोन गोलांच्या बळावर नॉर्वेने ब्राझीलवर २-१ अशा गोलफरकाराने रोमहर्षक विजय नोंदविला. नॉर्वेने ब्राझीलला विश्वचषकाच्या अंतिम १६ संघांच्या फेरीतच बाहेर काढले. आता उपांत्यपूर्व फेरीत नॉर्वेचा सामना इंग्लंडशी होईल.

मँचेस्टर सिटीचा आक्रमक खेळाडू अर्लिंग हॉलंडने ७९ व्या मिनिटाला सामन्यातील कोंडी फोडली, त्याने आर्सेनलचा कट्टर प्रतिस्पर्धी गॅब्रिएलवर मात करत ॲलिसनला चकवून हेडरद्वारे गोल केला. त्यानंतर त्याने ९० व्या मिनिटाला लांबून मारलेला एक अप्रतिम लो-ड्राइव्ह कॉर्नरमध्ये धाडून पाच वेळा विजेतेपद पटकावलेल्या संघाला चकवून दुसरा गोल केला. या स्पर्धेत केवळ दुसऱ्यांदा बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या नेमारने सामन्याच्या अखेरच्या क्षणी पेनॉल्टीवर एक गोल करून पिछाडी कमी केली, परंतु हॉलंडच्या पराक्रमाने ब्राझीलच्या संधी वाया घालवण्याच्या वृत्तीला शिक्षा दिली, कारण याआधी ब्रुनो गिमारेसची पेनॉल्टी ऑर्जन नायलांडने वाचवली होती.

**हॉलंडही 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत**

हॉलंडच्या गोलांमुळे विश्वचषकातील त्याचे एकूण गोल संख्या ७ झाली आहेत. त्यामुळे हॉलंड गोल्डन बूटच्या शर्यतीत लिओनेल मेस्सी व कियालिन एमबाप्पेच्या बरोबरीने आला आहे. अर्लिंग हॉलंडने आता नॉर्वेसाठी सलग १४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये गोल केले आहेत.



विश्वचषक सामन्यादरम्यान, ब्राझीलच्या गॅब्रिएल मॅगल्हास (३) याच्याकडून रोखण्याचा प्रयत्न होत असताना नॉर्वेच्या अर्लिंग हॉलंडने (९) फटका मारून पहिला गोल केला

नॉर्वे आपल्या इतिहासातील पहिल्या विश्वचषक उपांत्यपूर्व फेरीची तयारी करत असताना, कार्लो अँसेलोटी यांच्या नेतृत्वाखालील ब्राझीलला स्पर्धेतून पुन्हा एकदा लवकर बाहेर पडल्याचा खेद वाटत आहे. धावताना झालेल्या अडखळीमुळे गिमारेसने मारलेली पेनॉल्टी ही गमावलेल्या अनेक संधींपैकी एक होती.

बदली खेळाडू एंड्रिकने बेंचवरून मैदानात आल्यानंतर लगेचच मिळालेली वन-ऑन-वन संधी वाया घालवली, तर विनिसियस ज्युनियरचा प्रयत्न उत्कृष्ट नायलांडने हाणून पाडला. हालंडच्या पहिल्या गोलनंतर काही मिनिटांनी क्रिस्टोफर अजेरचा आत्मघाती गोल रोखण्यासाठी नायलांडने एक सनसनाटी बचावही केला होता. (वृत्तसंस्था)

# ब्राझील स्पर्धेतून बाहेर पडताच नेमारची निवृत्तीची घोषणा



**न्यू यॉर्क, ६ जुलै**

फिफा २०२६ च्या विश्वचषकातून ब्राझील बाहेर पडल्यानंतर स्टार खेळाडू नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून अधिकृतपणे निवृत्तीची घोषणा केली. ३४ वर्षीय आक्रमक खेळाडू नेमार १३० सामन्यांत ८० गोल करत ब्राझीलसाठी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला आहे.

विश्वचषकाच्या उप-उपांत्यपूर्व फेरीमध्ये नॉर्वेविरुद्ध ब्राझीलला २-१ असा पराभव पत्करावा लागला; यात अर्लिंग हॅलंडने सामन्याच्या उत्तरार्धात दोन गोल केले. नेमारच्या 'ब्राझील'सोबतच्या कारकीर्दीत २०१३ फिफा कॉन्फेडरेशन्स चषक व २०१६ ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकण्याचा समावेश आहे.

हा पराभव १९९० नंतरचा ब्राझीलचा विश्वचषकातील सुरुवातीच्या टप्प्यात बाहेर पडण्याचा प्रसंग ठरला असून, यामुळे ब्राझिलियन फुटबॉलमधील एका महत्त्वपूर्ण युगाचा अंत झाला आहे. निवृत्ती जाहीर केल्यानंतर नेमार ज्युनियर प्रेक्षागृहात आपल्या कुटुंबासोबत दिसला. अर्लिंग हॅलंडच्या दोन गोलमुळे ब्राझीलचे सहाव्यांदा विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न भंगले आणि त्यानंतर काहीच क्षणांत नेमारने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीचा समारोप केला; या सामन्यात नेमारने 'स्टॉपेज टाइम'मध्ये पेनॉल्टीद्वारे गोल केला व तो केवळ एक 'सांत्वनपर गोल' ठरला. (वृत्तसंस्था)

### आजचे अंतिम-१६ फेरीचे सामने

**अर्जेंटिना वि. इजिप्त**
**वेळ :** रात्री ९.३० वाजतापासून
**स्थळ :** अटलांटा स्टेडियम

**स्वित्झर्लंड वि. कोलंबिया**
**वेळ :** रात्री १.३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी पॅलेरस व्हँक्युअर
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

### ट्रम्प यांच्या हस्तक्षेपामुळे बालोगुनवरील शिक्षा स्थगित

**सिएटल, :** अमेरिकेच्या विश्वचषक मोहिमेने एक अनपेक्षित वळण घेतले. बोस्निया ॲण्ड हर्जेगोव्हिना विरुद्धच्या 'अंतिम-३२' फेरीच्या सामन्यात 'रेड कार्ड' मिळूनही, फिफाने आपल्याच नियमांना बगल देत स्टार खेळाडू फोलारिन बालोगुनला बेल्जियमविरुद्धच्या 'अंतिम-१६'च्या सामन्यात खेळण्याची परवानगी दिली.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फिफाचे प्रमुख जियानी इन्फेंटिनो यांना या प्रकरणाचा पुनर्विचार करण्याची विनंती केल्यानंतर, जागतिक फुटबॉल संघटनेने बालोगुनवरील 'रेड कार्ड'ची शिक्षा स्थगित केल्याची घोषणा केली.

# १० खेळाडूंनिशी खेळणाऱ्या इंग्लंडचा थरारक सामन्यात मेक्सिकोवर विजय

**मेक्सिको, ६ जुलै**

मेक्सिको स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या चुरशीच्या फिफा विश्वचषकाच्या उप-उपांत्यपूर्व सामन्यात दहा खेळाडूनिशी खेळत इंग्लंडने प्रतिस्पर्धी मेक्सिकोवर ३-२ अशा गोलफरकाने रोमहर्षक विजय नोंदविला.

ज्यूड बेलिंगहॅमने दोन गोल करत इंग्लंडला २-० अशी आघाडी मिळवून दिली होती. मेक्सिकोनेही जिद्दीने झुंज दिली. सामन्याच्या ५४ व्या मिनिटाला आडदांड खेळ केल्यामुळे इंग्लंडच्या जॅरेल क्वान्साला पंचांनी लाल कार्ड दाखवून मैदानाच्या बाहेर काढले, परिणामी तेव्हापासून सामना संपेपर्यंत इंग्लंडला १० खेळाडूनिशी खेळावे लागले, परंतु मात्र इंग्लंडचा संघ खचला नाही व त्यांनी जोमाने मेक्सिकोला प्रत्युत्तर दिले. इंग्लंडच्या १० खेळाडूंनी झुंज देत विश्वचषकाच्या थरारक सामन्यात मेक्सिकोवर विजय मिळवला. हॅरी केनने पेनॉल्टीद्वारे आणखी एक गोल करत संघाची आघाडी ३-१ अशी केली; स्पर्धेतील त्याचा हा सहावा आणि क्लब व देशासाठी मिळून या हंगामातील ७३ वा गोल ठरला.



फुटबॉल विश्वचषकाच्या उप-उपांत्यपूर्व सामन्यात मेक्सिकोविरुद्ध विजय नोंदविल्यानंतर जल्लोष करताना हॅरी केन, ज्यूड बेलिंगहॅमसह इंग्लंडचे खेळाडू

इंग्लंडसाठी ३६ व्या व ३८ व्या मिनिटाला ज्यूड बेलिंगहॅमने, ६० व्या मिनिटाला हॅरी केनने पेनॉल्टीवर गोल केला. मेक्सिकोकडून ज्युलियन क्युनोसने ४२ व्या, तर ६९ व्या मिनिटाला राऊल जिमेनेझने पेनॉल्टीवर गोल केला. १९६६ नंतरचा हा इंग्लंडचा विश्वचषकाच्या बाद फेरीतील सर्वोत्तम विजय म्हणून नोंदविला जाईल. जावियर अगुइरेच्या इंग्लंड संघाने या महत्त्वाच्या सामन्यात निर्दोष कामगिरी केली; स्पर्धेत आतापर्यंत चारपैकी चार सामने जिंकले होते; ही स्पर्धा जणू त्यांचीच होती. सह-यजमान मेक्सिकोसाठी त्यांच्याच भूमीवरून हा एक भव्य निरोप समारंभ होता, त्यांच्यासाठी हा एक अनधिकृत अंतिम सामनाच होता. (वृत्तसंस्था)

# गतविजेत्या अर्जेंटिनाला इजिप्त रोखेल ?


**अटलांटा, ६ जुलै**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत मंगळवारी रात्री अटलांटा स्टेडियमवर गतविजेता अर्जेंटिना आणि इजिप्त यांच्यादरम्यान उप-उपांत्यपूर्व सामना खेळला जाणार आहे. अर्जेंटिना आपल्या फिफा विश्वचषक विजेतेपदाचे यशस्वी रक्षण करण्यासाठी आगेकूच करेल की, इजिप्त अर्जेंटिनाचे आव्हान संपुष्टात आणेल ? हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे. मात्र अर्जेंटिनाचेच पारडे जड असल्याचा अंदाज फुटबॉल तज्ज्ञांनी वर्तविला आहे.


गतविजेत्या अर्जेंटिना संघाने गत पाच फिफा विश्वचषकांमध्ये उप-उपांत्यपूर्व फेरीचे सामने जिंकले आहेत. इजिप्तने आपल्या मागील सहा विश्वचषक सामन्यांपैकी प्रत्येकात गोल केले आहेत.

**मेस्सी आणखी विक्रम नोंदविणार**

इजिप्तविरुद्ध खेळताना लिओनेल मेस्सी अर्जेंटिनासाठी विश्वचषकातील आणखी एक ऐतिहासिक कामगिरी नोंदवू शकतो. गत अंतिम-३२ संघांच्या फेरीच्या सामन्यात केप वर्देविरुद्ध मेस्सीने पहिला गोल केल्यानंतर, अर्जेंटिनाने दोनदा आपली आघाडी गमावली; मात्र अखेरीस ख्रिस्टियन रोमेरोच्या 'हेडर'ला दिने बोर्जेसचा स्पर्श होऊन चेंडू गोलजाळीत गेल्याने अर्जेंटिनाने ३-२ असा विजय मिळविला. त्या गोलमुळे अर्जेंटिनाचा कर्णधार मेस्सी या स्पर्धेतील आपल्या गोलची संख्या सातवर घेऊन गेला आणि दोन विश्वचषकांमध्ये किमान सात गोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला.



लिओनेल मेस्सी



मोहम्मद सलाह

तथापि, शनिवारी अंतिम-१६ च्या सामन्यात पॅराग्वेविरुद्ध फ्रान्सला मिळालेल्या पेनॉल्टीवर गोल करत एमबाप्पेनेही ही कामगिरी करून दाखवली आणि सात गोलच्या बाबतीत मेस्सीची बरोबरी केली.

ब्राझीलविरुद्ध दोन गोल करून नॉर्वेला इंग्लंडविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीतील सामन्यासाठी पात्र ठरवल्यानंतर, अर्लिंग हॉलंडनेही आपल्या पहिल्याच विश्वचषक स्पर्धेत सात गोलचा टप्पा गाठला आहे. तरीही, मेस्सी आपली गोल करण्याची मालिका कायम राखण्यास आणि १९३० मधील गुलेर्मो स्टाबिले यांच्या पंक्तीत जाऊन बसण्यास उत्सुक असेल; स्टाबिले हे एकाच विश्वचषकात आठ गोल करणारे अर्जेंटिनाचे एकमेव खेळाडू आहेत.

जर या ३९ वर्षीय खेळाडूने इजिप्तविरुद्ध गोल केला, तर विश्वचषकातील आपल्या देशाच्या पहिल्या पाच सामन्यांत गोल करणारा तो केवळ सहावा खेळाडू ठरेल. याआधी १९५८ मध्ये फ्रान्ससाठी जस्ट फॉन्टेन, १९७० मध्ये ब्राझीलसाठी जैरझिन्हो, १९७० मध्ये जर्मनीसाठी गर्ड मुलर, २००२ मध्ये ब्राझीलसाठी रिव्हाल्डो आणि २०१४ मध्ये कोलंबियासाठी जेम्स रॉड्रिग्ज यांनी अशी कामगिरी केली आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना १-१ अशा बरोबरीत सुटल्यानंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ असा विजय मिळवून इजिप्त संघाने अर्जेंटिनाशी होणारा सामना निश्चित केला आणि स्पर्धेतील आपला अपराजित राहण्याचा विक्रम कायम राखला. कॅमेरून (१९९०), सेनेगल (२००२), घाना (२०१०) आणि मोरोक्को (२०२२ आणि २०२६) यांच्यानंतर विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारणारा पाचवा आफ्रिकन देश होण्याचे त्यांचे आता लक्ष्य आहे. सलाहने या विश्वचषकात आतापर्यंत १६ गोल करण्याच्या संधी निर्माण केल्या आहेत; जर त्याने आणखी दोन संधी निर्माण केल्या, तर २०१० मध्ये घानाच्या केविन-प्रिन्स बोआटेंगने (१८) प्रस्थापित केलेला आफ्रिकन खेळाडूचा विक्रम तो त्याच्या बरोबरीने करेल. (वृत्तसंस्था)

# भारत इंग्लंडविरुद्ध विजयासाठी उत्सुक



श्रेयस अय्यर



हॅरी ब्रुक

### भारत वि. इंग्लंड तिसरा टी-२० सामना

**वेळ :** रात्री १०.०० वाजतापासून
**स्थळ :** ट्रेंट ब्रिज मैदान, नॉटिंगहॅम
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

**नॉटिंगहॅम, ६ जुलै**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना मंगळवारी नॉटिंगहॅम येथे खेळविला जाणार आहे. यजमान संघाने पाहुण्या संघाचा पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली असतानाच, आता भारतीय संघ इंग्लंड संघाविरुद्ध विजय मिळविण्यासाठी उत्सुक असतील.

भारत व इंग्लंड यांच्यादरम्यानचा पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. गत चार सामन्यांमध्ये भारतीय संघाची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. भारताचा टी-२० कर्णधार म्हणून श्रेयस अय्यरची सुरुवात फारशी चांगली झालेली नाही; याउलट, आगामी सामन्यात भारताचा सामना करताना इंग्लंडचा संघ आत्मविश्वासाने मैदानात उतरेल.

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने इंग्लंडविरुद्ध भारतासाठी ऐतिहासिक पदार्पण केले, परंतु त्याला विशेष प्रभाव पाडता आला नाही. हा आक्रमक सलामीवीर अभिषेक शर्मासोबत भारताचा सलामीवीर म्हणून आपली भूमिका कायम राखेल अशी अपेक्षा आहे.

दुसरीकडे, दुसऱ्या टी-२० सामन्यातील अत्यंत खराब कामगिरीनंतर रवी बिश्नोईला संघाबाहेर बसावे लागू शकते; त्याच्या जागी प्रिन्स यादवला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळण्याची शक्यता आहे.

**सामन्यावर पावसाचे सावट**

तिसऱ्या टी-२० सामन्यावर पावसाचे सावट असून हवामान अंदाजानुसार, सकाळच्या वेळी आकाश अंशतः ढगाळ आणि काही प्रमाणात सूर्यप्रकाश असलेला असेल. सायंकाळी वारे वाहण्याची शक्यता आहे आणि खेळात पावसाचा व्यत्यय येऊ शकतो. (वृत्तसंस्था)

### वन-डे मालिकेसाठी नितीश कुमार रेड्डीच्या जागी शिवम दुबे

**नवी दिल्ली, ६ जुलै**



आगामी १४ जुलैपासून बर्मिंगहॅममध्ये सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेसाठी, दुखापतग्रस्त नितीश कुमार रेड्डीच्या जागी वेगवान गोलंदाजी करणारा अष्टपैलू खेळाडू शिवम दुबे याचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे.

सध्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी इंग्लंडमध्ये असलेला दुबे वन-डे मालिकेसाठीही तिथेच थांबेल; कारण रेड्डी अजूनही मांडीच्या स्नायूंच्या दुखापतीतून सावरत आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव देवजित सैकिया यांनी सोमवारी सांगितले. निवड समितीने इंग्लंडविरुद्धच्या वन-डे मालिकेसाठी भारतीय संघात नितीश कुमार रेड्डीच्या जागी शिवम दुबेची निवड केली आहे, असे सैकिया म्हणाले.

चेन्नईमध्ये अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वन-डे सामन्यादरम्यान रेड्डीला ही दुखापत झाली होती आणि तो स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये कधी परतेल, याची निश्चित वेळ अद्याप ठरलेली नाही. (वृत्तसंस्था)

# विदर्भाच्या हर्ष दुबे, यश ठाकूरची संघात निवड

**नवी दिल्ली, ६ जुलै**

आगामी २३ जुलैपासून सुरू होणाऱ्या झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेसाठी विदर्भाचे फिरकीपटू हर्ष दुबे आणि वेगवान गोलंदाज यश ठाकूर तसेच यष्टिरक्षक-फलंदाज प्रभसिमरन सिंग व अशोक शर्मा यांची भारतीय संघात पहिल्यांदाच निवड झाली आहे.

रिंकू सिंग आणि मयंक यादव यांचेही भारतीय टी-२० संघात पुनरागमन झाले असून, श्रेयस अय्यर संघाचे नेतृत्व करीत आहे. इंग्लंडमधील पाच सामन्यांच्या मालिकेसाठी गेलेल्या अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, प्रसिध कृष्णा, रवी बिश्नोई आणि संजू सॅमसन यांच्या जागी हे



हर्ष दुबे



यश ठाकूर

सहा खेळाडू झिम्बाब्वेच्या तीन सामन्यांच्या दौऱ्यासाठी संघात आले आहेत. दुबेने जूनमध्ये धर्मशाला येथे अफगाणिस्तानविरुद्ध एकदिवसीय सामन्यातून पदार्पण केले होते, यात त्याने ४७ धावांत ३ बळी घेतले होते. श्रीलंकेतील 'भारत अ' संघाच्या १-० अशा प्रथम श्रेणी स्वरूपातील मालिका विजयातही त्याचा सहभाग होता.विदर्भ संघातील दुबेचा सहकारी असलेल्या यश ठाकूरने श्रीलंकेतील 'भारत अ'च्या विजेत्या ठरलेल्या तिरंगी मालिकेत पाच बळी घेतले. २३ जुलै रोजी होणाऱ्या सलामीच्या सामन्यानंतर, भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात २५ आणि २६ जुलै रोजी पुढील सामने खेळले जातील; हे सर्व सामने हरारे स्पोर्ट्स क्लब येथे होणार आहेत. भारताने यापूर्वी जुलै २०२४ मध्ये झिम्बाब्वेचा दौरा केला होता, जिथे त्यांनी मालिका ४-१ अशी जिंकली होती.


**भारतीय संघः** श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा (उपकर्णधार), ईशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, सूर्यांश शेडगे, रिंकू सिंग, हर्ष दुबे, वरुण चक्रवर्ती, प्रिन्स यादव, यश ठाकूर, अशोक शर्मा, मयंक यादव आणि प्रभसिमरन सिंग (यष्टिरक्षक). (वृत्तसंस्था)

# जोकोविचची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**लंडन, ६ जुलै**

येथील 'सेंटर कोर्ट'वर दुपारच्या कडक उन्हात सर्बियाच्या नोवाक जोकोविचने रोमन सफिउलिनचे आव्हान ७-६(६), ६-३, ३-६, ६-३ असे परतवून लावले आणि विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

कारकिर्दीच्या उत्तरार्धात जोकोविचने आपल्या उत्कृष्ट खेळाचा वापर अत्यंत मोजक्या आणि प्रभावीपणे केला आणि स्वतःची ऊर्जा वाचविली. दीर्घकाळापर्यंत सातत्याने उच्च दर्जाचा खेळ करणे अनेकदा खूप थकवणारे ठरू शकते. विम्बल्डनमध्ये या ३९ वर्षीय सर्बियन खेळाडूचा हा १०६ वा विजय ठरला; या विजयासह त्याने रॉजर फेडररला मागे टाकले आणि 'ऑल इंग्लंड क्लब'मध्ये सलग नवव्यांदा एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



**सबालेन्काला पराभवाचा धक्का देतनाओमी ओसाका उपांत्यपूर्व फेरीत**

जपानच्या नाओमी ओसाकाने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आर्यना सबालेन्काचा ६-२, ७-६(२) असा पराभव करून विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आणि आपली सर्वोत्तम कामगिरी करून दाखवली.

या पराभवामुळे सबालेन्काची 'मेजर' स्पर्धांमधील सलग १४ वेळा उपांत्यपूर्व फेरी किंवा त्यापुढील टप्प्यापर्यंत पोहोचण्याची आणि सलग २१ टाय-ब्रेक जिंकण्याची मालिका खंडित झाली; तसेच, २०२० च्या अमेरिकन ओपननंतरचा 'ग्रॅण्ड स्लॅम' स्पर्धेतील तिचा हा पहिलाच सरळ सेटमधील पराभव ठरला.



**कोस्त्युक, मर्टेन्स पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरीत**

युक्रेनच्या १२ व्या मानांकित मार्ता कोस्त्युकने पात्रता फेरीतून आलेल्या ॲशलिन क्रुगरचा सरळ सेटमध्ये पराभव करत विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत पहिल्यांदाच प्रवेश केला. गत महिन्यात फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारत ग्रँण्ड स्लॅम स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवणाऱ्या कोस्त्युकने दुसऱ्या सेटमधील ४-२ अशी पिछाडी भरून काढत ६-४, ६-४ असा विजय मिळविला. उपांत्य फेरीतील स्थानासाठी तिचा सामना आता फिलिपिन्सची उदयोन्मुख खेळाडू अलेक्झांड्रा इला किंवा इटलीची जास्मिन पाओलिनी यांच्यापैकी एकाशी होईल. बेल्जियमच्या एलिस मर्टेन्सने झेक प्रजासत्ताकच्या २१ व्या मानांकित मेरी बुझकोव्हाचा ६-४, ६-४ असा पराभव करून पहिल्यांदाच विम्बल्डनच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. (वृत्तसंस्था)

### विम्बल्डन टेनिस : सफिउलिनचे आव्हान परतावले

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यालयात राहण्यासाठी निवेदन

**माढा, दि. ६जूलै -**

माढा तालुक्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेमणूक असणाऱ्या ठिकाणी राहावे अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असे निवेदन शिवसेना युवा सेनेच्या वतीने प्रशासनाला दिले आहे. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी माढा तहसील कार्यालयसमोर हलगीनाद आंदोलन करणार असल्याचा इशाराही दिला आहे.तहसील, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, शिक्षण विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग, शासकीय रुग्णालये, भूमी अभिलेख, पंचायत समिती तसेच इतर विभागांतील अनेक अधिकारी व कर्मचारी त्यांच्या नेमणुकीच्या मुख्यालयात राहत नाहीत. इतर ठिकाणांहून रोज प्रवास करून येतात. त्यामुळे अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत उशिरा हजर होतात. परिणामी, नागरिकांना शासकीय कामांसाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागते आणि अत्यावश्यक सेवाही वेळेत मिळत नाहीत. शासकीय नियम ानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नेमणुकीच्या मुख्यालयात वास्तव्यास राहणे अपेक्षित आहे. मात्र, त्याचे अनेक ठिकाणी पालन होत नसल्याने जनतेत तीव्र नाराजी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी पंडित साळुंके, माढा शहर शिवसेना अध्यक्ष देविदास खरात, युवा संपर्क प्रमुख अमोल केसरे, टायगर उबाळे, जमीर शेख, मुस्तफा काझी, संतोष कोळी यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.




## उदयनगर जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**अकलूज, दि. ६ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उदयनगर शाळेतील रिद्धी वाघमारे व प्रणवी सूर्यवंशी यांनी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. सहा विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उदयनगर शाळेतील इयत्ता पाचवी शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका वंदना उमेश शेटे या गेली दोन वर्ष मुलांच्या शिष्यवृत्ती तयारीसाठी झटत होत्या. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणजे रिद्धी वाघमारे २२६ गुण, प्रणवी सूर्यवंशी २२४ या दोन मुलींनी पाचवी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. त्यांच्या यशामागे मुख्याध्यापक विलास जगदाळे, शिक्षक गणपत जाधव, उज्वला भोसले, माजी मुख्याध्यापक अशोक बनसोडे, शिक्षक बाळासाहेब लोखंडे, मुलाणी आदी प्रयत्नशील होते. शाबद्दल मदनसिंह मोहिते-पाटील, डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, शिवाजी इंगवले-देशमुख, सरपंच अलका इंगवले-देशमुख, उपसरपंच शीला गायकवाड, केंद्रप्रमुख हुसेन बारस्कर यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले.

## फॅबटेकच्या धीरज कुंभारची क्रेडिसस बिझनेस कंपनीत निवड

**सांगोला,दि.६ जुलै -**



फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी धीरज कुंभार याची पुणे येथील क्रेडिसस बिझनेस सर्व्हिसेस प्रा.लि. या नामांकित कंपनीत निवड झाली. निवडीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.धनंजय शिवपुजे, प्रा.ऋषिकेश पाटील यांनी धीरज कुंभारचे अभिनंदन केले.

## निधन वृत्त...


### चंद्रकांत क्षीरसागर



**वेळापूर, दि. ६ जुलै-**

वेळापूर येथील वेळापूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक चंद्रकांत शिवलिंग क्षीरसागर यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि चार मुली असा परिवार आहे.

### पांडुरंग गायकवाड



**पंढरपूर, दि. ६ जुलै-**

बोहाळी (ता.पंढरपूर ) येथील पांडुरंग दत्तू गायकवाड (वय ८५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी दि. ६ जुलै रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. पत्रकार सुरेश गायकवाड यांचे ते वडील होत.

# उजनीत वेगाने येत आहे विसर्ग

## दौंडमधून २७ हजार ८५६क्युसेसने येतेय पाणी




**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, ६ जुलै -**

सोलापूर जिल्ह्याची भाग्यवरदायिनी असलेल्या उजनी धरणात दौंड येथून २७हजार ८५६ क्युसेस विसर्गाने पाणी येऊ लागले आहे. परिणामी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसहित सर्व थरातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. बंडगार्डन मधूनही ४५०८३ क्युसेसने पाणी येत आहे. त्यात त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. कारण खडकवासला पवना कासारसाई या धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सोडण्यास सुरुवात झाली आहे

उजनी धरण पाणलोट क्षेत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. उजनी धरणावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. चालू पावसाळी हंगामाच्या सुरूवातीला पाऊस पडला नसला तरी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली आहे. उजनीच्या पाणलोट क्षेत्रातील वरील १९ धरणाच्या परिसरात एकाच दिवसांत उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या धरणसाखळी क्षेत्रात २३१० मि.मी तर उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

निरा खोऱ्यातील गुंजवणी, वीर, निरादेवधर, नाझरे, भाटघर या धरण साखळीत मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. ४१२ मि.मी. इतक्या पावसाची नोंद झाली आहे. पावसाळा सुरू होऊन दीड महिना होत आले तरी पुणे, सोलापूर, अहमदनगर जिल्ह्याकडे पावसाने पाठ फिरवल्यामुळे सर्वत्र काळजीचे वातावरण निर्माण झाले आहे. खरिपाच्या पेरण्या होऊ शकल्या नाहीत तर शेतातील उभी बागायती पिके जळून जाऊ लागली आहेत. शेतकरी पूर्ण धास्तावले आहेत. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे. परंतु मागील सहा ते सात दिवसापासून पुणे जिल्ह्यातील भीमाशंकरचे डोंगर, मावळ भाग व लोणावळ्याच्या पश्चिम भागात तसेच उजनी धरण पाणलोट क्षेत्रात काही प्रमाणात पाऊस सुरू झाला आहे. दौंड येथून सध्या उजनीत २७,८४६ क्युसेसने पाणी येत आहे. त्याचप्रम ाणे उजनीच्या वरील १९ धरणामध्ये पाणीसाठा वाढत आहे. खडकवासला, पानशेत, चासकमान, भामा-आसखेडा, आंद्रे, मुळशी या धरणातही पाणीसाठा वाढत आहे. सर्वच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून आजही २३१० मि.मी. पाऊस झाल्याची नोंद झाली आहे.

लोणावळा पश्चिम भागात पाऊस सुरू असल्याने इंद्रायणीमधून मोठ्या प्रमाणावर पाणी येण्यास सुरुवात झाली आहे व दौंड येथील पाण्याचा विसर्ग वाढन्याची शक्यता निर्माण झाली आहे. भीमाशंकर डोंगर परिसरात सध्या पाऊस सुरू झालेला असल्यामुळे आगामी ३ ते ४ दिवसात दौंड येथून उजनीत येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात काही हजार वरून लाखात विसर्ग जाण्याची शक्यता आहे. त्यातच बंडगार्डनचा विसर्ग वाढत चालला असून त्यात रात्रीत मोठी वाढ होण्याचे संकेत धरण प्रशासनाने दिले आहेत येणाऱ्या पाण्यात कित्येक हजार क्युसेसने वाढ होईल असे धरण नियंत्रण विभागाचे अभियंता प्रशांत माने यांनी सांगितले आहे.

५ जुलै रोजी उजनी धरणात मायनस २७.९६ टक्के पाणी होते. जलाशयात ४८.६८ टीएमसी इतका पाणीसाठा हाता. दौंड येथून २७ हजार ६८३ क्युसेस वेगाने विसर्गने पाणी येत असल्यामुळे जलाशयातील पाणीसाठ्यात प्रत्येक तासाला वाढ झालेली दिसून येणार आहे. पावसाळ्याचे अद्यापही अडीच ते पावणे तीन महिने बाकी आहेत. यापुढे सातत्याने कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत राहिल्यास उजनी धरण १०० टक्के भरण्यास वेळ लागणार नाही.

**सध्या उजनी धरणातील पाणीपातळी**

| | |
|---|---|
| एकूण पाणीपातळी | ४८८.७६० मीटर |
| एकूण पाणीसाठा | १३९९.२७ दलघमी |
| उपयुक्त साठा | ४०३.५४ दलघमी |
| एकुण पाणीसाठा | ४९.४२ टी.एम.सी. |
| उपयुक्त साठा | १४.२५ टी.एम.सी. |
| टक्केवारी | २६.६० टक्के |
| विसर्ग | |
| › दौंड | २७८४६ क्युसेस |
| › बंडगार्डन | ४५०८३ क्युसेस |

## पावसाची रोजची नुसती हजेरी; दमदार नाहीच

### वळसंग शिवारातील चित्र; खरीप पेरण्या अजूनही रखडल्या

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग ६ जुलै -**

सोलापूर जिल्ह्यात जून महिन्यापासून पावसाने मोठी ओढ दिली आहे. वळसंग आणि दक्षिण सोलापूरच्या ग्रामीण भागात गेल्या २४ तासांत पावसाने ढगाळ वातावरणासह हजेरी तर लावली, मात्र हा पाऊस पेरणीयोग्य नसल्याने शिवारातील पेरण्या अजूनही खोळंबल्या आहेत.

परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडून गेल्या असल्या, तरी जमिनीत वाफसा तयार न झाल्याने शेतकऱ्यांनी अद्याप तिफणीवर हात ठेवलेला नाही. संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात पावसाअभावी लाखो हेक्टरवरील पेरण्या रखडल्या आहेत. वळसंग, तांदूळवाडी, मुस्ती आणि औराद परिसरातील शेतकऱ्यांनी मे महिन्यापासूनच शेतीची मशागत करून जमीन तयार ठेवली आहे. बियाणे व खते आणून गोदामात सज्ज आहेत. मात्र, केवळ हलका पाऊस पडून गेल्याने आणि जमीन आतून कोरडी असल्याने पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती सतावत आहे. यामुळे शेतकरी दम दार पावसाची चातकासारखी वाट पाहत आहेत.

वळसंग परिसरातील शेतकऱ्यांना शेतात किमान ७५ ते १०० मिमी पाऊस होत नाही. जम ीन अर्धा फूट खोल ओलसर होत नाही, तोपर्यंत पेरणीची घाई करू नये असे कृषी अधिकारी गुलाब राठोड यांनी सांगितले. अपुऱ्या पावसावर पेरणी केल्यास बियाणे जमिनीतच सडून किंवा करपून जाण्याचा मोठा धोका असतो असे मंडल अधिकारी संतोष फुलारी यांनी सल्ला दिले.

**अनेक पिकांच्या लागवडीचा कालावधी संपला**

कृषी विभागाच्या नियम ानुसार ७ जुलैपर्यंतच मूग आणि उडदाची पेरणी फायदेशीर ठरते. पाऊस लांबल्यास शेतकऱ्यांनी बाजरी, तूर, सूर्यफूल किंवा कोरडवाहू कापूस या पिकांच्या पर्यायांचा विचार करावा.

## परप्रांतीय व्यापाऱ्यांमध्ये लाठ्या, कुऱ्हाडीने हाणामारी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ जुलै-**

शहरातील जुना दगडी पुल परिसरात परप्रांतीय व्यापाऱ्यांच्या दोन गटांमध्ये सोमवारी दि. ६ जुलै रोजी सकाळी लाठ्या आणि कुऱ्हाडीने मारहाणीची घटना घडली. ही फ्रीस्टाईल हाणामारी बराच वेळ सुरु होती. मात्र पोलिसांना याची खबरही नव्हती.



शहरात गेल्या काही महिन्यापासून परप्रांतीय विक्रेत्यांची वर्दळ वाढलेली आहे. अनेक परप्रांतीय विक्रेते येथे बिऱ्हाडासह कायमस्वरुपी वास्तव्यास आहेत. शहरातील रेल्वेस्टेशन परिसर, भाई राऊळ पुतळा, स्टेशनरोड, गोपाळपूर रोड, जुना दगडीपूल, नवीन पुल परिसरात ही मंडळी कुटुंबासह घोळक्यांनी वास्तव्यास असतात. जुना दगडी पूल येथे वास्तव्यास असलेल्या या परप्रांतीयांच्या दोन गटांमध्ये सोमवारी सकाळी हाणामारी सुरु होती. या हाणामारीचे अनेक व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरलही झालेले आहेत. हाणामारीमध्ये दोन्ही गटाकडून एकमेकांवर लाठ्या, काठ्या आणि कुऱ्हाडी देखील उगारल्या जात होत्या. हाणामारीत पुरुषांबरोबरच परप्रांतीय महिलाही अग्रेसर दिसत होत्या. अगदी चंद्रभागा नदीवर असलेल्या जुन्या पूलावर हा हाणामारीचा प्रकार सुरु असल्यामुळे सर्वसामान्य भाविकांमध्ये काही वेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. जुन्या पुलावरुन ये-जा करणाऱ्या अनेक नागरिक या हाणामारीत मध्यस्थी करीत दोन्ही गटातील मंडळींना शांत करण्याचा प्रयत्न करत असल्याचेही व्हायरल व्हिडिओतून दिसून आले. दुसरीकडे मात्र चंद्रभागेच्या वाळवंटाजवळच बराच वेळ हा प्रकार सुरु होता. पण तेथे वाहतूकीचे नियोजनासाठी कार्यरत वाहतूक पोलिसांसह शहर पोलिसांना याची खबर देखील नसल्याचे परिसरातील सर्वसामान्य नागरिकांकडून बोलले जात होते. त्यामुळे येथील शहर पोलिस नेमके काय करतात असा प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे.

## पंढरपूर पाटबंधारे उपविभाग-पाणी वापर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

देशमुखनगर- पंढरपूर उपविभागाच्या अधिपत्याखालील कार्यक्षेत्र नीरा उजवा कालव्यावरील शाखा क्र.३ वरील सरळ विमोचक क्र.१५ व १६ वरील श्री भैरवनाथ पाणी वापर संस्था, देशमुखनगर कासेगाव, ता.पंढरपूर व श्री पांडुरंग पाणी वापर संस्था, कासेगाव, ता. पंढरपूर यांचा निवडणूक कार्यक्रम मंजूर झाला आहे.

श्री भैरवनाथ पाणी वापर संस्था- निवडणुकीची नोटीस- दि. ७ जुलै, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणे दि. ०८ जुलै ते दि. १४ जुल, नामनिर्देशन पत्रांची छाननी आणि वैध नामनिर्देशन पत्रे प्रसिध्दी दि.१५ जुलै, नामनिर्देशन पत्रे मागे घेणे- दि. १६ जुलै ते दि. १९ जुलै, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची चिन्हासह यादी प्रसिध्दी- दि. २० जुलै, निवडणूक अधिकाऱ्यांची निवडणूकीची तयारी व अन्य बाबी- दि. २१ जुलै ते दि. २९, निवडणूक (मतदान) तसेच शक्य झाल्यास मतमोजणी आणि निकाल- दि.३० जुलै. श्री पांडुरंग पाणी वापर संस्था

निवडणुकीची नोटीस- दि. ०७ जुलै. नामनिर्देशन पत्रे स्वीकारणे दि. ०८ जुलै ते दि. १४ जुलै, नामनिर्देशन पत्रांची छाननी आणि वैध नामनिर्देशन पत्रे प्रसिध्दी दि.१५ जुलै,

नामनिर्देशन पत्रे मागे घेणे- दि. १६ जुलै ते दि. १९ जुलै, उमेदवारांची चिन्हासह यादी प्रसिध्दी दि. २० जुलै, निवडणूक अधिकाऱ्यांचे निवडणूकीची तयारीसाठी कालावधी- दि. २१ जुलै ते दि. २९ जुलै, निवडणूक (मतदान) तसेच शक्य झाल्यास मतमोजणी आणि निकाल-दि.३० जुलै.

दोन्ही निवडणुकांसाठी मतदानाच्या दिवशीच मतमोजणी करणे शक्य नसेल तर ती दुसऱ्या दिवशी (दि. ३१ जुलै) करण्यात येईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता रा.म.धोत्रे यांनी दिली आहे.

## २४९ रोजंदारी सेवक, १५ वाहनचालकांसह कर्मचारी प्रश्नांवर महापौरांनी घेतला आढावा

### जुनी पेन्शन, महागाई भत्ता, अनुकंपा नियुक्तीसह विविध प्रलंबित विषयांवर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेतील २४९ रोजंदारी सेवकांना कायम करणे, १५ वाहनचालकांना नियमित सेवेत समाविष्ट करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, महागाई भत्ता तसेच विविध प्रलंबित कर्मचारी प्रश्नांवर सोमवारी महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्यानंतर ही बैठक आयोजित करण्यात आली.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत २४९ रोजंदारी सेवकांना कोल्हापूर व नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर कायम करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत चर्चा झाली.

तसेच या सेवकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनाकडे पाठवून त्याचा प्रभावी पाठपुरावा करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली.

याशिवाय १५ वाहनचालकांना कायम सेवेत समाविष्ट करणे, कर्मचाऱ्यांचा थकीत महागाई भत्ता, लाड-पागे सेवक, अनुकंपा नियुक्ती, रोजंदारी वाहनचालक, आरसीएच, लिंक वर्कर (आशा वर्कर), नर्सेस, एएनएम, पीएचएन, जीएनएम, बालवाडी सेविका, परिवहन विभाग, शहर क्षयरोग केंद्र, घनकचरा व्यवस्थापन विभाग, वर्ग-४ कर्मचारी तसेच इतर विभागांतील विविध कर्मचारी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सुधारित आकृतिबंध, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन व आर्थिक लाभ, डॉक्टरांच्या पदनिर्मिती, मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती, वर्ग-४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ आणि सरळसेवा भरती या विषयांचाही आढावा घेण्यात आला.

बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, मुख्यलेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, उपायुक्त सोनाली यादव, उपायुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी, नगर अभियंता सारिका आकुलवार, कार्यालय प्रमुख रजाक पेंढारी, सफाई अधीक्षक चराटे, उपअभियंता नीलकंठ मठपती तसेच कामगार संघटनांचे प्रतिनिधी अशोक जानराव,जनार्दन शिंदे, सायमन गट्टू, बाली मंडेपु, बापू सदाफुले, अशोक होटकर, दिलावर मणियार, शेषराव शिरसाट, रामचंद्र चंदनशिवे, इकबाल तडकल, लिंबराज जटीथोर आणि डॉ. एस. प्रसाद उपस्थित होते.

## वैरागमध्ये दोन दुकाने फोडून १६ लाखांचा मुद्देमाल लंपास

**वैराग, दि, ६ जुलै -**

बार्शी तालुक्यातील वैरागमध्ये रात्रीत दोन मोठी इलेक्ट्रिकल दुकाने चोरट्यांनी फोडली. तब्बल १६ लाख २३ हजार ५० रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. चोरीचा पुरावा मागे राहू नये यासाठी चोरट्यांनी दुकानाबाहेरील सीसीटीव्ही कॅमेरे फोडून टाकले.

वैराग येथील गणपती मंदिराजवळ शरद गटकळ (वय ४२, रा. छत्रपती नगर, वैराग) यांचे श्रीगणेश इलेक्ट्रिक अँड म ोटार रिवाइंडिंग वर्क्स हे दुकान चोरट्यांनी फोडले, तसेच त्याशेजारील कृष्णा बनसोडे यांचे कृष्णा इलेक्ट्रिकल्स हे दुकानही फोडले. श्रीगणेश इलेक्ट्रिकल्समधून ८०० किलो नवीन सबमर्सिबल वायर (१२ लाख रुपये), ५७५ कार्बन बुश (७५ हजार रुपये), पंपाचे ४०० बेअरिंग (१ लाख ५० हजार रुपये), पाच लहान-मोठ्या मोटारी (१ लाख ३५ हजार रुपये), ३४ कास्टिंग इम्पेला (१५ हजार ३०० रुपये) आणि ५ हजार रुपयांची सीसीटीव्हीची डीव्हीआर मशीन, असा एकूण १५ लाख ४० हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला.

कृष्णा इलेक्ट्रिकल्समधून: १७० किलो नवीन सबमर्सिबल वायर, १० किलो मोनोब्लॉक वायर आणि ४० किलो बुशिंग स्क्रॅप असा एकूण ८२ हजार ७५० रुपयांचा माल चोरट्यांनी लंपास केला. दोन्ही दुकानांमधून एकूण १६ लाख २३ हजार ५० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी वैराग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### शिवसेनेच्या वतीने श्रीरामाची महाआरती व राम रक्षा आंदोलन

**सोलापूर दि. ६ जुलै-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पूर्व विभाग दाजी पेठ येथील श्रीराम मंदिरात श्री प्रभू रामचंद्रांची महाआरती व राम रक्षा आंदोलन जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण व जिल्हाप्रमुख शरणराज केंगनाळकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून व संपर्कप्रमुख सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या रामरक्षा आंदोलनाचे प्रास्ताविक कामगार नेते विष्णू कारामपुरी व विजय पुकाळे यांनी केले. यानंतर प्रभू श्री रामचंद्राची महाआरती केल्यानंतर सर्व उपस्थित शिवसैनिकांनी रामरक्षा आंदोलन करताना जय श्रीराम, श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय, शिवसेना जिंदाबाद, उद्धवजी ठाकरे-तुम आगे बढो- हम तुम्हारे साथ है, गली गली मे शोर है-भाजपवाले चोर है, राम मंदिर दानपेटी चोरांना कारवाई झालीच पाहिजे- झालीच पाहिजे अशा घोषणा दिल्या. सदर आंदोलनात प्रताप चव्हाण, शरणराज केंगनाळकर,विष्णू कारम पुरी (महाराज) महेश धाराशिवकर, संजय पोळ हुकुमचंद राठोड, मनसेचे विनायक महेंद्रकर, प्रियाताई बसवंती, मंगल थोरात, रेखा आडकी, तेजश्री टोणपे, बाळासाहेब गायकवाड, दत्ता माने, विजय पुकाळे, सुरेश जगताप, दिनेश चव्हाण, राजाभाऊ कुसेकर, अमित भोसले, योगेश सलगर, तुषार अवताडे राम वाकसे, ऋषी देवकर, शकील अत्तार, विठ्ठल कुराडकर, प्रशांत जगताप, शिवा ढोकळे, दत्ता कलाटे, चंद्रकांत मानवी, दीपक दुधाळे, पंकज गजा कोश, प्रसाद जगताप उज्वल दीक्षित, संतोष टोणपे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोटार सायकलस्वाराला गंभीर जखमी केल्याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. ६ जुलै-**

वैराग-सासुरे रस्त्यावर भरधाव ट्रॅक्टर चालवून मोटरसायकल स्वाराला गंभीर जखमी केल्याप्रकरणी ट्रॅक्टर चालकाची बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी निर्दोष मुक्तता केली. सदरचा गुन्हा १५ फेब्रुवारी २००७ रोजी सुमारास घडला. आरोपी आपला ट्रॅक्टर वैरागकडून सासुरेकडे घेऊन जात होता. यावेळी भरधाव वेगाने व वाहतुक नियमाकडे दुर्लक्ष करुन चालवित असताना सासुरेकडून वैरागकडे जाणाऱ्या मोटारसायकलस्वारास आरोपीने धडक देवून गंभीर जखमी केले. अपघातात मोटारसायकलचेही नुकसान होणेस कारणीभूत झाला. अपघातानंतर त्याची खबर न देता निघून गेला. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर झाली. सरकार पक्षातर्फे एकूण ८ साक्षीदार तपासले. सरकार पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही. आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम. गुंड यांनी केला. आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे ॲड. एस.एम. गुंड व ॲड.व्ही.पी जाधव, ॲड. आर.आर. घोडके, ॲड. ए. एस. गुंड, ॲड. आर. के.ननवरे, ॲड. एस. एस. विधाते यांनी काम पाहिले.

### दोषीवर कडक कार्यवाही करा : जाधव

**अक्कलकोट, दि. ६ जुलै -**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने श्री राम मंदिरमध्ये महाआरती करण्यात आली. अयोध्या येथील श्री राम मंदिरातील ट्रस्टी व कर्मचारी संगनमत करून देवस्थान समितीच्या सोने. चांदी व पैसे यावर दरोडा टाकून तमाम राम भक्ता च्या भावना दुखावल्या आहेत जे दोषी आहेत त्या कर्मचारी ट्रस्टीवर कडक शासन व्हावे. यावेळी शहर प्रमुख राम जाधव सोपान निकते माजी तालुका प्रमुख मनोज पवार मोहम्मद पठाण गुरुनिंगप्पा पाटील अयाज जमादार समीर नादफ श्रीकांत जाधव केसर नदाफ अफान तांबोळी पवार मामा शरणप्पा माळी वाशिम बागवान आदी उपस्थित होते.



आ. शहाजीबापू पाटील



आनंद माने



नितीन इंगोले

### बायपास रस्त्यावरील डेकोरेटीव्ह इलेक्ट्रिक पोलच्या कामाचे उद्या उद्घाटन

**सांगोला, दि. ६ जुलै -**

मिरज रोड ते वंदे मातरम चौक बायपास रस्त्यावर डेकोरेटीव इलेक्ट्रिक पोल बसविणे या कामाचे उद्या बुधवार ८ जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता वंदे मातरम चौक याठिकाणी उद्घाटन होणार असल्याची माहिती सांगोला नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष नितीन इंगोले यांनी दिली. कामाची अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू.१ कोटी इतकी असून काम पूर्ण झाले आहे. हा कार्यक्रम माजी आ.शहाजीबापू पाटील, नगराध्यक्ष आनंद माने, आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, बाळासाहेब एरंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. शिवसेना गटनेते प्रशांत धनवजीर, बांधकाम सभापती माऊली तेली, पाणीपुरवठा सभापती वैशाली सावंत, आरोग्य सभापती गोदाबाई बनसोडे, महिला बालकल्याण समिती सभापती छाया मेटकरी, मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित राहणार आहेत, असेही इंगोले यांनी सांगितले.

# हिरज नाका ते निराळे वस्ती मार्गावरील अतिक्रमणांवर जेसीबी

## कारवाईत अनधिकृत पत्राशेड, नामफलक व कट्टे हटविले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने सोमवारी रस्ते विभागाच्या सहकार्याने संयुक्त कारवाई केली. हिरज नाका ते निराळे वस्ती पूल या १२ मीटर रुंदीच्या रस्त्यालगत उभारण्यात आलेले अनधिकृत पत्राशेड, नामफलक तसेच रस्त्याला बाधा ठरणारे कट्टे हटविण्यात आले.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिक्रमण नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. रस्त्याची रुंदी कायम ठेवणे, वाहतुकीतील अडथळे दूर करणे आणि नागरिकांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध करून देणे, हा या कारवाईचा उद्देश असल्याचे प्रशासनाने सांगितले.

कारवाईदरम्यान अतिक्रमण विभागाचे कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार यांच्यासह विभागीय कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणांविरोधातील मोहीम पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

## महिला बचत गटांकडून मिळकत सर्वेक्षणाचा प्रस्ताव फेटाळला

### मनपा स्थायी समिती सभापती चाकोते यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

महापालिकेच्या हद्दीतील नव्याने उभारलेल्या व कराच्या बाहेर असलेल्या मालमत्तांचे सर्वेक्षण महिला बचत गटांकडून करून घेण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव सोमवारी स्थायी समितीने नामंजूर केला. मिळकतकर विभागातील विद्यमान अधिकारी-कर्मचारी हे सर्वेक्षणासह संबंधित कामे सक्षमपणे पार पाडत असल्याने सध्या बाह्य यंत्रणेची आवश्यकता नसल्याचे सभापती रंजीता चाकोते यांनी स्पष्ट केले.

सभापती चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका स्थायी समितीची सभा सोमवारी सायंकाळी झाली. या सभेत पाचपैकी तीन विषयांना मंजुरी देण्यात आली. कर्मचाऱ्यांशी संबंधित दोन विषयांवर निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्तांकडे सोपविण्यात आले. शासन निर्देशानुसार महिला बचत गटाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन ई केवायसी, माहिती संकलन, नवीन मालमत्तेची नोंद व कर आकारणीसाठी आवश्यक माहिती गोळा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. या माध्यमातून या महिला बचत गटाच्या माध्यमातून होणाऱ्या या उपक्रमासाठी विविध लेखाशीर्षांतून ८५ लाख रुपयांच्या खर्चालाही मंजुरी प्रस्तावित होती. मात्र चर्चेनंतर समितीने हा प्रस्ताव फेटाळला. सर्वेक्षणासाठी स्वतंत्र महिला बचत गटांची नियुक्ती करण्याची गरज नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

## एटीएममधून ५० हजारांची चोरी करणारा आरोपी २४ तासात जोडभावी पेठ पोलिसांकडून जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममध्ये ज्येष्ठ नागरिकाचे एटीएम कार्ड बळजबरीने हिसकावून ५० हजार रुपये लंपास करणाऱ्या अट्टल चोरट्याला जोडभावी पेठ पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्याच्या अवघ्या २४ तासांच्या आत अटक करून सोडलेल्या रकमेतील १९,५०० रोकड जप्त केली आहे.

बालाजी दिगंबर देवकर (वय ३२, रा. कारला, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. यातील तक्रारदार रवींद्र कटके (वय ७३) हे दिनांक २७ जून २०२६ रोजी बाळी वेस परिसरातील एटीएममधून पैसे काढत असताना वरील आरोपीने पाळत ठेवून त्यांचा पिन नंबर चोरला. त्यानंतर, कटके एटीएमबाहेर येताच आरोपीने त्यांच्याशी झटापट करून बळजबरीने एटीएम कार्ड हिसकावून घेतले आणि खात्यातून ५० हजार रुपये काढून पोबारा केला होता. याप्रकरणी ३ जुलै रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय खबऱ्यांच्या मदतीने अवघ्या २४ तासांत वरील आरोपी बालाजी देवकरला जेरबंद केले. त्याच्याकडून १९,५०० रुपये जप्त करण्यात आले असून उर्वरित रक्कम जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तपासात आरोपीने धाराशिवमध्येही अशाच प्रकारचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त राजकुमार, उपायुक्त प्रितमकुमार यावलकर, सहाय्यक आयुक्त प्रताप पोमण आणि जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## रस्त्याचे काम टक्केवारीच्या राजकारणामुळे रखडले?

### गटनेते अमोल शिंदे; प्रशासनाला संतप्त सवाल उपस्थित करत आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते निराळे वस्ती या रस्त्याला तीन कोटींचा निधी मंजूर असताना सुद्धा रस्त्याचे काम होत नाहीये. या कामाला अधिकारी जबाबदार आहेत की कॉन्ट्रॅक्टर जबाबदार आहेत? का कुठेतरी टक्केवारीचे राजकारणामुळे हे काम रखडलेले असल्याचा आरोप शिवसेन गटनेते नगरसेवक अमोल शिंदे यांनी केला आहे.

हा रस्ता गेल्या नऊ महिन्यांपासून रखडलेला आहे. हा रस्ता लवकरात लवकर न झाल्यास आम्ही आंदोलन करू, असा इशारा आयुक्तांना देऊन सुद्धा हे काम अद्यापपर्यंत पूर्णत्वास आलेले नाही. याउलट आता त्याला लगतच असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक हा ड्रेनेजच्या कामासाठी खोदून ठेवलेला आहे. या खोदकामामुळे नागरिकांना व शाळकरी मुलांना त्रास होत आहे. त्याठिकाणी कोणता अपघात घडल्यास याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल शिंदे यांनी उपस्थित केला. सत्तेत बसलेल्या सत्याधारी लोकांना याचा तीळ मात्र फरक पडत नाही. नागरिकांचे त्यांना देणे घेणे नाही.

दोन आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये या रस्त्याचे काम रखडले आहे की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हा रस्ता वेळेत पूर्ण न झाल्यामुळे अधिकाऱ्यांनीच कॉन्ट्रॅक्टरवरती कारवाई करायला हवी होती. अधिकारीच कारवाई करत नाहीत म्हणजे कुठेतरी पाणी मुरतंय आणि हे रस्त्यातलं पाणी कुणाच्या खिशात जाते का? ही परिस्थिती आहे. नागरिकांच्या जीवित अशी असाच खेळ सुरू राहिला तर आम्ही रस्त्यावर खड्ड्यात उतरून आंदोलन करू, असा इशारा देखील नगरसेवक अमोल शिंदे यांनी दिला आहे.

## सोलापूर जिल्ह्यात 'होम स्टे' संकल्पना; उद्या ऑनलाईन कार्यशाळा

### ग्रामीण पर्यटनाला नवीन दिशा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प कक्ष सोलापूर जिल्हा प्रशासन आणि पर्यटन संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'होम स्टे' संकल्पना या विषयावरील ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन ८ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील श्री विठ्ठल मंदिर -पंढरपूर, स्वामी समर्थ मंदिर -अक्कलकोट, भगवंत मंदिर -बार्शी, कमला भवानी मंदिर करमाळा,सिध्देश्वर मंदिर- माचनुर, ता. मंगळवेढा, शिव-पार्वती मंदिर ता. माळशिरस व सिध्देश्वर मंदिर सोलापूर, या प्रमुख धार्मिक स्थळांलगतच्या गावांमध्ये 'होम स्टे' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेत सोलापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तथा जिल्हा पर्यटन समन्वयक सूर्यकांत भुजबळ हे 'सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन विकास : संधी व दिशा' या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच पर्यटन संचालनालय, पुणे येथील उपसंचालक भरत लांघी हे 'होम स्टे' संकल्पना, नोंदणी प्रक्रिया व सहकार्य सुविधा याविषयी माहिती देतील. प्रकल्प व्यवस्थापक महेश कोडगीरे आणि प्रायमुव्हचे जितेंद्र नाईक हे 'होम स्टे' संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील दिशा' या विषयावर मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मार्गदर्शन जिल्हा पर्यटन अधिकारी लक्ष्मण कसेकर करणार आहेत. ऑनलाइन कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद चंद्रशेखर जगताप यांनी केले आहे.

## एसआयआर मोहिमेद्वारे अर्ज भरण्याचे नागरिकांना आवाहन

### आ. कोठे यांनी नागरिकांच्या भेटी घेऊन केली जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी पुनर्नरीक्षण (एसआरआय) मोहिमेद्वारे प्रत्येक नागरिकांनी अर्ज भरावेत असे आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आलेल्या शासकीय सुट्टीच्या दिवशी रविवारी आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर मध्य मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १८ मध्ये नागरिकांची संवाद साधत जनजागृती केली.

नागरिकांच्या भेटीप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, एसआरआय मोहिमेमध्ये शासनाचे मतदार केंद्रस्तर अधिकारी प्रत्येक घरात जाऊन विचारपूस करून दुबार नावे वगळणार आहेत. तसेच नवीन नावे यादीत समाविष्ट करणार आहेत. अनेक नागरिक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी शिक्षणासाठी नोकरीसाठी कायमचे राहायला जातात. त्यामुळे काही वेळा मतदारयादीत चुकीची नावे तशीच राहतात. किंवा स्थानिक मतदार यादीत नाव समाविष्ट न केल्यामुळे अशा नागरिकांना मतदानापासून वंचित रहावे लागते.



एकाच घरातील मतदारांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर येणे, नावे वगळली जाणे, व्याकरणातील चुका, दिनांकामधील चुका, मयत झालेल्या मतदारांची नावे मतदार यादीत तशीच राहणे यामुळे मतदारयादीमध्ये अनेक चुका आढळून येत आहेत.

या चुका दुरुस्त करण्यासाठी मतदारयादी पुनर्नरीक्षण (एसआरआय) मोहीम शासनाकडून राबविण्यात येत आहे. या मोहिमेत नागरिकांना मदत करण्यासाठी भाजपाचे जबाबदार कार्यकर्ते ही यात सहभागी होणार आहेत. एस आय आर मोहिमेतील अर्ज भरल्यानंतरच नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट होणार आहेत.

जे मतदार नियमितपणे मतदान करतात त्यांचेदेखील नाव अंतिम मतदार यादीत येण्यासाठी हा अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी एसआयआरचा अर्ज भरावा आणि स्वतःचे आणि कुटुंबातील सर्वांची नावे मतदार यादीत येण्यासाठी शासनास सहकार्य करावे, असे आवाहनही आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी केले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील १२ बुथवर प्रवास करून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भाजपाचे शहर मध्य विधानसभेचे एसआयआर प्रमुख गुरुशांत धुत्तरगावकर, नगरसेवक प्रशांत पल्ली, नगरसेविका राजश्री दोडमनी, ॲड. शैलेश पोटफोडे, सतीश बगाडे, शांतीलाल साबळे, गोपाळ मिस्किन, मनोज पिसके, विजय महिंद्रकर, विश्वनाथ प्याटी उपस्थित होते.

## डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या बलराज अश्वाची पूजा

### तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. ६ जुलै-**

संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी सालाबाद प्रमाणे डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या बलराज अश्वाची सोमवारी दुपारी विधिवत पूजा करून महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देहूकडे रवाना झाला.



गेली सुमारे ४० वर्षांपासून संत तुकाराम महाराज देवस्थान देहू यांच्या आग्रहास्तव स्व.प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी या सोहळ्यासाठी अश्व देण्याची प्रथा सुरू केली होती. त्यांच्या पश्चातही त्यांचे पुत्र डॉ. धवलसिंह मोहिते- पाटील यांनी ही प्रथा सुरू ठेवली आहे.सालाबाद प्रमाणे सोमवारी दुपारी ३ वाजता त्यांच्या बलराज या अश्र्वाला सजवून त्याची श्रीमती पद्मजादेवी मोहिते पाटील व डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील व उर्वशीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी भजनी मंडळीचे भजन सुरू होते. पूजनानंतर अश्वाला वाजत गाजत निरोप देण्यात आला. यावेळी माळशिरस पंचायत समितीचे सभापती दत्ता मगर, माणिक मिसाळ, अण्णासाहेब शिंदे, दिपक पिंजारी, सत्यवान मगर, जयसिंग मोरे, राजू निकाळजे, सागर देशमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले की, गेली ४० वर्षांपूर्वी स्व.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी ही प्रथा सुरू केली असून ती आम्ही पुढे चालवत आहे.

बलराज हा जातीवंत अश्व असून त्याचे वय साडेसात वर्षे आहे. त्याने आत्तापर्यंत ४ वेळा हा पालखी सोहळा केला आहे. त्याला ६ महिन्यांपासून आम्ही चांगल्या सवयी लावतो. त्यामुळे त्याने सोहळ्यात कधी कुणाला लाथ मारल्याची तक्रार आलेली नाही. यासोबत जात असलेल्या स्वारा सोबत आम्ही या अश्वसाठी लागणारा खुराक व इतर साहित्य देतो.

## निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांनी घेतले श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट,दि. ६ जुलै -**

श्री स्वामी समर्थ महाराज हे केवळ एक संत नसून करोडो भक्तांचा श्वास आहेत. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' हा त्यांचा अभयमंत्र आजही संकटकाळी भक्तांना धीर देतो. स्वामी सेवेत नित्य असलेल्या मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांना भेटल्यावर आनंद झाल्याची भावना निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.

त्यांनी येथील श्री स्वामी समर्थ महाराजांचे व वटवृक्षाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत असलेले मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. जे. जमादार, निवृत्त न्यायमूर्ती विनय जोशी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद व स्वामींची प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी गवई बोलत होते. दर्शनानंतर गवई यांनी मंदिर परिसराची पाहणी करून देवस्थान संचलित भक्त निवास, तंत्रनिकेतन महाविद्यालय, तसेच रुग्णालयातील देवस्थानचे व्यवस्थेचे कौतुक केले.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, अक्कलकोट न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश एम. एम. कल्याणकर, एन. एल. ए. शेख, दिवाणी न्यायाधीश क.स्तर अक्कलकोट तसेच न्यायालयातील कर्मचारी वाय.डी. पैठणकर, के. ए. रणदिवे, सोमशेखर बाहेरमठ, अविनाश सुरवसे, सुनील कोनापूरे, अक्कलकोट बार असोसिएशनचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील, उमाप, मंदिर समितीचे पदाधिकारी, सेवेकरी व स्वामीभक्त उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### 'महात्मा फुले व सत्यशोधक चळवळ' यावर आज व्याख्यान

**सोलापूर, दि.६ जुलै-**



बहुजन उद्धारक, स्त्रिया व अस्पृश्यांना शिक्षणाची दारे खुली करणारे, शेतकरी व कष्टकरी समाजाच्या प्रश्नांवर संघर्ष उभारणारे तसेच जातवर्चस्व आणि पुरोहितशाहीविरोधात लढा देणारे क्रांतिबा महात्मा जोतिराव फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षानिमित्त सोलापूर शहर व जिल्ह्यातील पुरोगामी समविचारी मंडळींच्यावतीने फुले विचार प्रबोधन पर्व साजरे करण्यात येत आहे. प्रबोधन पर्वाचा आरंभ मंगळवार दि. ७ जुलै रोजी सायं. ६ वा. डॉ. फडकुले सभागृह येथे मुंबई विद्यापीठचे राज्यशास्त्र प्रमुख व मराठी अभ्यास केंद्र, महाराष्ट्रचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. दिपक पवार यांचे महात्मा फुले व सत्यशोधक चळवळ या विषयावर व्याख्यान होणार आहे, तरी प्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष प्रा.नरेश बदनोरे यांनी केले आहे.

### दिंडूर येथे सासरी विष पिऊन विवाहितेची आत्महत्या

**सोलापूर, दि.६ जुलै-**

अज्ञात कारणावरून सासरी ऊवा मारण्याचे औषध पिलेल्या वीस वर्षीय विवाहितेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी सकाळी नऊ वाजता मृत्यू झाला. गीतांजली सुनील महाडकर (वय २० वर्ष, रा. दोड्याल, ता. अक्कलकोट) असे त्या मयत विवाहितेचे नाव आहे. तिने २७ जून रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास दिंडूर येथे सासरी अज्ञात कारणावरून उवा मारण्याचे औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. यात ती बेशुद्ध होऊन पडली असता तिला पती श्रीकांत जाधव यांनी उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तिचा उपचारा दरम्यान आज सोमवारी सकाळी मृत्यू झाला.

### १३ मैलजवळ रस्त्या अपघातात युपीचा इसम ठार

**सोलापूर, दि.६ जुलै-**

सोलापूर विजापूर महामार्गावरील १३ मैल जवळ यूपीचा एक इसम रस्ते अपघातात मृतावस्थेत रविवारी रात्री आठ वाजता मिळून आला. फिरतलाल परदेशी (वय ४६ वर्ष, रा. राजेपूर, जलालपूर, जिल्हा जौनपूर, उत्तर प्रदेश) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. विजापूर महामार्गावर रविवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास फिरतलाल परदेशी हा गंभीर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत पडलेला १३ मैल जवळील जिओ पेट्रोल पंपा समोर मिळून आला.ही खबर समजताच १०३३ रुग्णवाहिकेतून त्याला येथील शासकीय रुग्णालयात रात्री दहा वाजता दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### वृद्ध शेतकऱ्याला कोयता व लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.६ जुलै-**

शेतीच्या वादातून एका वृद्ध शेतकऱ्याला कोयता व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना माढा तालुक्यातील पिंपळनेर येथे रविवारी घडली. विलास दाजीराम काशीद (वय ६० वर्षे, रा पिंपळनेर) असे त्या मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून ते रविवारी सकाळी शेतामध्ये असताना त्यांना सुभाष भिडे यांनी शेतीच्या वादातून कोयता व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात हाताला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना कुर्डूवाडी येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात ते आज सोमवारी सकाळी स्वतः दाखल झाले.

### शेतकऱ्याला फायबर पाईपने मारहाण

**सोलापूर, दि.६ जुलै-**

शेतीच्या वादातून एका शेतकऱ्याला चाबुक व फायबर पाईप ने मारहाण करण्यात आल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील आंदेवाडी येथे रविवारी घडली. शावरप्पा गुडप्पा बिराजदार (वय ५५ वर्ष , रा. आंदेवाडी) मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून रविवारी दुपारी ते स्वतःच्या शेतात असताना त्यांना गुरुशांत बिराजदार व हनुमंत बिराजदार यांनी मिळून शेतीच्या वादातून मारहाण केली. यात सर्व अंगाला मार लागल्याने त्यांना अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी सकाळी सिद्धाराम बिराजदार यांनी दाखल केले.

# आषाढी वारीत शुध्द पाण्याची हमी

- पालखी मार्गावरील २,१८८ जलस्रोतांपैकी १,५७४ पाणी नमुन्यांची तपासणी पूर्ण
- ६१४ ठिकाणी क्लोरिनेशनच्या सूचना, वारकऱ्यांच्या आरोग्याला प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जुलै-**

आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ होत असताना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वाची खबरदारी घेतली आहे. पालखी मार्गावरील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची व्यापक तपासणी सुरू करण्यात आली असून वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने पालखी मार्गावरील २,१८८ जलस्रोतांची पाहणी केली आहे. त्यापैकी



१,५७४ जलस्रोतांमधील पाणी नमुन्यांची



तपासणी पूर्ण झाली असून हे पाणी पिण्यास योग्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरित स्रोतांवरही आवश्यक ती तपासणी सुरू आहे.

तपासणीदरम्यान ६१४ जलस्रोतांमध्ये क्लोरिनेशनची आवश्यकता आढळून आली. त्यानुसार संबंधित ग्रामपंचायती व यंत्रणांना तातडीने क्लोरिन टाकून पाणी निर्जंतुकीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वारीदरम्यान जलजन्य आजारांचा धोका टाळण्यासाठी पाणी गुणवत्तेवर सातत्याने देखरेख ठेवली जाणार असून आवश्यकतेनुसार पुनर्तपासणीही केली जाणार आहे.

वारीच्या काळात पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता कायम राखण्यासाठी क्लोरिनेशन, स्वच्छता आणि नियमित नमुना तपासणीची मोहीम सुरू राहणार आहे. वारकऱ्यांना सुरक्षित पाणीपुरवठा करून त्यांचे आरोग्य अबाधित ठेवण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे.

#### सर्व जलस्रोतांवर सातत्याने देखरेख

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा जलजन्य आजार होऊ नये, यासाठी सर्व जलस्रोतांवर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. आवश्यक त्या ठिकाणी क्लोरिनेशन, स्वच्छता आणि पाणी गुणवत्तेची पुनर्तपासणी करून शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाईल.

**-अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

#### जल नमुने तालुकानिहाय तपासणीची स्थिती

माढा तालुक्यात सर्वाधिक ८१३ जलस्रोतांपैकी ५६३, पंढरपूरमध्ये ५५२ पैकी ३८९, करमाळ्यात २३१ पैकी १६८, माळशिरसमध्ये ७५ पैकी ५८, मोहोळमध्ये ५२ पैकी ३९, बार्शीत ४५ पैकी ३५, सांगोल्यात १९ पैकी १६, उत्तर सोलापूरमध्ये ४३ पैकी ४३ आणि दक्षिण सोलापूरमध्ये ६ पैकी ६ जलनमुने तपासण्यात आले आहेत.






# नाट्यगीत गायन स्पर्धेत सार्थक बावीकर द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

येथील युवा गायक व सध्या पुणे येथील रहिवासी सार्थक बावीकर याने राज्यस्तरीय नाट्यगीत गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

नटसम्राट बालगंधर्व यांच्या जयंती निमित्ताने आयोजित श्री स्वामीराज प्रकाशन मुंबई आयोजित रविंद्र नाट्य मंदिर मुंबई येथे ही स्पर्धा पार पडली. त्यास १५ हजार रुपये व ट्रॉफी असे बक्षीस आमदार प्रमोद जठार यांच्या हस्ते देण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण ज्ञानेश पेंढारकर, मुकुंद मराठे व बकुळ पंडीत यांनी केले.

याप्रसंगी पद्मश्री नयना आपटे व अर्चना कान्हेरे यांची उपस्थिती होती.





# शहरातील दाल-चावल गाड्यांची चौकशी करा

- अन्न व औषध प्रशासनाला नगरसेविका पूजा वाडेकर यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

धार्मिक कार्यक्रमातील महाप्रसादाच्या जेवणात जनावराची चरबी वापरून लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्याबाबत व शहरात अनधिकृतपणे चालणाऱ्या दाल-चावल गाड्यांची चौकशी करणेबाबत नगरसेविका पूजा वाडेकर यांनी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्तांना निवेदन दिले आहे.

दिलेल्या अर्जात त्यांनी नमूद केले आहे की, दोन दिवसांपूर्वी कीर्ती नगर येथील एमआयडीसी हद्दीत असलेल्या एका हिंदू मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित भक्तांसाठी 'शाकाहारी दाल-चावल' महाप्रसाद म्हणून देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सदर जेवण बनवण्याचे कंत्राट एका आचाऱ्यास दिले होते.

परंतु, अत्यंत खेद आणि संतापाची बाब अशी की, उपस्थित भाविकांचे धर्म भ्रष्ट करण्याच्या आणि धार्मिक भावना दुखावून तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने सदर आचाऱ्याने महाप्रसादाच्या जेवणात 'जनावराची चरबी' वापरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

हा प्रकार अत्यंत गंभीर असून, यामुळे परिसरातील तमाम हिंदू भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत आणि यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे संबंधित आचारी व टोळीची सखोल चौकशी करा, शहरातील सर्व दाल-चावल गाड्यांची तपासणी करावी तसेच दाल-चावल किंवा खाद्यपदार्थात मांसाहारी घटक असल्यास तसे फलक लावा, अशी त्यांनी मागणी केली आहे.

# प्रस्तावित वडाळा अप्पर तहसीलला बाळे गाव जोडण्यास विरोध

- उत्तर तहसीलदार पाटील यांना ग्रामस्थांचे निवेदन
- निर्णय मागे न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

बाळे गावाचा समावेश प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय, वडाळा येथे करण्याच्या निर्णयाला बाळे ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात उत्तर तहसीलदारांना निवेदन सादर केले. हा निर्णय तात्काळ रद्द करून बाळे गावाचा समावेश पूर्ववत मुख्य तहसील कार्यालयातच ठेवावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शासन स्तरावर बाळे गावाचा समावेश प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय, वडाळा अंतर्गत करण्याचा विचार सुरू





असून हा निर्णय नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीचा ठरणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच मजूर वर्गाला शासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

ग्रामस्थांनी मांडलेल्या आक्षेपांनुसार, बाळे गावापासून वडाळा येथील प्रस्तावित कार्यालयाचे अंतर सुमारे २५ किलोमीटर आहे. त्यामुळे उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, फेरफार, महसुली तक्रारी यांसारख्या साध्या शासकीय कामांसाठीही नागरिकांना वारंवार लांबचा प्रवास करावा लागेल. यामुळे वेळ आणि पैशाचा मोठा अपव्यय होणार असून गरीब शेतकरी, मजूर व सर्वसामान्य नागरिकांना त्याचा सर्वाधिक फटका बसेल.

तसेच, बाळे ते वडाळा दरम्यान सार्वजनिक वाहतुकीची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग व्यक्तींना मोठा त्रास सहन करावा लागेल. सध्या बाळे गाव ज्या मुख्य तहसील कार्यालयाशी संलग्न आहे, ते भौगोलिकदृष्ट्या तसेच वाहतुकीच्या दृष्टीने अधिक सोयीचे असल्याने विद्यमान व्यवस्था कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे.


भौगोलिक अडचणी, नागरिकांची गैरसोय आणि वाढणारा आर्थिक भार लक्षात घेऊन बाळे गावाला प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय, वडाळा येथे जोडण्याचा निर्णय तात्काळ रद्द करून पूर्ववत मुख्य तहसील कार्यालयातच ठेवावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. अन्यथा नागरिकांच्या हक्कासाठी व न्यायासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. उत्तर तहसीलदारांना निवेदन देताना किशोर काका पाटील, सुभाष मामा डांगे, सुनील भाऊ भोसले, मारुती आण्णा तोडकरी, विश्वनाथ पाटील, राजेंद्र पुजारी, प्रभाकर भालेकर, दीपक काळे, निशांत कांबळे, तुकाराम तोडकरी, संतोष तोडकरी, अजीम शेख, कृष्णा राठोड, विनोद तोडकरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेवटचा मतदार नोंदणी होईपर्यंत भाजपाकडून प्रशासनाला सहकार्य

#### शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील दि. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत ३९ लाख ३८ हजार ६३१ मतदारांसाठी ३ हजार ७२३ बीएलओ मार्फत हा कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. तरी सर्व बीएलओनी हे काम एक राष्ट्रीय कर्तव्य समजून अत्यंत काटेकोरपणे दिलेली जबाबदारी पार पाडत आहेत. तरीही भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी-कार्यकर्ते या बीएलओंना मतदार याद्यांचे पुनर्रिक्षण करण्यासाठी प्रशासनाच्या त्या टीमला सहकार्य करणार असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी दिली.



३० जून पासून आपल्या जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमास सुरुवात झालेली आहे. सोलापूर जिल्हा हा राज्यात सर्वात जास्त मतदारसंख्या असलेल्या जिल्ह्यात पाचवा जिल्हा आहे. एकूण ११ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३९ लाख ३८ हजार ६३१ मतदार आहेत. त्यामुळे सर्व संबंधित बी एल ओ यांनी या कार्यक्रमांतर्गत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य समजून पार पाडावी. या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. तसेच शिक्षण विभागानेही बी एल ओ म्हणून नियुक्त केलेल्या अडीच हजार पेक्षा अधिक शिक्षकांना विशेष सखोल पुरीक्षण कार्यक्रमातिरिक्त कोणत्याही प्रकारची जबाबदारी देऊ नये. पुढील एक महिना याच कामाला अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. तसेच आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभागाने त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना (आशा वर्कर, अंगणवाडी सेविका) यांनाही इतर अधिकचे जबाबदारी देऊ नयेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले आहेत. तरीही भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, सर्व आमदार, सर्व नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य-पदाधिकारी मतदार यादी पुनर्रिक्षण करण्यासाठी बीएलओंना मदत करू लागले आहेत.

# कर्जत लोणावळा घाटात दरड कोसळल्याने इंद्रायणी एक्सप्रेस रद्द

## सिद्धेश्वर एक्स्प्रेस पुणे स्थानकावरच थांबविली; प्रवाशांचा खोळंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जुलै-**

मुंबई आणि पुण्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका रेल्वे वाहतुकीला बसला आहे. कर्जत-लोणावळा घाटातील ठाकूरवाडी आणि मंकी हिलदरम्यान दरड कोसळल्याने मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द केल्या असून काही गाड्यांचे मार्ग बदलले आहेत. त्याचा परिणाम सोलापूरच्या रेल्वे प्रवाशांवरही झाला असून गाडी क्रमांक १२१६९/१२१७० पुणे-सोलापूर-पुणे इंटरसिटी (इंद्रायणी) एक्सप्रेस सोमवारी रद्द करण्यात आली.

याशिवाय, मुंबईहून रविवारी रात्री सुटलेली मुंबई-सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेस पुणे स्थानकावरच थांबविण्यात आली. तसेच सोलापूरहून मुंबईकडे निघालेली सोलापूर-मुंबई सिद्धेश्वर एक्स्प्रेस देखील पुण्यातच थांबविण्यात आल्याने दोन्ही दिशेने प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांचा मोठा खोळंबा झाला आहे. मुंबईत अडकलेल्या सोलापूरकरांना आता एसटी किंवा खासगी बसने सोलापूर गाठण्याची वेळ आली आहे.

मध्य रेल्वेने अधिकृत 'एक्स' (द) पोस्टद्वारे दिलेल्या माहितीनुसार, घाट विभागात दरड



हटविण्याचे आणि रेल्वे मार्ग पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळे येत आहेत. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासापूर्वी आपल्या गाडीची सद्यस्थिती तपासूनच नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, मुंबईत सोमवारी पहाटेपासूनच मुसळधार पाऊस सुरू असून मध्य, पश्चिम उपनगरांसह दक्षिण मुंबईतील अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. त्यामुळे रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये, असा सल्ला देण्यात आला आहे. पुणे शहर, लोणावळा आणि घाट परिसरातही पावसाचा जोर कायम असल्याने रेल्वे व रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून मुंबई-पुणे मार्गावरील हजारो प्रवाशांना पर्यायी प्रवासाची व्यवस्था करावी लागत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १४९४

**शांतीपरते नाहीं सुख । येर अवघेंचि दु:ख ।।**

संसारात अडकलेल्या जवळपास प्रत्येक जीवाला इंद्रियसुख मिळावे असे वाटत असते. इंद्रियाचे लळे पुरविण्यासाठी तो धडपडतही असतो. पुरवावे तेवढे इंद्रियांचे लळे वाढतच जातात. अर्थात इंद्रियांची तृप्ती कधीच होत नाही. इंद्रिय सुख सहजासहजी व योग्य त्या मार्गानेच मिळेल असे नाही. बऱ्याचवेळा निती नियमाच्या विरोधात जाऊन म्हणजेच अयोग्य मार्गाने इंद्रियांचे लळे पुरवावे लागतात. पण जीवनात केव्हा ना केव्हा अशी वेळ येते किंवा माणसाला असे कळून चुकते की इंद्रिय सुख म्हणजे सर्वस्व नव्हे. इंद्रियसुखाच्या पलीकडे तसेच नीती नियम न तोडता सहज मिळणारे एक प्रकारचे सुख आहे. ते सुख म्हणजे शांती होय. इंद्रियांचा लळा पुरविल्याने सुख, आनंद मिळत असेल पण शांती नाही.



शांती ही सर्व सुख, समाधानाच्या पलीकडची बाब आहे. शांतीच्या प्राप्तीसाठी फक्त मनाची तयारी लागते. शांतीशिवाय इतर प्रकारच्या सुख, समाधानासाठी नको ते करावे लागते. या नको त्या करण्याने आपल्या वाट्याला दु:ख येते. म्हणून खऱ्या अर्थाने शांतीसारखे सुख नाही आणि शांती व्यतिरिक्त जे सुख असते ते मूळात दु:खच असते. या अनुषंगाने बोलताना तुकाराम महाराज म्हणतात,

**शांतीपरते नाही सुख । येर अवघेंचि दु:ख ।।**

इंद्रियसुख तसेच भौतिक सुखात उड्या मारणारा माणूस कधी कधी या सुखामुळे वाट्याला येणाऱ्या दु:खाला, अवमानाला अनितीला इतका कंटाळतो की तो चिडून म्हणतो, मला कांहीही नको रे बाबा फक्त थोडी शांती मिळू द्या. खरे म्हणजे शांती मिळणे एवढी सहज व सोपी बाब नाही. मानसिक ताण आला म्हणजे शांतीची आठवण होते. पण मानसिक ताण का आला याचा विचार माणूस करीत नाही. मानसिक ताण येण्याला आपणच कारणीभूत आहोत,हे विचाराअंती आपल्या लक्षात येते.स्वार्थ,भौतिक सुखाची आवड,इंद्रियाचे लळेपुरविण्यासाठीची धडपड,अहंकार,व्देष, मत्सर या सर्वांमुळे आपण मानसिक तणावात येत असतो. मानसिक तणावावर भौतिक, तसेच इंद्रियसुख हे उपाय नव्हेत. तर केवळ शांती हा एकमेव उपाय असतो. मानसिक ताणाला कारणीभूत असणाऱ्या सर्व घटकांपासून स्वत:ला दूर नेणे किंवा या घटकांना दूर करणे म्हणजे शांतीचे आगमन होणे होय. नाशवंत असणाऱ्या इंद्रिय सुखात लोळण्यापेक्षा शाश्वत असणाऱ्या शांतीचा अनुभव घेण्याचा सल्ला आपणाला संतांनी दिला आहे. संत श्री ज्ञानोबा-तुकोबांनी केलेल्या ज्ञानमार्गाचे आचरण केले तर शाश्वत असणाऱ्या शांती सुखाची अनुभूती आपल्यासाठी दूर नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. ७ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ कृ. सप्तमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- उ.भाद्रपदा (१६.२३)
योग - शोभन (१४.३०)
करण - बालव (२४.५८)
राहू काल : मंगळवार
दु. ०३.०० ते ०४.००

दिनविशेष : १८५४: कावसजी दावर यांनी मुंबईत पहिली 'बॉम्बे स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल' ही कापड गिरणी सुरू केली.१८९६: मुंबईतील वॉटसन हॉटेलमध्ये (एस्प्लनेड मॅन्शन) लुई आणि ऑगस्टे ल्युमिएर या फ्रेंच बंधूंनी भारतात पहिल्यांदाच चित्रपट दाखवला.१९१०: पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळाची' स्थापना झाली.१९९८: सचिन तेंडुलकरने एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ७००० धावांचा टप्पा पूर्ण केला.



## सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचतर्फे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

### बागेवाडी, काळे, पवार, घोडके, चव्हाण यांचा होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचच्या वतीने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून या वर्षीचे जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये जिल्ह्यातील आदर्श मुख्याध्यापक आणि शिक्षकांचा समावेश असून, बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती मंचचे अध्यक्ष फैय्याज शेख व कार्यवाह अरुण धुमाळ यांनी दिली.

या वर्षीचा स्व. मोदीनाबी मीर इसहाक शेख गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार सोलापूरच्या वि. मो. मेहता माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांना तर स्व. विजयकुमार हिराचंद शहा गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक राजकुमार स्वामीराव काळे यांना जाहीर झाला आहे. तसेच शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिला जाणारा गुणवंत शिक्षक पुरस्कार खालील शिक्षकांना प्रदान करण्यात येणार आहे: सविता सतीश पवार (महानगरपालिका मुलांची मराठी शाळा क्र. २६) आनंद बाबुराव घोडके (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कल्लहिप्परगे, ता. अक्कलकोट) राजकिरण आत्माराम चव्हाण (श्री समर्थ विद्यामंदिर) हा गौरव सोहळा सोलापूर येथील श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. न. भा. काकडे असणार असून, महाराष्ट्र साहित्य परिषद (मसाप), पुणे येथील जिल्हा प्रमुख डॉ. श्रुती श्री वडकबाळकर यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण केले जाईल. सन्मानपत्र, पुस्तक आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# झेडपी शाळांची 'पाचवी'ची झेप

## सोलापूर जिल्ह्यात २८०० जिल्हा परिषद शाळांना पाचवीपर्यंत शिक्षणाची मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण शिक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणारा निर्णय जिल्हा परिषद प्रशासनाने घेतला असून, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आता पाचवीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या गावातच पुढील शिक्षण घेण्याची संधी मिळणार असून, चौथीनंतर खासगी शाळांकडे होणारे स्थलांतर मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शिक्षण सभापती चेतनसिंह केदार आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील सुमारे २८०० जिल्हा परिषद शाळांमध्ये पाचवीच्या वर्गांना मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा मिळाल्याचे मानले जात आहे.

यापूर्वी जिल्हा परिषद शाळांमध्ये केवळ पहिली ते चौथीपर्यंत शिक्षणाची सुविधा होती. त्यामुळे चौथी पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना



पाचवीसाठी खासगी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागत होता. या परिस्थितीचा लाभ घेत अनेक ठिकाणी खासगी शिक्षण संस्था उभ्या राहिल्या. मात्र आता गावातीलच झेडपी शाळेत पाचवीची सुविधा उपलब्ध झाल्याने पालकांचा कल पुन्हा सरकारी शाळांकडे वळण्याची शक्यता आहे.

या बदलाचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागातील खासगी शाळांवर होण्याची चिन्हे आहेत. प्रवेशसंख्या घटल्यास काही शाळांमधील तुकड्यांवर गंडांतर येण्याची शक्यता असून, शिक्षक अतिरिक्त होण्याचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कोणत्या गावांमध्ये पाचवीच्या वर्गांना मंजुरी मिळाली आहे, याची माहिती घेण्यासाठी अनेक खासगी शाळांचे प्रतिनिधी आणि शिक्षक जिल्हा परिषद कार्यालयात चौकशी करत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे शिक्षण सभापती चेतनसिंह केदार यांनी स्पष्ट केले आहे.

### शाळांच्या अतिक्रमणाचा प्रश्नही ऐरणीवर

एकीकडे जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रशासन प्रयत्नशील असताना दुसरीकडे शाळांच्या इमारतींवरील अतिक्रमणाचा प्रश्नही गंभीर होत आहे. पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथील प्रकारानंतर आता दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुसूर येथील जिल्हा परिषद शाळेवरही अतिक्रमण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जिल्हा परिषद शाळांचे जतन, संरक्षण आणि शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन कोणती कारवाई करतात, याकडे ग्रामस्थांसह शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## कारागृहातील बंदी बांधवांचा कीर्तन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

महाराष्ट्र शासन, सांस्कृतीक कार्य विभाग आणि वै. मामासाहेब दांडेकर वारकरी सेवा संघ, आळंदी देवाची व सोलापूर जिल्हा कारागृह यांच्या संयुक्त विदयमाने बंदी बांधवांचे किर्तनातून प्रबोधन व्हावे, या उद्देशाने हभप निलेश महाराज झरेगांवकर यांच्या भक्तीमाधुर्यात प्रासादिक किर्तन सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे सुहास वारके यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक सुनिल ढमाळ यांच्या प्रेरणेने जिल्हा कारागृहामध्ये घेण्यात आला.

या किर्तन सोहळयामध्ये हभप निलेश महाराज झरेगांवकर यांनी रामायण व महाभारत यामधील विविध मार्मीक उदाहरणे देवून, जीवनात झालेली चुक आणि जीवनातील नकारात्मक विचार दूर ठेवून यापुढे चांगले सन्मार्गाने जीवन जगावे, तसेच महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनातील विविध प्रसंग, विविध घटना याबाबत प्रासादिक किर्तन सोहळयाच्या माध्यमातून बंदी बांधवांना प्रबोधन करण्यात आले.

या किर्तन सोहळ्याकरिता पेटीवादक कैलास चिंचोलकर, तबला वादक रामचंद्र गवळी, गायक दत्ता पाथरूड यांनी साथ दिली. या कार्यक्रमाकरिता कारागृह अधीक्षक सुशिल कुंभार, वरिष्ठ तुरूंगाधिकारी बिरू खळबुटे, कारागृह शिक्षक अंगद गव्हाणे, वारकरी सेवा संघाचे जिल्हाप्रमुख अमोल सुतार आदी उपस्थित होते. कारागृह शिक्षक अंगद गव्हाणे यांनी सूत्रसंचालन केले.

## सोलापुरात रोजगार व असंघटित क्षेत्राच्या व्यापक सर्वेक्षणाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात प्रथमच Periodic Labour Force Survey व Annual Survey of Unincorporated Sector Enterprises या दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणांना सुरुवात झाली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते माहिती पत्रकाचे विमोचन करून सर्वेक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) यांच्या सहकार्याने एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राज्यात ही सर्वेक्षणे राबविली जाणार आहेत.

रोजगार, बेरोजगारीचे प्रमाण आणि असंघटीत क्षेत्राबाबत जिल्हानिहाय आकडेवारी मिळवणे हा या सर्वेक्षणाचा उद्देश आहे. सोलापूर जिल्ह्यात PLFS साठी नागरी व ग्रामीण भागातील १२०, तर SUSE साठी ६४ असे १८४ नमुना गावे/ब्लॉक निवडण्यात आले आहेत.

### नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी नागरिकांना प्रगणकांना अचूक व सत्य माहिती देण्याचे आवाहन केले. उप आयुक्त संगीता मोरे म्हणाल्या, शास्त्रीय नमुना निवड पद्धतीनुसार निवडक कुटुंबे व आस्थापनांचे सर्वेक्षण होणार आहे. ही कुटुंबे संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे प्रत्येकाची माहिती मौल्यवान आहे. संकलित माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. यावेळी सांख्यिकी अधिकारी दिनकर बंडगर व कर्मचारी उपस्थित होते.

## विधी, बीपीएड, एमपीएड प्रवेश नोंदणीस मुदतवाढ

**सोलापूर, दि. ६ जुलै-**

सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) उच्च शिक्षणाअंतर्गत असलेल्या ३ वर्षीय विधी, बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याची मुदत आता ८ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. सीईटी परीक्षेतील उमेदवारांना निकालानंतर अर्ज सादर करण्यासाठी पूर्वी ३० जूनपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. ऑनलाइन नोंदणी करताना उमेदवारांनी पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र व स्वाक्षरीची स्कॅन प्रत निर्धारित आकारात जेपीजी /जेपीईजी स्वरूपात अपलोड करणे आवश्यक आहे. संबंधित अभ्यासक्रमांसाठी सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रे स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत सादर करावीत,

## एन. बी. नवले सिंहगडचे विद्यार्थी देशातील नामांकित कंपन्यांत झळकले

### २३३ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव-सोलापूरने यंदाच्या प्लेसमेंट हंगामात उल्लेखनीय यश संपादन करत उद्योगविश्वात आपल्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रभावी छाप पाडली आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड केली असून २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन शैक्षणिक वर्षात२३३ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट, तर २४८ विद्यार्थ्यांना इंटर्नशिपच्या संधी मिळाल्या आहेत.



यंदाच्या प्लेसमेंटमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील कीर्तन करवा याने दुबईस्थित कन्सिस्टंट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स एलएलसी (अभियांत्रिकी सल्लागार कंपनी) या आंतरराष्ट्रीय कंपनीत ऑटोमेशन इंजिनिअर पदासाठी वार्षिक १८.५५ लाख रुपयांच्या आकर्षक पॅकेजसह ऑफर मिळवत महाविद्यालयातील सर्वोच्च प्लेसमेंटचा मान पटकावला आहे.

तसेच विशाल मोटे याची NICE या जागतिक तंत्रज्ञान कंपनीमध्ये ७.५ लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर निवड झाली असून, ओंकार सुरवसे याने रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये ६ लाख रुपयांच्या पॅकेजसह यश संपादन केले आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील संजना टाळकोकुळ हिची रॉकवेल ऑटोमेशन मध्ये ६.५ लाख रुपयांच्या पॅकेजवर निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे, प्रा. शशिकांत हिप्परगी, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि प्लेसमेंट विभागाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शिक्षणासाठी समाजाने पुढे यावे : डॉ. मोटे

### श्रीमंतयोगी प्रतिष्ठानने घेतले ६१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

शिक्षण ही केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नसून सक्षम, प्रामाणिक आणि आत्मविश्वासू व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. होतकरू विद्यार्थ्यांच्या पाठीशी समाजाने ठामपणे उभे राहण्याची गरज असून श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानने ६१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक घेऊन राबविलेला उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितीन मोटे यांनी केले.



### बोर्ड परीक्षा शुल्कासह शालेय साहित्य वितरीत

यावेळी इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे, तर नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, बॅग, कंपासपेटी तसेच बोर्ड परीक्षेच्या शुल्कासाठी आवश्यक मदत देण्यात आली. सोलापुरातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला असून यंदा ६१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक घेण्यात आले. गेल्या नऊ वर्षांत प्रतिष्ठानने ५११ विद्यार्थ्यांना दत्तक घेतल्याची माहिती संस्थापक महेश कासट यांनी प्रास्ताविकात दिली.

शहरातील शिवस्मारक सभागृह येथे श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित शैक्षणिक दत्तक योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर उद्योजक केतन वोरा, अथर्व क्लिनिकचे डॉ. सुधाकर मोहोळे, बँक ऑफ इंडियाचे सीनियर मॅनेजर आकाश मुंढे, सोलापूर महानगरपालिकेचे हुद्दा अभियंता अभिजीत बिराजदार, लायन्स क्लब जुळे सोलापूरचे माजी अध्यक्ष सागर पुकाळे, संस्थापक अध्यक्ष महेश कासट उपस्थित होते.सूत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षता कासट यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रूपा कुत्ताते, सुजाता सक्करगी, भारती जवळे, ज्योती कासट, दीपक बुलबुले, शामकुमार मुळे, राजू कोकाटे, श्रीरंग रेगोटी, अभिजीत व्हानकळस, आकाश लखोटिया, दिनेश मंत्री, संतोष आलकुंटे, महेश ढेंगळे, दीपक करकी, राजेश केकडे, श्रीनाथ श्रीगण, गणेश येळमेली, सुरेश लकडे, नागेश कोळी यांनी परिश्रम घेतले.



## लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी बनल्या कृषीकन्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

आधुनिक काळातील नव नवे तंत्रज्ञानातून शेतीचा विकास करण्यासाठी निर्माण झालेल्या विविध मोबाईल ॲप्सची माहिती उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी खुनेश्वर गावात जावून दिली. कृषीकन्या बनून विद्यार्थीनींनी शेतकऱ्यांना या आधुनिक मोबाईल ॲप्सचा कसा लाभ करून घेता येईल हेही समजावून सांगितले.

प्रात्यक्षिक दाखवताना शेतकऱ्यांना समजेल अशा साध्या भाषेत आधुनिक ॲप्सची माहिती देवून शेतात या मोबाईल ॲप्सच्या माध्यमातून शेतीचे व्यवस्थापन कसे करावे, हवामानाचा अंदाज कसा घ्यावा, बाजारभाव काय आहे, शेतातील फळ आणि पिकांना किड, बुरशी पासून कसे संरक्षण करावे याबाबत कृषीकन्या बनलेल्या विद्यार्थीनीनी शेतकऱ्यांना माहिती दिली. त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. हा उपक्रम लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, रावे कार्यक्रम समन्वयक अधिकारी डॉ. व्ही.टी. दावणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थीनी कृषीकन्या अंबिका फताटे, प्राची आवताडे, सुषमा पवन गोल्ला, तृप्ती कदम, ऐश्वर्या बंडगर, प्रणाली रूपनर यांनी यामध्ये सहभाग घेतला.

# महिलांसाठी टॅली व एमएस-सीआयटी संगणक प्रशिक्षण

## सभापती ॲड. अमृता वाघे यांची माहिती; जिल्हा परिषद महिला व बाल विकास समितीच्या सभेत घेण्यात आला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषद महिला व बाल विकास समितीच्या सभेत महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी टॅली व एमएस-सीआयटी संगणक प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत, तसेच ग्रामीण भागातील मुलींच्या सुरक्षेसाठी कराटे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती सभापती ॲड.अमृता वाघे यांनी दिली.

सोलापूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समितीची मासिक सभा समितीच्या सभापती ॲड. अमृता वाघे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत विविध योजनांना मंजुरी देण्यात आली. सभेच्या प्रारंभी जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी जिल्हा परिषद सेस योजना (सन २०२६-२७) अंतर्गत गट 'अ' व गट 'ब' मधील विविध योजनांची माहिती सादर केली. त्यानंतर समितीने अनेक योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठी शिफारस केली. महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी टॅली व एमएस-सीआयटी संगणक प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत, तसेच



संग्रहित छायाचित्र

ग्रामीण भागातील मुलींच्या सुरक्षेसाठी कराटे (स्वसंरक्षण) प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

महिलांच्या विविध समस्यांच्या निवारणासाठी समुपदेशन केंद्र सुरू करण्याचाही प्रस्ताव सभेत मांडण्यात आला.याशिवाय उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना व पर्यवेक्षकांना पुरस्कार देणे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आणि महिला लोकप्रतिनिधींसाठी अभ्यास दौरे आयोजित करण्यासही मान्यता देण्यात आली. गट 'ब' अंतर्गत मंजूर योजनेत ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाचवी ते दहावीतील मुलींना सायकल वाटप, अंगणवाडी केंद्रांना बसकर पट्टी उपलब्ध करून देणे आणि महिलांना विविध उपयुक्त साहित्य पुरविण्याच्या योजनांना समितीने मान्यता दिली.तसेच विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीतील महिला व मुलींसाठी कौशल्यवृद्धीच्या दृष्टीने टॅली व एमएस-सीआयटी प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेऊन पुढील कार्यवाहीस मंजुरी देण्यात आली. सभापती ॲड. वाघे यांनी महिला व मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी समिती कटिबद्ध असल्याचे सांगितले. विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर महिला वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत समिती सदस्य चेताली मुळे, करुणा शिवशरण, बागल यांनी सूचना मांडल्या.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### आपत्कालीन परिस्थितीत राज्यातील जनतेने सतर्क राहावे : मुख्यमंत्री

**सोलापूर, दि. ६ जुलै-**

राज्यात उद्‌भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.



### करकंब येथे शिंदे परिवाराकडून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**करकंब, दि. ६ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले क्रमांक १ व मुली क्रमांक २ या प्रशालेतील विद्यार्थ्यांना अर्जुन शिंदे, वैभव शिंदे, प्रतीक्षा वैभव शिंदे व शिंदे परिवाराच्या वतीने वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुली क्र.२चे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य विजय नलवडे, विशाल शिंदे, सोनाली गायकवाड, पत्रकार लक्ष्मण जाधव, केंद्रीय मुख्याध्यापक हमीद शेख, मुली क्र.२ मुख्याध्यापिका सोनाली पोतदार, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना अर्जुन शिंदे यांनी विद्यार्थ्यांनीं बिकट परिस्थितीवर मात करत आपले ध्येय गाठावे त्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योग्य पद्धतीने अभ्यास करावा, असे मनोगत व्यक्त केले. सोनाली पोतदार यांनी आभार मानले.



### आमदार राजेंद्र राऊत यांनी नवनिर्मित न्यायालयीन कामाचा घेतला आढावा

**बार्शी, दि. ६ जुलै-**

तालुक्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या नवनिर्मित न्यायालयीन इमारतीच्या कामाची पाहणी आमदार राजेंद्र राऊत यांनी आज केली. यावेळी त्यांनी कामाच्या प्रगतीचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना दर्जेदार काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. बार्शी शहरात स्टील्ट + तळमजला + ३ मजली अशा स्वरुपात हे न्यायालयीन संकुल उभारण्यात येत आहे. या इमारतीत एकूण १५ कोर्ट हॉल असणार आहेत. त्यामुळे बार्शी तालुक्यातील पक्षकार, वकील व नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व न्यायालयीन सुविधा मिळणार असून न्यायदान प्रक्रियेला गती मिळेल, असा विश्वास आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केला. या न्यायालयीन इमारतीमध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र रॅम्प, लिफ्ट, वातानुकूलित यंत्रणा, सीसीटीव्ही व अग्निशमन यंत्रणा बसवण्यात येणार आहे. तसेच पाणीपुरवठा, मल निस्सारण, जमिनीखालील पाण्याची टाकी, बोरवेल, पंप हाऊस, जनरेटर व रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम यांसारख्या पायाभूत सुविधा असतील. इमारतीच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंत व गेट, सुरक्षारक्षक कक्ष, फ्लॅग पोस्ट उभारण्यात येणार आहे. अंतर्गत व बाह्य विद्युतीकरण, सर्व प्रकारचे फर्निचर, अंतर्गत रस्ते, नाला कव्हरिंग, अंतर्गत गटार व परिसरात बगीचे विकसित केले जाणार आहेत.



### जीवनात शिक्षकाचे स्थान अढळ : प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार

**सोलापूर, दि. ६ जुलै-**

समाजात शिक्षकांना खूप महत्त्वाचे स्थान असून आई वडिलानंतर विद्यार्थी शिक्षकांना मान सन्मान देतात.स्पर्धेतील विद्यार्थी निवडून त्यांना निरपेक्ष पणाने मार्गदर्शन करणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक होय.

अशा शिक्षकांमुळे समाजाची जडणघडण होते.असे मननीय विचार संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार यांनी श्री सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालय,सोलापूरचे सदस्य व शिक्षक आण्णाराव तुप्पद यांच्या सेवापूर्ती समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री सिध्दारामेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांकडून करण्यात आले. इंग्रजी विषयाचे अध्यापक म्हणून आण्णाराव तुप्पद यांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकणारे होते.या प्रसंगी त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.अशी भावना वक्त्यांनी व्यक्त केली.आण्णाराव तुप्पद यांनी बसवराज प्रशाला करजगी व हत्तुरे प्रशाला मजरेवाडी येथे ३६ वर्षे सेवा केली. याप्रसंगी आण्णाराव तुप्पद यांनी सत्काराबद्दल आभार व्यक्त करुन शेवटपर्यंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संजीवनी तुप्पद बिराजदार यांनी केले. कार्यक्रमास शारदादेवी बिराजदार,श्रीदेवी तुप्पद उपस्थित होते.

# वारकऱ्यांना मिळणार ५० हजार रेनकोट

**माऊलींच्या स्वागतासाठी सोलापूर झेडपी सज्ज**

**५ हजार फिरती शौचालये, २२५ पाण्याचे टँकर्स**

**स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेलाही मोठी बळकटी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे येणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने यंदा विक्रमी प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी पूर्ण केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत अनेक सुविधांमध्ये दुप्पट ते सहापटीपर्यंत वाढ करण्यात आली असून, पावसाळ्याचा विचार करून प्रथमच ग्रामविकास विभागामार्फत ५० हजार रेनकोटचे वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे यंदाची वारी अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि वारकरी- केंद्रित करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.



यंदा वारकऱ्यांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या सुविधांमध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. गेल्या वर्षी मोठा प्रतिसाद मिळालेल्या फूट मसाजर सुविधेची संख्या यंदा तब्बल पाचपटीने वाढविण्यात आली आहे. महिला आणि पुरुष वारकऱ्यांसाठी स्वतंत्र स्नानगृहांची संख्या सहापटीने वाढविण्यात आली असून, इतर मूलभूत सुविधांमध्येही दोन ते तीनपटीने वाढ करण्यात आली आहे. स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देत पंढरपूर, वाळवंट परिसर, ६५ एकर क्षेत्र तसेच संपूर्ण पालखी मार्गाची साफसफाई करण्यासाठी व्यावसायिक संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेचे ८०० स्वच्छता दूत पालखीसोबत तसेच मुक्कामाच्या ठिकाणी कार्यरत राहणार आहेत. उघड्यावर शौचास प्रतिबंध करण्यासाठी ५ हजार फिरती शौचालये उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी पालखी मार्गावर २२५ पाण्याच्या टँकर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक उपाययोजनाही अधिक सक्षम करण्यात आल्या असून, आरोग्य दूतांची संख्या दुप्पट करण्यात आली आहे. आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय पथके आणि आपत्कालीन सुविधा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. यंदाच्या वारीत केवळ सुविधा वाढविण्यावर भर न देता वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ, आरोग्यदायी आणि सुसूत्र सेवा देण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला असून, यामुळे आषाढी वारीचा अनुभव अधिक सुखकर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती देताना सांगितले की, देहू आणि आळंदी येथून निघालेल्या पालख्यांच्या मार्गावरील सर्व प्रमुख मुक्कामांवर जर्मन हँगर्स, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, स्नानगृहे आणि अन्य मूलभूत सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. संपूर्ण यंत्रणा २४ तास कार्यरत ठेवण्यात आली असून, वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाला जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी उभारण्यात येणाऱ्या जर्मन हँगर्सच्या क्षेत्रफळातही मोठी वाढ करण्यात आली आहे. मागील वर्षी तीन जिल्ह्यांत मिळून ५ लाख चौरस फूट क्षेत्रात उभारण्यात आलेले हँगर्स यंदा थेट १२ लाख चौरस फूट क्षेत्रापर्यंत विस्तारण्यात आले आहेत. त्यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध होणार आहे.

वारीचे नियोजन आणि समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठी शासनाकडे सहा गटविकास अधिकाऱ्यांची (बीडीओ) डेप्युटेशनवर नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली असून, त्यासंदर्भातील आदेश लवकरच अपेक्षित आहेत. हे अधिकारी पालखी मार्गावरील विविध टप्प्यांवर नियंत्रण, समन्वय आणि सुविधा व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळणार आहेत.

## आईच्या आठवणीने लेखणीसुध्दा क्षणभर थांबते

**ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे यांच्या हस्ते शेवंताई पुस्तकाचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

आईशिवाय जगात मोठं कोणतंही दैवत नाही. आईचं ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. मातृऋण, पितृऋण, समाजऋण आपण फेडलं पाहिजे. साहित्य हे मूल्याधिष्ठित असले पाहिजे. चिंतन, मनन केल्याशिवाय सुखाचा शोध घेता येत नाही. तशाच आईविषयीच्या आठवणी, उत्कट भावना लेखकांनी या पुस्तकात मांडल्या आहेत. आईच्या प्रेमात राहिलो तरच यशाचा मार्ग मिळतो. आईकडे 'नाही' हा शब्द नसतो. आईची सावली कायम असली पाहिजे. त्यातून प्रेरणा, बळ मिळते. आईच्या आठवणीने लेखणीसुद्धा क्षणभर थांबते. लेखणीलाही गहिवर फुटतो, असे मत ज्येष्ठ साहित्यिक, मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी व्यक्त केले.



येथील डॉ. प्रमोद कसबे लिखित शेवंताई या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे, मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, माजी जिल्हा उपनिबंधक अशोक भांडवलकर, डॉ. नसीम पठाण, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले, नगरसेवक गौतम कसबे, डॉ. प्रमोद कसबे, रोहिणी कसबे यांच्या हस्ते सोमवारी सकाळी मनोरमा कॉन्फरन्स हॉलमध्ये झाले. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा उपनिबंधक अशोक भांडवलकर, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, मसापचे जिल्हाप्रमुख पद्माकर कुलकर्णी, साहित्यिक राजेंद्र भोसले, भारत कसबे यांच्यासह डॉ. कसबे यांचे कौटुंबिक सदस्य उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, मसापचे जिल्हाप्रमुख पद्माकर कुलकर्णी, डॉ. नसीम पठाण, भारत कसबे उपस्थित होते. शाहीर सुभाष खाडे यांनी सूत्रसंचालन केले. भारत कसबे यांनी आभार मानले.

## जुनी मिल प्रकरणातील १२२ नागरिकांना प्लॉट देणार

**२० जुलैपासून संपर्क करण्याचे कामगार नेते करजगी यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जुलै-**

जुनी मील प्रकरणातील उर्वरित १२२ नागरिकांना न्यायालयाने निश्चित केलेल्या मूळ दरात प्लॉट उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा करतानाच यासाठी संबंधितांनी २० जुलै २०२६ रोजी जुनी मील परिसरात संपर्क साधावा, असे आवाहन जुनी मील बेकार कामगार वारसदार आणि जनहित संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष कुमार करजगी यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

जुनी मील बंद झाल्यानंतर हजारो कामगारांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. कामगारांचे दावे न्यायालयात दाखल नसल्याचे लक्षात आल्यानंतर १९८८ मध्ये संघर्ष समितीची स्थापना करून न्यायालयात ९ हजार कामगारांचे दावे दाखल करण्यात आले. तब्बल ३५ वर्षांच्या संघर्षानंतर कामगारांना त्यांच्या कष्टाचा मोबदला मिळवून देण्यात यश आले, असा करजगी यांनी केला.जुनी मीलची जागा बिल्डर्सना अल्प दरात मिळू नये आणि सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात प्लॉट मिळावेत, या उद्देशाने न्यायालयीन लिलावात सहभाग घेतल्याचेही त्यांनी सांगितले. त्यावेळी ७७८ नागरिकांनी न्यायालयात रक्कम जमा केली होती. मात्र विविध कारणांमुळे लिलाव रद्द झाला आणि नागरिकांची रक्कम न्यायालयात अडकली. त्यानंतर दीर्घ न्यायालयीन लढा देत उमा सहकारी गृह निर्माण संस्थांमार्फत नागरिकांना प्लॉटचे वाटप करण्यात आले. महापालिकेच्या आरक्षणांमुळे १२२ जणांना अद्याप प्रत्यक्ष ताबा मिळालेला नाही.या १२२ नागरिकांना किंवा प्लॉट मिळूनही माझ्याविरोधात तक्रारी केलेल्या व्यक्तींनाही कोणताही आकस न ठेवता मूळ दरात प्लॉट देण्याची प्रक्रिया पूर्ण करणार असल्याचे करजगी यांनी स्पष्ट केले. ७७८ पैकी १२२ लोकांना प्लॉटचे वाटप होवून त्यांच्या जागेवर रिझेंवेशन असल्याने त्यांचा प्लॉट त्यांच्या ताब्यात मिळाला नाही अशा १२२ लोकांनी व ज्यांना प्लॉट मिळून सुद्धा त्यानी माझ्या विरोधात खोट्या तक्रारी केल्या आहेत अशा लोकांनी सोमवार दि. २० जुलै २०२६ रोजी जुनी मील कंपौंड येथे संपर्क साधावा. ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत त्या सर्व मंडळींना ज्या किंमतीस न्यायालयातून जूनी मील कंपौंडची जागा मिळाली ' त्याच किंमतीस प्रतिष्ठीत मंडळीना दिलेल्या वचनाची मला पूर्तता करावयाचा मानस असल्याचेही करजगी यांनी सांगितले.

## टेंभुर्णी शहरातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये वह्या वाटपाचा उपक्रम



**रावसाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रमाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. ६ जुलै-**

माढा तालुक्याचे युवक नेते रावसाहेब देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील सर्व जिल्हा परिषदेच्या दहा प्राथमिक शाळेमध्ये वह्या वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सक्षम व्हावा, हाच वह्या वाटपाचा उद्देश असल्याचे या उपक्रमाचे संकल्पक राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांनी सांगितले.

यावेळी सोमनाथ कदम, गोरख देशमुख, गणेश केचे, शेखर जगताप, वैभव महाडिक-देशमुख, शैलेश ओहोळ, अप्पासाहेब हवलदार, विकास धोत्रे, विजय कोकाटे, प्रशांत देशमुख, आशिष लोंढे, सुरेश देशमुख, अजित बेसुळके, सुहास देशमुख, समाधान देशमुख, निलेश खरात, नितीन चव्हाण, अविनाश धोत्रे, समाधान जगताप, नितीन महाडिक, रत्नदिप अटकळे, नाना भोसले, विनोद देशमुख, अदित्य देवकर, समीर नाईकनवरे, करण सरवदे, रोहित भोसले, जयवंत देशमुख उपस्थित होते. मुख्याध्यापक रोडगे यांनी आभार मानले.



## ओन्ली संस्थेतर्फे गोशाळेस चारा वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ जुलै-**

बार्शीतील जाणीव फाउंडेशन गोशाळेस महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून मुक्या जनावरांना ५१ हजार रुपयांचा चारा वाटप बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार, माऊली उद्योग समूहाचे अध्यक्ष अमृतनाना राऊत, बार्शीतील आहारतज्ञ डॉ. नलिनी सचिन गोटे यांच्या हस्ते चारा वाटप करण्यात आला.

जाणीव फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष तुळशीदास मस्के, मामा हावलदार व त्यांच्या पदाधिकारी यांनी बार्शी शहराचे पोलीस निरीक्षक गणेश कुंभार, अमृतनाना राऊत, डॉ. नलिनी गोटे, विजयकुमार येवारे यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. तुळशीदास मस्के यांनी प्रस्ताविक केले. मामा हवालदार यांनी संस्थेचा कार्याबद्दलची माहिती दिली. ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांनी आपल्या भाषणात या मुक्या जनावरांना चारा वाटप या उपक्रमास नाव न टाकण्याच्या अटीवर ज्यांनी देणगी दिली त्याचे आभार मानले. बार्शी शहर पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास जाणीव फाउंडेशन संस्थेच्या सर्व सन्माननीय पदाधिकारी पत्रकार बांधव ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी, उपाध्यक्ष संतोष शेळगावकर, सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार माणकोजी ताकभाते, प्रा. रतिकांत हामने, प्रा. सचिन मस्के, सुनील फल्ले, सुरेंद्र स्वामी, केदारनाथ वळेकर, अतुल वाणी, विजय येवारे, रेखा विधाते, रागिनी झेंडे, रेखा सरवदे, अनुसया आगलावे, आशादेवी स्वामी, प्रमिला झोंबाडे, त्रिशाला मिसाळ उपस्थित होते. आभार संस्थेचे सहसचिव नागनाथ सोनवणे यांनी मानले.

## महाविद्यालयांनी शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी नॅक मूल्यांकन करावे : डॉ. पुजारी

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात नॅक मूल्यांकन प्रेरित कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ जुलै-**

महाविद्यालयातील अध्यापन, संशोधन, पायाभूत सुविधा, विद्यार्थी सेवा प्रशासन व्यवस्था आदीची गुणवत्ता नॅक समितीकडून तपासून घेतल्यास महाविद्यालयास नॅकचे मानांकन प्राप्त होते. त्यानंतर राष्ट्रीय अनुदान मंडळाकडून भरघोस आर्थिक निधी देखील उपलब्ध होतो, म्हणून महाविद्यालयांनी स्वतःच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी नॅक मूल्यांकन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रा. डॉ. सिद्राराम पुजारी यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात विद्यापीठाच्या सूचनेनुसार नॅक मूल्यांकन व पुनर्मल्यांकन प्रेरित कार्यशाळा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते व्यासपीठावर संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ दिगंबर झोंबाडे, प्राध्यापिका डॉ लक्ष्मी मुशन, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह




लोखंडे, नॅक समन्वयक प्रा. हर्षदा गायकवाड, प्रा राजशेखर पवार उपस्थित होते. प्रारंभी पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. डॉ. शितल झिंगाडे यांनी केले तर आभार प्रा. सौरभ भस्मे यांनी मानले.

**नॅकचे नवीन पोर्टल कार्यान्वित होताच महाविद्यालयाचे मूल्यांकन होईल**

उत्कृष्ट अध्यापन, पारदर्शक प्रशासन, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धतीच्या जोरावर नवीन पोर्टल कार्यान्वित होताच आमचे महाविद्यालय नॅक मूल्यांकनासाठी सामोरे जाणार आहे असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सापटणेत पत्राशेडमधून ६० हजारांच्या शेळ्या-बोकडांची चोरी



**टेंभुर्णी, दि.६ जुलै-**
माढा तालुक्यातील सापटणे (टें.) येथे शनिवारी दि. ५ जुलै रोजी चोरट्यांनी घरासमोरील पत्राशेडमध्ये बांधून ठेवलेल्या शेळ्या व बोकडांची चोरी केली. या प्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

चोरीमध्ये सुमारे ६० हजार रुपये किमतीची दोन शेळ्या, दोन पाटी (मादी शेळ्या) आणि दोन बोकड लंपास केले आहेत. सचिन जगताप (वय ३८, रा. सापटणे) यांनी घरासमोरील पत्राशेडमध्ये दोन मोठ्या काळ्या रंगाच्या शेळ्या, दोन काळ्या रंगाच्या पाटी आणि दोन काळ्या रंगाचे बोकड बांधून ठेवले होते. शुक्रवारी (४ जुलै) रात्री सुमारे १२.१५ वाजल्यापासून शनिवारी (५ जुलै) पहाटे ५.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत चोरट्यांनी ही जनावरे चोरून नेली. यानंतर त्यांनी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.



### महत्त्वाचे...

## पंढरपूर सिंहगड महाविद्यालयातील हर्षदीप कांबळेची डेलॉईट कंपनीत निवड



**पंढरपूर, दि. ६ जुल-**
येथील एसकेएन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग मधील संगणक अभियांत्रिकी विभागाचा विद्यार्थी हर्षदीप हरिदास कांबळे याची प्रतिष्ठित डेलॉईट कंपनीत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे. त्याला वार्षिक ६ लाख रुपयांचे आकर्षक वेतन पॅकेज मिळाले असून त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

हर्षदीपच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. समीर कटेकर डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ.अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडूरु, डॉ. यशवंत पवार, डॉ. सत्यवान जगदाळे यांनी अभिनंदन केले.




## 'अ‍ॅक्वा चिल सिस्टम्स इंडिया प्रा.लि.' कंपनीत स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

**पंढरपूर, दि.६ जुलै -**
'अ‍ॅक्वा चिल सिस्टम्स इंडिया प्रा.लि.' या कंपनीने घेतलेल्या कॅम्पस ड्राईव्हमधून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील दोन विद्यार्थ्यांची निवड झाल्याचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सांगितले. अवधूत भोसले व रोहन रोकडे अशी त्यांची नावे आहेत. स्वेरी अभियांत्रिकीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांत येथील विद्यार्थी करिअर घडवीत आहेत. असेही यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंटमधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## विश्वकर्मा पांचाळ समाजातील गुणवंत विद्यार्थी, कर्तृत्ववान व्यक्तींचा होणार सन्मान

**अक्कलकोट, दि.६ जुलै-**
श्री विश्वकर्मा पांचाळ समाज कालिका देवस्थान, उत्तर कसबा, मसरे गल्ली, सोलापूर यांच्या वतीने रविवार, २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत गुणवंत विद्यार्थी व समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव सोहळा आयोजित केल्याचे कालिका देवस्थानचे अध्यक्ष शिवानंद सुतार यांनी सांगितले. विजापूर रोड येथील नेहरूनगर स्टॉप, सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे हा कार्यक्रम होणार आहे. यंदाही समाजातील १० वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत ६० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे. तसेच विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा, समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांचा आणि सन २०२५-२६ मध्ये निवृत्त झालेल्या ज्येष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सन्मान होणार आहे. कार्यक्रमाला मुरगाडेवेश्वर संस्थान मठ, अपचलपूर येथील श्री श्री श्री प्रणव निरंजन महास्वामी यांचे सान्निध्य लाभणार आहे. आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय अखिल भारतीय विश्वकर्मा महासभेचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत.

# पालखी सोहळ्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

### माळशिरस तालुका आरोग्य अधिकारी भाऊसाहेब जानकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस दि. ६ जुलै-**
संत तुकाराम महाराज पालखी सोहळा रविवार १९ जुलै रोजी तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सोमवार दि. २० जुलै रोजी माळशिरस तालुक्यात येत आहे. दोन्ही सोहळ्यातील वारकऱ्यांना सेवा सुविधा देण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी भाऊसाहेब जानकर यांनी दिली.

सोमवारी जानकर पत्रकारांशी बोलत होते. माळशिरस तालुक्यात अकलुज येथे उप जिल्हा रुग्णालय व माळशिरस व नातेपुते येथे ग्रामीण रुग्णालय आहेत. एकुण प्राथमिक आरोग्य केंद्र १२ आहेत.



पालखी सोहळ्यासाठी आरोग्य सल्ला व उपचार केंद्र ४६, रुग्णवाहिका १७, १०८ रुग्णवाहिका प्रत्येक मुक्कामी ४, पाणी स्त्रोताची संख्या ७४४, पाणी टँकर भरण्याची ठिकाणे ४३ असून टी. सी.एल. बॅग ५७०, वैद्यकीय अधिकारी २६, वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर १०, आरोग्य सहाय्यक २०, आरोग्य सहाय्यक प्रतिनियुक्तीवर १०, आरोग्य सेवक ६६, आरोग्य सेवक प्रतिनियुक्तीवर १२०, वॉकी टॉकी सेट ६, एकुण कर्मचारी ७९८, आरोग्य दुत २५, पालखी मार्गावरील खाजगी हॉस्पिटल १५०, पाणी नमुने कर्मचारी १२० असे नियोजन केले आहे.

**आरोग्य विभागामार्फत प्रतिबंधात्मक सुविधा**

पाणी स्त्रोताचे सर्वेक्षण, पाणी नमुना तपासणी, पाणी स्त्रोताचे व टँकर शुद्धीकरण, कंटेनर सर्वेक्षण, हॉटेल धारकांना स्वच्छतेविषयी पत्र व जंतनाशक गोळ्या वाटप आदी प्रतिबंधात्मक सुविधा पुरवण्यात येतील.

**नाविन्यपूर्ण उपाय योजना**
- महिलांसाठी विशेष १८ स्तनपान कक्ष
- ग्रामपंचायतमार्फत नेमलेल्या सर्व स्वयंसेवकांची आरोग्य तपासणी
- पालखी मार्गावर २५ आरोग्य दूताचे पथक कार्यरत असेल

**आरोग्य विभागामार्फत उपचारात्मक सुविधा**
- प्रती २ किलोमीटरवर आरोग्य सल्ला व उपचार केंद्राची स्थापना
- डॉक्टर व आरोग्य संस्थांचे नंबर प्रदर्शित करणे
- २४ तास आरोग्य सुविधा उपलब्ध करणे
- रुग्णवाहिका सुविधा पुरविणे
- खाजगी रुग्णालय व रक्तपेढ्यांना मदतीचे आवाहन करणे.
- खाजगी आय सी युमध्ये राखीव बेड ठेवण्याचे पत्र देणे.

## दोन गावठी पिस्तुल, चार जिवंत काडतुससह तीन आरोपींना अटक

### स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणची हातीद येथे कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ जुलै-**
२ गावठी पिस्तुल, ४ जिवंत काडतुससह ३ आरोपींना अटक करण्यात सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले आहे, सदर कारवाई हातीद, ता.सांगोला येथील पुलाखाली रविवार दि.५ जुलै रोजी रात्री ८ वाजून ४० मि. वाजता करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांना सांगोला ते मिरज महामार्गावर हातीद गावच्या पुलाखाली देशी बनावटीचे पिस्तुल व राऊंड बाळगून त्याची विक्री करत आहेत अशी माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई करताना आरोपी अवधूत सुभाष केंगार (वय-२७, रा.कोळा, ता.सांगोला) हर्षवर्धन नामदेव ऐवळे (वय-२४, रा.किडेबिसरी, ता.सांगोला), आबा धोंडीराम नरळे (वय-२९, रा.जुनोनी, ता.सांगोला) हे रविवार दि.५ जुलै रोजी रात्री ८ वाजून ४० मि.वाजता हातीद गावच्या पुलाखाली त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा अग्निशस्त्र जवळ बाळगण्याचा तसेच विक्री करण्याचा परवाना नसताना बेकायदेशीररित्या विक्री करताना मिळून आले. याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे पोहकॉ. अतुल घाडगे यांनी सांगोला पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोनि. विनोद घुगे यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखा सोलापुर ग्रामीणचे सपोनि.विजय शिंदे करत आहेत.

सदर कारवाई मध्ये ५० हजार ४०० रू.किमतीचे २ देशी बनावटीचे गावठी पिस्टल ४ जिवंत काडतुससह तसेच एक १५ हजार, दुसरा ५० हजार व तिसरा २० हजार रू.किमतीचे तीन मोबाईल असे एकूण १ लाख ८५ हजार ८०० रू.किमतींचा माल जप्त करण्यात आला आहे.

## आर्द्रा नक्षत्राची माळशिरस तालुक्यात दमदार हजेरी




**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ६ जुलै-**
तालुक्यात जून महिन्याच्या अखेरीस आद्रा नक्षत्राच्या पावसाने तालुक्याच्या पश्चिम भागात दमदार हजेरी लावली आहे. पावसामुळे रखडलेल्या खरिपाच्या पेरण्या सुरू झाल्या आहेत. परिणामी बळीराजा सुखावला आहे.

तालुक्यात पश्चिम भागातील भांब, रेडे, जळभावी, गारवाड यांसह अनेक गावात पावसाने चांगली हजेरी लावली आहे. आठ व नऊ जून रोजी झालेला पाऊस व रविवारी २८ जून रोजी झालेल्या पावसामुळे आता तालुक्यात सर्वत्र जमिनीस वापसा आल्यानंतर खरीपच्या पेरण्या सुरू झाल्या आहेत. तालुक्यात जून महिन्याच्या सुरुवातीस काही भागात पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे काही प्रमाणात खरीपाच्या पेरणी चालू झाल्या होत्या. परंतु त्यानंतर पूर्ण जून महिना संपत आला तरी समाधानकारक पावसाने हजेरी न लावल्याने खरिपाची पेरणी कधी होणार या चिंतेत शेतकरी वर्ग होता.

सर्वसाधारण जून महिन्यात तालुक्यात खरीपाची पेर चालू होते. खरीपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या मशागती करून ठेवल्या होत्या. परंतु पाऊस लांबल्याने उर्वरित पेरण्या लांबल्या होत्या. तालुक्याच्या पश्चिम भागात समाधानकारक पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी मुसळधार पाऊस तर काही ठिकाणी पेरणी योग्य पाऊस झाला. परिणामी बळीराजाने खरीपाचे पेरणी सुरू केली आहे. तालुक्यात खरीपाचे क्षेत्र चौदा हजार ६५२ हेक्टर आहे. यामध्ये मका, बाजरी, कांदा व चारा पिके घेतली जातात. खरीपापासून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळत असल्याने तालुक्यात खरीपाची पेरणी मोठ्या प्रमाणात होत असते.

## खासगी कोचिंग क्लासेस व कॉलेजमधील साटेलोटे सुरुच

### माळशिरस तालुक्यात शासनाच्या नियमावलीला हरताळ?



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ६ जुलै-**
शासनाने खासगी कोचिंग क्लासेस व कॉलेज यामधील साटेलोटे संपविण्याच्या दिशेने प्रयत्न सुरु केले आहेत. मात्र तरीही माळशिरस तालुक्यात असे प्रकार चालूच आहेत.

शासनाने यंदापासून कडक नियमावली जाहीर केली आहे. मात्र तरीही तालुक्यात असे प्रकार सुरु असल्याचे प्रवेश प्रक्रियेतून अगदी स्पष्ट दिसून येत आहे. यामुळे शासनाच्या कडक नियमावली बायोमेट्रिक हजेरीसह, सीसीटीव्ही कॅमेरे, अचानक शाळा कॉलेजला भेटी देऊन पट पडताळणी, जेवढी मान्यता तेवढेच विद्यार्थी, कॉलेजचा मान्यता व यु डायस क्रमांक दर्शनी भागात लावणे अशी नियमावली शासनाने जाहीर केली आहे. विद्यार्थ्यांनी नावालाच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा. अगदी दोन वर्षांत कॉलेजला कधीही जायचे नाही. खाजगी कोचिंग क्लासमध्येच थांबून तयारी करायची. मग कॉलेजमध्ये दररोजची हजेरी बोगस, ना प्रॅक्टिकल ना काही सर्व बोगसच; बदल्यात चांगल्या निकालाची प्रसिद्धी करायची. दरवर्षी अशीच प्रक्रिया राबवायची. चांगले गुण मिळवून देतो म्हणून विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये घ्यायचे. परीक्षा केंद्रही मर्जीतील, त्याठिकाणी सर्व व्यवस्था लावायची व चांगले गुण मिळवून द्यायचे असा प्रकार खाजगी कोचिंग क्लासवाले, कॉलेजवाले व शिक्षण खात्यातील अधिकारी यांच्या मिलीभगतने सुरु आहेत. तालुक्यात शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारा धंदा सुरु आहे. शासनाने काहीही करो, कितीही कडक अंमलबजावणी करो, या व्यवस्थेला कोणीच बदलू शकत नाही, अशी परिस्थिती माळशिरस तालुक्यात आहे. यासाठी कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. अन्यथा यामध्ये बदल होणे अशक्य आहे.

**गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून प्रतिसाद नाही**
याविषयी माळशिरस तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांच्याकडुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी फोन उचलला नाही.



## धनगर समाजाच्या कामांसाठी कटीबध्द

### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि, ६ जुलै-**
धनगर समाज माझ्या पाठीशी असल्याने मी भरघोस मताधिक्याने निवडून आलो, समाजाच्या कोणतेही प्रश्न असो त्या कामासाठी मी कटीबद्ध असल्याचे आश्वासन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.

अक्कलकोट येथील बिरदेव मंदिराजवळ संत बाळूमामा संस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन पार पडले. यावेळी ते बोलत होते. भाजप सर्वच जाती धर्माला बरोबर घेऊन त्यांना न्याय देण्याचे काम करते, असेही आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी होते. या प्रसंगी व्यासपीठावर अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, समर्थ नगरचे सरपंच प्रदीप पाटील, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, जिल्हा परिषद सदस्य विकास बुळा, भाजप जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष नन्नू कोरबू, नगरसेवक लक्ष्मीकांत धानशेट्टी, नगरसेवक कमनुरकर, पंचायत समिती सदस्य विजय राठोड, विश्रांत गायकवाड, आप्पासाहेब बिराजदार, महादेव माने, शाखा अभियंता रविशंकर बोधले, उमेश पांढरे, पुंडलिक पांढरे, अनंत दूधभाते, दिलीप बंदीछोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना देवस्थान ट्रस्टचे सचिव स्वामीनाथ घोडके यांनी केले. यावेळी धनगर समाजाचे नगरसेवक संजय घोडके यांचा सत्कार आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमास तालुका व शहर धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी गंगाराम पुजारी, बर्गली पुजारी, सदाशिव पुजारी, दशरथ कोरे, अशोक कोरे, देवस्थान ट्रस्ट उपाध्यक्ष कमल सोनटक्के, नंदा घोडके, राजू घोडके, अंबाजी बंदीछोडे, गुरुनाथ घोडके, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्कलकोट तालुका धनगर समाज संघटनेचे कोषाध्यक्ष शंकर व्हनमाने यांनी केले. आभार काशिनाथ आलूरकर यांनी मानले.

## पूरपरिस्थितीत अडकलेल्या वारकऱ्यांना शिवसेनेकडून मदत

### अक्षय महाराज भोसले; देहु-आळंदीत मदत कार्य



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.६ जुलै -**
देहू आणि आळंदीत पूरपरिस्थितीमुळे अडकलेल्या वारकऱ्यांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेने खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना व मुंबई येथील श्रीमंत माऊली प्रतिष्ठान यांच्या वतीने मदत देत असल्याचे शिवसेना अध्यात्मिक सेनेचे प्रमुख अक्षय महाराज भोसले यांनी सांगितले.

देहू येथून मंगळवारी (दि. ७) रोजी श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान पंढरपूरकडे होणार आहे. बुधवारी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. त्यामुळे देहू आणि आळंदी येथे मोठ्या संख्येने वारकरी दाखल झालेले आहेत. मात्र आळंदी आणि देहू येथे पावसामुळे नद्यांना महापूर आलेला आहे. त्यामुळे त्या दोन्ही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थांन आणि नगरपरिषद आळंदीकडून वारकऱ्यांना पाऊस आणि पूरपरिस्थितीमुळे आळंदीकडे येवू नये. असेल तेथेच थांबावे असे आवाहन केले आहे. तरीही प्रस्थान सोहळ्यासाठी देहू आणि आळंदीत दाखल वारकऱ्यांची पाऊस आणि महापूरामुळे तारांबळ उडाली आहे. अनेक वारकरी देहू आणि आळंदी येथे विविध मठ, धर्मशाळांमधून अडकलेले आहेत. प्रशासनाकडून त्यांना मदतीचा हातही दिला जात आहे.

शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना आणि मुंबई येथील श्रीमंत माऊली प्रतिष्ठानच्या वतीने या वारकऱ्यांसाठी भोजन पॅकेट्स, पिण्याच्या पाण्याचा बाटल्या यांची तात्काळ व्यवस्था केली आहे. अडकलेल्या वारकऱ्यांनी त्यांच्या ठिकाण आणि व्यक्तींची संख्या यांची माहिती मोबाईलव्दारे दिलेल्या हेल्पलाईनवर कळवावी. त्यांना तातडीने मदत पोहचवली जाईल, असेही अक्षय महाराज भोसले यांनी दिली आहे.

**मदतीसाठी हेल्पलाईन**
श्री क्षेत्र आळंदी येथे अडकलेल्या वारकऱ्यांनी (मो.९९२२९७४५१६, मो.९९२१३०८३९५ आणि मो.९८२२१७८३१४. या बरोबरच श्री क्षेत्र आळंदी (देहू फाटा बाजूस मो.८६२४८३१२४६) तसेच देहू येथील वारकऱ्यांनी ( मो.९६५७०३८३५३) या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.